म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ८५८५.
१९५०




REFBK-0007401
११८५७

ग्रंथ संग्रहालय ठाणे

ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र.
स्थळ प्रत

# उघडे लिफाफे

[ लघुनिबंधसंग्रह ]

[ 'लघुनिबंध : स्वरूप व स्वभाव' ह्या प्रबंधासह ]

ना. मा. सन्त

REFBK-0007401

वा. ल. कुलकर्णी यांची प्रस्तावना

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
6809

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

* १४ *

मूल्य दीड रुपया

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

प्रथमावृत्ति : १९४४
पुनर्मुद्रण : १९५०

मुद्रक : बा. ग. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार, मुंबई २
प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ-सदन, गिरगांव, मुंबई ४

प्रकाश आणि पुष्पा,
या माझ्या लाडक्या चिमण्या जीवांस —

या संग्रहांत संकलित केलेल्या अठरापैकीं चौदा लघुनिबंध ज्योत्स्ना, समीक्षक, किर्लोस्कर, स्त्री, मनोहर, इत्यादि मासिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत. उरलेले चार अगदीं ताजे आहेत. लघुनिबंधांचा क्रम लेखनकाल-क्रमानुसार ठेवला आहे. लघुनिबंध १४, १५, १६, आणि १८ यांच्या मध्यवर्ति कल्पना इंग्रजींतून घेतल्या आहेत.

या संग्रहाला लघुनिबंधावरला जो प्रबंध मीं जोडला आहे तो आज कित्येक दिवस माझ्या मनांत सांचत आलेल्या कल्पना व त्यांवर झालेलें मनन यांचें फळ आहे. 'चॅनल्स ऑफ इंग्लिश लिटरेचर' या मालेंतील 'द एसे' आणि 'आर्ट ॲन्ड क्रॅफ्ट' मालेंतील 'द एसे' हीं पुस्तकें लघुनिबंध प्रकारावर प्रमाणभूत मानण्यांत येतात. पण हीं वाचून माझें समाधान झालें नाहीं. कारण या दोहोंत लघुनिबंधाचा ऐतिहासिक मागोवा घेतांना विखुरलेल्या उल्लेखांनीं लघुनिबंधस्वरूपावर जेवढा प्रकाश पडेल तेवढाच. स्वतंत्रपणें अशी त्याच्या स्वरूपाची अथवा स्वभावाची त्यांत चर्चा नाहीं. 'एसेइस्ट पास्ट ॲन्ड प्रेझेंट' या पुस्तकाला जे. बी. प्रिस्टले यांनीं लिहिलेली विस्तृत प्रस्तावना पुष्कळशी याच स्वरूपाची असली तरी त्यांत लघुनिबंधाच्या स्वरूपस्वभावाविषयीं विपुल उल्लेख झाल्यानें मला ती अधिक आवडली. ई. ए. वुडहाऊस यांनीं ल्यूकसच्या संग्रहाला लिहिलेली प्रस्तावना मात्र अत्यंत मूलगामी आणि मार्मिक दृष्टीनें लघुनिबंधस्वरूपाची चिकित्सा करणारी आहे. त्यांतील विवेचन आणि विश्लेषण मूलगामी असलें तरी शाळकरी विद्यार्थ्यांनीं या वाङ्मयप्रकाराची उपासना कां व कशी करावी या भूमिकेवरून केलें आहे.

लघुनिबंध हा एक महत्त्वाचा वाङ्मयप्रकार आहे. आत्मप्रकटीकरण हें त्याचें वैशिष्ट्य असल्यानें तें ज्या इतर वाङ्मयप्रकारांचेंही आहे, त्यांच्याशीं त्याची तुलना करून त्याचें स्वतःचें वैशिष्ट्य काय हें मीं या प्रबंधाच्या पूर्वार्धांत दाखविलें आहे. उत्तरार्धांत त्याच्या या वैशिष्ट्याचें विवेचन आणि विश्लेषण करतांना मात्र ई. ए. वुडहाऊसच्या पद्धतीचा मीं अवलंब केला आहे. तो करतांना त्याचें जें ऋण झालें असेल तें मी येथें अत्यंत कृतज्ञतेनें नमूद करून ठेवतों.

ना. मा. सन्त

ळ्ळकवाडी, २९ नोव्हेंबर, '४२

# अनुक्रमणिका


थोडेंसें प्रस्तावने खल

| | | |
|---|---|---|
| १ | वाऱ्याची झुळूक ... ... | १ |
| २ | कात्री ... ... | ६ |
| ३ | पोस्टाची पेटी ... ... | १९ |
| ४ | दुसऱ्याचे कपडे ... ... | २१ |
| ५ | बोहारी ... ... | २६ |
| ६ | आजारीपणाचं सुख ... | ३२ |
| ७ | बँक-बुक ... ... | ३७ |
| ८ | पानाचा षोक ... ... | ४२ |
| ९ | साखरेची गोडी ... ... | ४८ |
| १० | लिफाफे ... ... | ५३ |
| ११ | हिशेबाचें व्यसन ... ... | ५८ |
| १२ | चक्रवर्ति आणि रस्ते ... | ६५ |
| १३ | माझा प्रेमळ मित्र ! ... | ७० |
| १४ | उधळेपणा ... ... | ७६ |
| १५ | मुखवटे ... ... | ८० |
| १६ | खाजगी दानत ... ... | ८६ |
| १७ | माझी पहिली लघुकथा प्रसिद्ध झाली तेव्हां — ... ... | ९० |
| १८ | सुरुवात ... ... | ९४ |
| | लघुनिबंध : स्वरूप व स्वभाव ... | ९८ |



ना. मा. सन्त ह्यांचा जन्म १९०९ मध्यें झाला. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधून ते बी. ए. झाले. फर्ग्युसनच्या मराठी मंडळाचे ते चिटणीस होते आणि ह्याच मंडळाच्या विद्यमानें 'ज्योत्स्ना' ह्या नांवाचा जो कविता, लघुकथा व लेख ह्यांचा सुप्रसिद्ध संग्रह प्रसिद्ध झाला त्याचें संपादनही त्यांनींच केलें होतें. ह्याच संग्रहांत त्यांचा पहिला ललितनिबंध 'फुलपांखरूं' हा प्रसिद्ध झाला. १९३९ सालीं ते मुंबईच्या एस्. टी. कॉलेजमधून बी. टी. परीक्षा पास झाले. शिक्षक ह्या दृष्टीनें त्यांनीं पुणें आणि मुंबई येथें काम केलें. १९४३ पासून ते बेळगांव येथील मराठी ट्रेनिंग कॉलेजांत प्राध्यापक म्हणून काम करूं लागले होते. जून १९४६ मध्यें ते आकस्मिकपणें निधन पावले. मृत्यूपूर्वींच कांहीं दिवस त्यांची त्याच कॉलेजचे प्रिन्सिपल म्हणून नेमणूक झाली होती. 'उघडे लिफाफे' ह्या ललितनिबंध-संग्रहाखेरीज 'भारत-नेते' हा भाषांतरित ग्रंथ आणि ते व त्यांच्या पत्नी इंदिरा सन्त ह्यांच्या कवितांचा एकत्रित संग्रह 'सहवास' हीं पुस्तकें त्यांच्या नांवावर प्रसिद्ध आहेत. त्यांचे कांहीं उत्तम टीका-लेख व ललित-निबंध अद्याप असंग्रहित आहेत.

# थोडेंसें प्रस्तावनेदाखल —

आपलें संपन्न व्यक्तित्व हेंच ललित-निबंध-लेखकाचें खरेंखुरें भांडवल असतें. ह्या व्यक्तित्वांत ज्या प्रमाणांत ढंगदारपणा असेल, अभिजात रसिकता असेल, तत्त्वशोधक-वृत्तीचा आढळ होत असेल, त्या प्रमाणांत त्याचा आविष्कार हा रंगदार व आकर्षक ठरेल. खरोखर ह्या व्यक्तित्वांत कोणकोणते गुणविशेष असावयास हवेत हें सांगतां येणें मोठें कठीण आहे. जीवनाचा मनमुराद आस्वाद घेण्याची, त्यांतील लहानमोठ्या अनुभवांचे विविध रंग न्याहाळण्याची, जीवनाकडे गंभीरपणें व खेळकरपणें अशा दोन्हीहि दृष्टींनीं बघण्याची शक्ति ह्या व्यक्तित्वांत असते. जीवनाचें बहिरंग — ह्या बहिरंगावरील छोटेमोठे तरंग, छोट्यामोठ्या हालचाली, घडामोडी, क्षणोक्षणीं बदलणारे छायाप्रकाश इत्यादींमध्यें तर हें व्यक्तित्व रंगून जातेंच व त्यांचें मोठ्या कुतूहलानें, साक्षेपानें, सहानुभूतीनें व रसिकतेनें परीक्षण—निरीक्षण करतेंच; परंतु मधूनच त्याला जीवनाच्या अंतर्यामाचा ठाव घेण्याचीहि उत्कट इच्छा होते व मग तें त्याहि प्रदेशांत यथेच्छ अवगाहन करितें. ही त्याची क्रीडा — हो, ती क्रीडाच असते. तिला क्रीडा ह्या नांवाखेरीज दुसऱ्या कोणत्याहि नांवानें संबोधणें गैरच ठरेल : कारण ललितनिबंधलेखकानें केलेलें जीवनाच्या अंतर्यामाचें अवगाहन व तत्त्वचिंतन हें देखील त्या अवगाहनांतील आणि तत्त्वचिंतनांतील क्रीडानंद अनुभविण्यासाठींच त्याजकडून झालेलें असतें. तें केवळ तत्त्वचिंतनासाठीं केलेलें तत्त्वचिंतन नसतें : तसें जर तें झालें तर मग त्यांत लालित्य तें कसें उतरणार ! तें मग केवळ एखाद्या तत्त्वज्ञान्यानें केलेलें तत्त्वचिंतन होणार. तेव्हां सांगावयाचा उद्देश असा कीं जीवनाच्या पृष्ठभागाला ठिकठिकाणीं स्पर्श करून जाण्याची किंवा मधूनच त्याच्या अंतर्यामाचा ठाव घेण्याची ललितनिबंधलेखकाकडून होणारी ही क्रीडा मोठी मनोवेधक असते.

आतां क्रीडा म्हटली कीं तिच्याबरोबर थोडासा बेछूटपणा, थोडाफार विमुक्तपणा, कलंदरपणा व एककल्लीपणा हा येणारच. त्याशिवाय तिची खुमारी ती काय ? शिवाय कोणत्याहि क्रीडेंत माणसाला नादावून सोडण्याचा धर्मच आहे मुळीं. सगळ्याच कलावंतांत व त्यांच्या कलेंत थोडाफार नादिष्टपणा आढळतो. ललितनिबंधलेखनांतहि आपणांस नादिष्टपणाच्या छटा ज्या ठिकठिकाणीं

आढळतात त्या ह्यामुळेंच; परंतु मौज अशी आहे कीं कोणत्याहि क्रीडेचें कसब हें तिचा नाद लागल्याखेरीज हस्तगतहि होत नसतें. जीवनाच्या छोट्यामोठ्या विविध अंगांचें मजेंत चिंतन करण्याची जी कला आहे तिची गोष्टहि अशीच आहे. जीवन-व्यवहारांचें चिंतन करितांना एकप्रकारचा क्रीडानंद ललित-निबंधलेखक चाखीत असतो व म्हणूनच ह्या कलेचें कसब कालावधीनें त्याला चांगलेंच अवगत होत असतें. आपल्या लेखनांतून तें व्यक्त करितांना त्याला आनंद होत असतो. एखाद्या क्रीडेंत आपण संपादिलेलें पाटव आपल्या त्या क्रीडेच्या आविष्कारांत आकर्षकपणें प्रगट व्हावें असें कोणत्या कलावंताला नाहीं वाटणार? एखाद्या क्रिकेटपटूचा खेळ पाहतांना आपणांस असें दिसून येतें कीं तो जसा सामना जिंकण्यासाठीं म्हणून ईर्षेनें खेळत असतो तसाच क्रिकेटच्या क्रीडेंतील आपण संपादिलेलें जें कसब असतें तें दाखविण्यासाठीं व त्यांत जो आनंद आहे तो चाखण्यासाठींहि तो खेळत असतो. त्याच्या खेळांत जें लालित्य दृग्गोचर होतें तें ह्यामुळेंच. ह्या लालित्यावरच आपल्यासारखे प्रेक्षक खूष असतात. एखादा ललितनिबंधलेखक जेव्हां एखाद्या प्रसंगांतील मर्म किंवा एखाद्या अनुभवांतील रस आपणासमोर साक्षात् उभा करूं पाहतो तेव्हां तो जी लेखनक्रीडा करतो तिचें स्वरूप देखील वरील थाटाचें असतें. तिच्यांत जेवढी सहजता असते तेवढीच विशिष्ट परिणाम साधण्याची ऐटहि असते. अशा वेळीं तो मोठें शैलीदार लेखन करितो: शब्द, वाक्य, परिच्छेदांची योजना मोठ्या कौशल्यानें करितो, आपल्या अभिव्यक्तींत तो आपली स्वतःची अशी स्वतंत्र वेगळीक निर्माण करितो – ही सर्व क्रीडा असते, लेखनक्रीडा असते, त्याच्या व्यक्तित्वाचें सहजदर्शन ह्या क्रीडेच्या द्वारां आपणांस होत असतें आणि जो जीवनानुभव तो आपणासमोर त्या क्रीडेच्या द्वारां ठेवीत असतो त्यांत जर कांहीं वैशिष्ट्य असेल, तद्द्वारां जीवनावर जर कांहीं वेगळाच प्रकाश पडत असेल, जीवनविषयक कांहीं नवनवीन सत्यें त्यांतून जर अभिव्यक्त होत असतील तर आपणहि त्याच्या ह्या लेखनक्रीडेंत रंगून जाऊं शकतों.

कै. ना. मा. संत यांचे ललित-निबंध वाचीत असतांना वरील स्वरूपाचेच विचार आपल्या मनांत येतात. संतांचे निबंध म्हणजे खरोखरच 'उघडे लिफाफे.' आहेत: ह्या उघड्या लिफाफ्यांतून त्यांचें व्यक्तित्व कसें स्पष्टपणें उमटून बाहेर पडत आहे! संतांच्या ललित-निबंधांत पोस्टाची पेटी, पत्रें, लिफाफे हे विषय

उगीच नाहीं वरचेवर येत ! ते त्यांचे आवडीचे चिंतनविषय आहेत. पत्रांच्या द्वारां होणारा आत्माविष्कार संतांना मोठा हृद्य वाटतो. त्याचा स्पर्श 'वाऱ्याच्या' शीतल 'झुळके'सारखा त्यांना आल्हादजनक वाटतो. ललित निबंधाशीं पत्राचें फार जवळचें नातें आहे आणि हें नातें त्यांनीं आपल्या शेवटच्या निबंधांत व्यक्त केलेंच आहे. परंतु ह्या 'उघड्या लिफाफ्यां'तून आपल्याला संतांच्या मनाचे कितीतरी कानेकोपरे स्पष्ट दिसत आहेत: त्यांची नीटनेटकेपणाची आवड, त्यांची हळुवार मनोवृत्ति, त्यांची प्रबल जीवनासक्ति, त्यांची अभिजात रसिकवृत्ति, त्यांचें कविहृदय, मानवी मनाचे विविध खेळ कुतूहलानें अवलोकण्याची त्यांच्या ठिकाणची आवड, एक ना दोन, अशा अनेक गोष्टी आपल्या लक्षांत येत आहेत आणि हें संतांचें व्यक्तित्व मोठें आकर्षक वाटत आहे. अशा व्यक्तीच्या सहवासांत कोणालाहि चार घटका घालवाव्याशाच वाटतील: ह्या सहवासानंतर आणि त्यांत झालेल्या गुजगोष्टींनंतर आपला जीवनोत्साह खात्रीनें दुणावल्याखेरीज राहणार नाहीं. संतांच्याच शब्दांचा उपयोग करून बोलायचें झालें तर मी असें म्हणेन कीं त्यांच्या 'चाळिशी'तून आपण जगाकडे पाहूं लागलों कीं 'त्याच डोळ्यांतून दिसणारं तेंच जग पाहून जे आपण आपल्या अन्तर्मनांत अगदीं कंटाळून गेलेलों असतों, तेंच आकाश आणि तेच ढग, तोच रस्ता आणि तीच वर्दळ, त्याच इमारती आणि तींच माणसं, जशींच्या तशींच पाहून आपल्या डोळ्यांना जो एक प्रकारचा वीट आलेला असतो, प्रत्यहीं दिसणारीं सौंदर्यं सुद्धां फिकीं वाटूं लागलेलीं असतात व रंगांचा रसरशीतपणाही कमी झाल्यासारखा वाटत असतो' तें सारें एकदम बदलतें, 'जगांतील सारा रखरखीतपणा लोप पावून सगळीकडे आल्हाद पसरल्यासारखं वाटूं लागतं. जिकडे तिकडे सुखाशेचा रंग भरल्याचा प्रत्यय येऊन पूर्वीं नजरेस न आलेलीं सौंदर्यं डोळ्यांत भरूं लागतात. अंगांत यौवन संचारलं, म्हणजे जगांत वसंत बहरल्यासारखं वाटावं तसंच कांहींसं' संतांच्या ललितनिबंधांची 'चाळिशी' चढविली कीं आपणांस वाटूं लागतं.

हेंच खरें ललित-निबंधांचें कार्य व तें संतांचे निबंध खचित साधतात. सर्वसामान्य माणसाच्या नशिबीं आलेलें जें जीवन असतें त्यांतील अनंतविध सौंदर्यस्थानें ललित-निबंधकार प्रकाशित करीत असतो व जीवन समरसून व समंजसपणें जगण्याची जी कला आहे तिचीं जणूं प्रात्यक्षिकेंच देत असतो.

संतांचे निबंध हेंच कार्य साधतात. संतांच्या ह्या ललित-निबंधांपैकीं कांहींचा आत्मा तर कारुण्य हाच आहे : त्यांत ग्रंथित केलेले अनुभव खात्रीनें निर्भेळ सुखाचे नाहींत; परंतु दुःख किंवा शोक ह्यांच्या छटा असलेल्या ह्या अनुभवांचें दर्शनहि संतांनीं एवढ्या प्रसन्न चित्तानें घडविलेलें आहे कीं त्यांतील दुःखात्मक भागापेक्षां त्यांत सांठवलेलें काव्यच आपणांस अधिक जाणवून जातें आणि एकीकडे आपले डोळे पाणावले तरी आपलें हृदय त्यांतील विशुद्ध भावसत्यांच्या दर्शनानें आनंदून गेलेलें असतें.

जीवनाकडे प्रसन्नपणें पाहण्याची शक्ति ना. मा. संतांच्या ठिकाणीं विशेषत्वानें दिसते. म्हणूनच 'आजारीपणाचं सुख' ते अनुभवूं शकतात; आपल्या छोट्या संसारांत येणाऱ्या अडीअडीचणींतील काव्य ते कलात्म मनानें आस्वादूं शकतात; आपल्या जीवनांतील सुखद स्मृतींची कितीतरी काळजीपूर्वक ते जपणूक करितांना दिसतात, 'डाळिंबाहून मधुर आणि द्राक्षाहून गोड अशा आपल्या पत्नीनें' बोहाऱ्याकडून घेतलेल्या डब्याबरण्यांनीं सजविलेल्या स्वयंपाकगृहाचें सौंदर्य देखील ते आपल्यासमोर चित्रित करूं शकतात, 'पानांचा षोक' किंवा 'उधळेपणा' ह्यांत भरलेल्या काव्याचा अर्थ लावूं शकतात. जीवनाकडे प्रसन्नपणें पाहणाऱ्यालाच जीवनाचें कोडें थोडेंफार उलगडतां येत असतें व जीवनाकडे समंजसपणें बघण्याची शक्ति अंगीं बाणतां येत असते. संतांनीं ही साधना थोडीफार केलेली आहे असें दिसून येतें. त्यांनीं आपल्या निबंधांतून केलेलें जीवनचिंतन सखोल नसलें तरी त्यांत एक प्रकारचा सुजाण समंजसपणा सर्वत्र व्यक्त होतो. 'अर्जुनाप्रमाणें विराटपुरुषाचें दर्शन घेण्याचें धैर्य अंगीं असण्यापेक्षां, आपल्या मनोविश्वाचें नग्न दर्शन घेण्याचें धैर्य असणें अत्यावश्यक असतें' असलें एखाद्या जीवनसत्याचें सहज दर्शन घडविणारें वाक्य जेव्हां संत झटकन् लिहून जातात तेव्हां जीवनाकडे पाहण्याच्या त्यांच्या शांत, विवेकशील तत्त्वग्राही वृत्तीचा प्रत्यय वाचकाला आल्याखेरीज राहत नाहीं.

प्रसन्न मनोवृत्ति हा खऱ्याखुऱ्या विनोदबुद्धीचाच परिपाक असतो. संतांच्या सूक्ष्मकोमल विनोदबुद्धीचा प्रत्यय 'उघड्या लिफाफ्यां'तील पानापानांमधून येतो. त्यांच्या सबंध ललित-निबंधलेखनाला त्यांच्या विनोदबुद्धीनें विलक्षण उजळा आणला आहे. 'हिशेबाचें व्यसन', 'चक्रवर्ति आणि रस्ते', 'माझा

नोंद ११८८

प्रेमळ मित्र ' ह्यांसारख्या ललित-निबंधांचे चिंतन-विषयच विनोदबुद्धीला चालना देणारे आहेत. तेव्हां ह्या निबंधांतून तिचा ढंगदार विलास आपणांस सर्वत्र पाहावयास मिळाला तर त्यांत कांहींच नवल नाहीं. परंतु ' आजारीपणाचं सुख ', ' मुखवटे ', ' दुसऱ्याचे कपडे ', ' साखरेची गोडी ', ' कात्री ' ह्यांसारखे त्यांचे दुसरे कोणतेहि निबंध घ्या : किंवा अगदीं 'ब्यॅक-बुक' ह्यासारखा थोडीशी कारुण्याची झांक असलेला त्यांचा एखादा निबंध घ्या, त्यांतहि ' संसाराच्या अडचणींतून शिलकेचं लिंबू बँकेपर्यंत सांभाळीत नेण्याचं काम ' करणाऱ्या चमचा-लिंबू शर्यतीचें जें मधूनच सुखद वर्णन येतें त्यांत प्रगट झालेल्या विनोद-बुद्धीनें एकंदर निबंधाचें वातावरण कसें एकदम प्रसन्न बनतें. आपल्या सर्वच जीवनचिंतनाला सूक्ष्म विनोदबुद्धीचें तलम अस्तर जोडण्याची कला संतांना अगदीं सहजपणें अवगत झाली होती असेंच हे ललित-निबंध वाचतांना वाटतें.

संतांची जी लेखनप्रकृति आहे त्या प्रकृतीला साजेशी लेखनशैली त्यांच्या लेखणीनें कमावलेली दिसते. संत हे उग्रप्रकृतीचे लेखक नव्हत. जीवनांतील सौंदर्यस्थलांचा आस्वाद घ्यावा, कोमल सद्भावांची जपणूक करावी, कलानंद व वाङ्मयानंद भरपूर चाखावा हीच त्यांची वृत्ति. ह्या वृत्तीला साजेशी शांत, प्रवाही, सौम्य, विनोदगर्भ, कलात्म व नीटस लेखन-शैली त्यांनीं संपादिलेली दिसते. त्यांच्या स्वभावांतील सौजन्य, मार्दव आणि सौंदर्यबुद्धि त्यांनीं वापरलेल्या शब्दांच्या निवडींत व वाक्यांच्या घडणींत देखील दिसून येते ; त्यांच्या कानांना कठोर व्यंजनांचा ध्वनीहि कांहीं वेळां असह्य होतो असें दिसतें. ते ' कपाट ' शब्द सहसा वापरणार नाहींत; त्याऐवजीं ' आलमारी ' हा शब्द वापरतील ; ' सीता ' ह्या शब्दापेक्षां ' जानकी ' हाच शब्द पसंत करतील ; ' तावदानें ', ' निका ', ' मुकाबला ', ' सोडत ' ह्या शब्दांचे प्रतिशब्द त्यांना चाल-णार नाहींत : त्यांना तेच शब्द हवेत असें दिसेल : वाक्यांची घडण करितांना त्यांतील ध्वनींची लय बिघडूं नये ह्याची ते मनापासून काळजी घेतील : ' बुद्धीची कल्पकता आणि हाताचं कौशल्य यांचा मेळ घालून कात्री चालवतां आली तरच कपड्यांचे काट आणि घाट लोकांच्या पसंतीला उतरतील ', 'या रुपेरी केसाबरोबर मला माझ्या चाळिशीचं शल्य उपटून टाकतां आलं नाहीं, तरी त्यामुळं आलेल्या उदासीनतेचं कुसळ मीं खात्रीनं उपटून काढलं ', 'मऊ बिच्छाना केलेल्या पाळ-ण्यांत आपल्या लाडक्या जीवाला निजवून त्याला मऊ उबदार पांघरुणांनीं

लपेटून टाकलं म्हणजे आईला जें समाधान होतं, तेंच मिमोसाच्या पाकिटांतल्या अस्तरांत प्रेमपत्राची घडी अलगद सरकवून दिली म्हणजे प्रेमिकाला होतं !', 'दुसऱ्यांकडून मला जें कळलं त्यावरून तर वाटतं कीं अंतःकरणांत कुजबूज व्हायचा अवकाश, कीं चेहऱ्यावर त्याचा गलबला झालाच !' असलीं खटकेबाज, नादमधुर परंतु हवा तो भाव किंवा विचार लालित्यपूर्ण रीतीनें व्यक्त करणारीं वाक्यें ते सहज लिहून जातात. त्यांच्या ह्या नीटसपणाच्या आवडीला क्वचित् पोषाखीपणाचा वास येतो — नाहीं असें नाहीं. विशेषतः त्यांच्या अगदीं पहिल्या पहिल्या ललित-निबंधांतील भाषेत तर थोडासा नाटकीपणाहि आलेला आहे — परंतु एकंदरीनें पाहतां ह्या नीटसपणाच्या मागें त्यांची चोखंदळ सौंदर्यदृष्टीच होती असें प्रत्ययाला येतें.

संतांनीं अगदीं प्रथम प्रथम तरी आपले ललित-निबंध लिहितांना प्रो. ना. सी. फडके ह्यांच्या गुजगोष्टी डोळयांसमोर ठेवल्या असाव्यात असें वाटतें. आणि हें एका परीनें स्वाभाविकच होतें. एक तर प्रो. फडके ह्यांनीं आपल्या गुजगोष्टींनीं ललित-निबंधलेखनाचा एक उत्तम आदर्श १९३० च्या सुमारासच — म्हणजे संतांच्या लेखनाच्या उमेदवारीच्या काळांतच निर्माण केलेला होता. तेव्हां त्याचा मोह संतांसारख्या तरुण लेखकाच्या मनाला होणें अपरिहार्य होतें. शिवाय संतांची लेखनप्रकृति ही प्रो. फडक्यांच्या लेखन-प्रकृतीशीं जमण्यासारखीही होती. म्हणूनच प्रो. फडक्यांच्या शैलीच्या अनुकृतीनें जरी त्यांनीं आपल्या ललित-निबंधलेखनाला प्रारंभ केलेला असला तरी थोड्याच अवधींत ते त्या शैलींतीलच परंतु उच्चांक गांठूं शकले व तिला स्वतःचें असें स्वतंत्र वळणहि लावूं शकले. बोरकर हे तांब्यांचे वारस खरे : परंतु त्यांच्या काव्यांत ज्याप्रमाणें तांबे घराण्यांतील काव्यगुणांचा प्रकर्ष झालेला आढळतो व म्हणूनच त्यांच्या प्रतिभेचें आगळेपण विशेषत्वानें डोळ्यांत भरतें, त्याच-प्रमाणें ना. मा. संतांच्या शेवटच्या ललितनिबंधांतून — विशेषतः त्यांनीं आपल्या मृत्यूपूर्वीं लिहिलेल्या सात आठ ललितनिबंधांतून त्यांची प्रतिभा ललित-निबंधलेखनाला कसें स्वतःचें असें स्वतंत्र आकर्षक रूप प्राप्त करून देत होती ह्याचा चांगलाच प्रत्यय येतो. संतांची लेखनप्रकृति ही ललित-निबंधलेखनाला साजेशीच होती. ह्या प्रकृतीचा ऐन विकास होत असतांच त्यांना मृत्यु आला हें दुर्दैव : ते जगते वाचते तर ललित-निबंधलेखनांतील कांहीं अत्युच्च शिखरें

त्यांच्या प्रतिभेनें पुढें मागें गांठली असतीं असें मानायला भरपूर जागा आहे. त्यांचे असंग्रहित असे शेवटचे ललित-निबंध शक्य तों लवकर संग्रहित व्हावयाला हवेत : ललितनिबंधलेखनाच्या आजच्या पडत्या काळांत संतांसारख्या हाडाच्या सच्च्या ललितनिबंधलेखकाची उणीव तर विशेषत्वानेंच भासते.

वा. ल. कुलकर्णी

शांति देवल

उघडे लिफाफे

## वाऱ्याची झुळूक

" आयुष्याचा कंटाळा आला बुवा ! " अशी वारंवार तक्रार करणाऱ्या एका खुशालचेंडू गृहस्थास एका बड्या लेखकानं विचारलं, " आठवड्याकांठीं किती पत्रं येतात तुला, सांग पाहूं ? "

या प्रश्नाला पहिल्या गृहस्थानं काय उत्तर दिलं तें माझ्या स्मरणांत नाहीं ; पण त्यानं नकारार्थी मान हालवली असावी असा माझा अंदाज आहे.

असा अंदाज बांधण्यांत मीं मोठा अचूक तर्क लढविला अशांतला भाग नाहीं. तो कुणीहि लढवील. कारण विचारलेल्या प्रश्नांतच हा अभिप्राय व्यक्त झाला आहे.

खरोखर, अशा तऱ्हेचे प्रश्न परिस्थितीवर केवढा अचूक प्रकाश टाकतात ! म्हणूनच असे प्रश्न विचारणारांना, नाडी पाहातांच रोगाचं बिनचूक निदान करणाऱ्या धन्वंतरीची उपमा द्यावीशी वाटते.

रोग, निदान, नाडी, इत्यादि शब्दांच्या साहाय्यानं मला ज्याचं वर्णन सूचित करावयाचं आहे तो व्यवहार हा संसाराच्या सोयीसाठींच संसाराच्या पोटीं जन्माला आला आहे, ही गोष्ट मला कबूल आहे. पण जीवनाला स्थिरता आणून देणाऱ्या या व्यवहारानंच पुष्कळ वेळां जीवनाला रुक्ष आणि नीरस स्वरूप प्राप्त झालं आहे, हेंहि तितकंच खरं ! आयुष्य टापटिपीचं व्हावं या हेतूनंच आपण हें व्यवहाराचं वेळापत्रक आंखलं आणि मोठ्या धोरणानं त्यांत छोट्या आणि मोठ्या सुट्या घातल्या. पण आंखलेल्या तासाप्रमाणं सुट्याहि आंखलेल्याच असल्यामुळं सुट्यांचं अर्धअधिक स्वारस्य निघून गेलं आहे. सुटी व्हायची ती घंटेबरोबर आणि संपायची तीहि घंटेबरोबरच. घंटेच्या बंधनांनीं जखडलेल्या या घटकेला सुटी असं म्हणायचं तरी कसं !

तसं म्हटलं, तर आपण आपल्या जीवनाला सर्व बाजूंनीं मर्यादा घालून घेतलेल्या असतात. श्रीरामाच्या साहाय्यार्थ निघण्यापूर्वी आश्रमापुढं बाणानं रेघ ओढून " याबाहेर जायचं नाहीं " अशी ताकीद लक्ष्मणानं जानकीला दिली होती. तशीच कांहींशी ताकीद आपण आपल्याला लावून घेतलेली असते. तीनशें पासष्टांपैकीं तीनशें पन्नास दिवसांतल्या कोणत्याहि दोन

दिवसांचा कुणाचाहि दिनक्रम तुम्ही ताडून पाहा, त्यांत फारसा फरक असलेला तुम्हांला दिसणार नाहीं. कपबशांच्या किणकिणाटांत होणाऱ्या प्रबोधनापासून तों मच्छरदाणीचा पडदा शय्येभोंवतीं पडेपर्यंत प्रत्येक मनुष्य हा आपल्या आंखीव परिघांत घाणा ओढीत असतो.

माझ्या या म्हणण्याचं प्रत्यंतरच पाहायचं असेल तर या कोंपऱ्यावरल्या चाळीवरून सकाळच्या आठच्या सुमारास तुम्ही केव्हांहि चक्कर मारा. वरच्या गॅलरींत आमचा मित्र तुम्हांला श्मश्रू करतांना आढळेल. गुडघ्या-इतका पंचा लावून कमरेला किंचित् बाक देत, क्षणांत एक तर क्षणांत दुसरा गुडघा मोडून समोरच्या आरशाच्या अनुसंधानानं गालावर वस्तरा फिरवतांना तुम्ही त्याला पाहाल. आणि क्षणभर तुम्ही तेथेंच थांबलांत तर दाढी आटोपतांच जवळचा पोपटाचा पिंजरा घेऊन लगबगीनं न्हाणीकड जातांना तो तुमच्या नजरेस पडेल. हा त्याचा कार्यक्रम महिनेन् महिने, वर्षानुवर्षं अगदीं अस्साच चालू असलेला मीं पाहिलेला आहे. आणि आमच्या दोघांच्याही आयुष्याची दोरी जर बळकट असेल तर आणखीहि कैक वर्षं मी तो पाहीन.

त्याच त्याच वेळीं तीच तीच गोष्ट करण्याचं कसब ज्याच्या अंगीं उत्तम बाणलं आहे अशांपैकीं एक गृहस्थ माझ्या शेजारच्या खोलींत राहात असतात. त्यांनीं मला अनेक वेळां जी एकच गोष्ट रंगवून सांगितली आहे ती ही—

"आपल्याला दादरहून चर्चगेटला ऑफिसला जावं लागतं. तेव्हां गाडी गांठण्याच्या गडबडींत निवान्तपणानं पान खाणं कांहीं आपल्याला जमत नाहीं; म्हणून तो कार्यक्रम आपण गाडींतच करायचा परिपाठ घातला आहे. वसईहून येणारा आपला एक मित्र अनायासेंच तेथून कळीदार पानं आणतो आणि सातारी जर्दा जवळ बाळगायचं आपण अंगावर घेतलं आहे. यामुळं हा जम अगदीं जमलेल्या पानाइतका फक्कड बसला आहे. जागेवर बसून पान खाऊन, जर्द्याची चिमूट तोंडांत टाकीपर्यंत परळ येतं, तर महालक्ष्मी येईपर्यंत आपला विडा 'अस्सा' जमलेला असतो. अगदीं रेल्वे टाइम-टेबल हें! आणि असा जर विडा जमला तर ऑफिसांत जाऊन साहेबाचा मोहरा पाहीपर्यंत आपण त्याच तंद्रींत असतों. पण महालक्ष्मीपर्यंत जर का तो जमला नाहीं तर मात्र त्या दिवशींचा बार हुकला हें निश्चित!"

विशिष्ट गोष्टी विशिष्ट वेळीं करण्याची सक्ति आपण आपल्यावर केल्यामुळं

आपण आपल्या जीवनाच कटकटी घड्याळ करून टाकलं आहे. सर्वसाधारण अशी ही कुणाचीहि दिनचर्या पाहा. ऑफिसकरितां म्हणून ठराविक वेळीं एका विशिष्ट ठिकाणीं जायचं आणि जातांना त्याच त्याच गोष्टी करायच्या. संध्याकाळीं त्याच ठरीव ठिकाणीं फिरायला जायचं आणि त्याच मित्रांशीं त्याच त्या विषयांवर वाद करून तींच तीं मतं बोलून दाखवायचीं. गप्पांना विशेष रंग भरलाच तर त्याच त्या कोट्या आणि तोच तो विनोद व्हायचा. घरींहि त्याच त्या गोष्टींची तीच ती विचारपूस! ही "त्याच त्या"ची यादी ज्याची त्याला मुखोद्गत असते!

निराळ्या तऱ्हेनं सांगायचं म्हटलं, तर असं म्हणतां येईल, कीं त्याच त्या गोष्टींच्या भिंती आपण आपल्याभोंवतीं उभारून स्वतःला तुरुंगवास प्राप्त करून घेतला आहे. विशिष्ट आचारविचारांच्या मर्यादेचे समुद्र भोंवतीं खेळवून विजनवासी क्रूसोसारखी आपण आपली स्थिति करून घेतली आहे. संघांत राहूनहि एकलेपणा आणि मोकळेपणा असूनहि तुरुंगवास, अशी कांहीं विचित्र स्थिति आपली झाली आहे. मग या विजनवासांत दुसऱ्याच्या सहवासाची भूक आणि या बंदिस्त तुरुंगांत मोकळेपणाची तहान आपल्याला तीव्रतेनं लागलेली असावी, यांत नवल तें काय! कोठडीच्या झरोक्यांतून बाहेरल्या जगाची साद आपणाला येईल कीं काय, या आशाळभूतपणानं आपण कान टवकारून झरोक्याकडे पाहात असतों, तर विजनवासाच्या सीमेवर थडकणाऱ्या समुद्रावर कुणाचं तरी गलबत केव्हां तरी दिसेल या आशेनं आपण क्षितिजाकडे डोळे लावून बसलेले असतों.

ही एकलेपणाची आग लागल्याची कुरकूर प्रत्येकजण केव्हां ना केव्हांतरी दुसऱ्याजवळ करतांना आढळतो. या आगीचा दाह ज्या कांहीं गार फुंकरींनीं मंदावला आहे त्यांत पत्रांची फुंकर ही अत्यंत दाहशामक ठरली आहे यांत शंका नाहीं. कुणाचंहि पत्र पोस्टमननं हातांत आणून दिल्यावर कोणत्याहि मनःस्थितींतल्या माणसाचा चेहरा फुलल्याशिवाय राहाणार नाहीं. कितीहि महत्त्वाच्या कामांत तो गढलेला असो, पत्र आल्याचं ऐकतांच तो तें बाजूला सारून प्रफुल्ल मनानं पत्राचं स्वागत करायला धावेल. क्षणभर तरी काम बाजूला सारायचं गोड निमित्त पत्रं देतात, हें काय थोडं आहे? क्षणभरच कां होईना, पण या मळलेल्या चाकोरींतून

बाजूला जायची संधि मिळावी हाहि पत्राची वाट पाहाण्यांत हेतु असावा.

माझीच गोष्ट घेतलीत, तर सकाळच्या जेवणापूर्वी जी एक डाक येत असते तिला एक तरी आपलं पत्र असावं असं मला मनापासून वाटत असतं. जेवणापूर्वी पत्र हातीं लागलं, कीं त्यांतलं मनोहर वातावरण स्नान-जेवण होऊन ऑफिसच्या कामाला जुंपेपर्यंत मनांत घोळत राहातं आणि त्याच नशेंत मी रोजचे व्यवहार अतिशय आवडीनं करूं लागतों. अशा वेळीं त्याच त्याच गोष्टींचा कंटाळवाणा भाग लुप्त होऊन त्या ठिकाणीं कांहीं नवीनच आकर्षण उद्भुत झाल्याचं माझ्या प्रत्ययाला येतं. आणि या गोड शिरशिरींतच ऑफिसांतून घरीं परतेपर्यंत मी असतों. सकाळप्रमाणं संध्याकाळींहि दारांत पाऊल ठेवतांच माझी नजर जी टेबलाकड वळत असते, ती तेथें किती पत्रं माझी प्रतीक्षा करीत आहेत हें शोधण्यासाठींच! आणि त्या वेळीं जर का माझी निराशा झाली तर संध्याकाळीं लहरीनं आपल्या आवडीच्या गोष्टी करतांनाहि मनाला कसलीतरी हुरहूर लागून राहाते.

पत्राची ही अशी चटक प्रत्येकाला थोड्याफार प्रमाणांत लागलेली असतेच; आणि ती तशी लागावी हें अत्यंत स्वाभाविकच नाहीं का? कारण आपल्यापेक्षां निराळ्या अशा प्रदेशांत विहार करणाऱ्या, आपल्यापेक्षां विचारविकारांनीं कांहींशा भिन्न अशा रम्य व्यक्तीचं दर्शन आपल्याला पत्रावाटेच घडत असतं. आपल्याप्रमाणं त्याहि व्यक्तीचा वास हा विजनवासच असेल, आपल्याप्रमाणें तिनंहि आपल्याभोंवतीं आचार-विचारांचे तट उभारलेले असतील, पण केवळ निराळेपणामुळं या त्यांच्या विजनवासाला केवढं रमणीय स्वरूप प्राप्त झालेलं असतं! आणि म्हणूनच त्यांचे अनुभव, त्यांच्या भावना, त्यांचे विचार त्यांच्या पत्रांतून वाचतांना आपल्याभोंवतालच्या ठराविकाच्या भिंती अंतर्धान पावतात आणि "त्याच त्या" पणाच्या मर्यादा पांगत पांगत क्षितिजाच्या अंतःसीमेंत विलीन होतात! आणि म्हणूनच दूरस्थ प्रदेशांतून वाहात आलेली ही वाऱ्याची झुळूक गुदमरलेल्या जीवाला हुषारी आणते आणि आकाशांतल्या मेघांतून झालेलं हें जलसिंचन जीवाला सुखावह होतं!

दूरच्या प्रदेशावरून वाहात आलेली वाऱ्याची झुळूक असं मीं पत्राचं वर्णन केलं तें माझं मलाच अति समर्पक वाटतं आणि इतरांनाहि तें मला

पटवून देतां येईल. सध्यां आतां मेच्या सुरुवातीचा आठवडा सुरू आहे; तेव्हां मुंबईत किती काहिली होत असेल याची कल्पनाच केलेली बरी. घामाचा असा अनन्वित त्रास होत असतांहि ऑफीससाठीं म्हणून मी अंगावर सूट चढवीत होतों, तोंच माझ्या हातांत पोस्टमननं पत्र आणून दिलं. कपाळावर डबडबलेला घाम पुसण्याकरितां म्हणून हातांत घेतलेला टॉवेल मीं वर केला होता, तो पत्रावरचा शिक्का पाहातांच तसाच राहिला. माथेरानचा शिक्का होता पत्रावर. मग मीं टायची गांठ अर्धवट ठेवूनच तें पत्र वाचून पुरं केलं. त्या पत्रांत कितीतरी गोष्टी महत्त्वाच्या होत्या, पण त्यांतल्या ज्या तीन-चार ओळींनीं माझें मन भारून टाकलं त्या अशा—

"सध्यां येथली हवा किती आल्हादकारक आहे म्हणून सांगूं! आम्ही तर भर दुपारीं सहल करायला म्हणून बाहेर पडतों आणि बाजूच्या रस्त्याला एखादा सावलीखालचा पूल हेरून त्याच्या कट्ट्यावर खुशाल ताणून देतों. तांबडे टीपदार रस्ते, हिरवींगार झाडं, निळं आकाश आणि चमकदार ऊन—फक्त तूंच एक कमी आहेस..."

मग त्या दिवशीं भर उकाड्याच्या मुंबईत वावरत असतांहि आपण माथेरानच्या डोंगर-पठारावर वावरत आहों असं मला वाटत राहिलं!

मागें कायदेभंगाच्या चळवळींत पडायचा ठाम निश्चय करूनहि आईच्या आजारीपणापुढं मला त्यावर तिलांजलि सोडावी लागली. पण त्या गोष्टीचं शल्य माझ्या मनांत इतकं खोल रुतून बसलं, कीं त्या एकाच बोचणीमुळं मला जीवित दुःसह वाटूं लागलं. आणि त्याच वेळीं कायदेभंग करून तुरुंगांत गेलेल्या माझ्या एका मित्राचं तुरुंगांतून आलेलं पत्र मला मिळालं नसतं, तर माझा हा असंतोष कोणत्या थराला गेला असता कुणाला ठाऊक!

वैमानिक शिक्षणाकरितां लंडनला गेलेल्या माझ्या मित्राच्या पत्राची वाट तर मी चातकासारखी पाहात असतों आणि गोकाक येथें मजुरांना संपावर नेणाऱ्या माझ्या एका भाई मित्राचें पत्र गेल्या पंधरवड्यांत नाहीं म्हणून कोण तळमळ लागून राहिली आहे मला!

अशा अनेक येणाऱ्या पत्रांकडे माझे डोळे लागून राहिले आहेत; कारण जितक्या अधिक दिशांवरून वाऱ्याच्या झुळुकी वाहात येतील तितका हा संसारताप मला अधिक सुसह्य होईल!

# कात्री

**कोठल्यातरी** वर्तमानपत्रांत एका लेखिकेनं स्त्रियांना मोठा मजेशीर सल्ला दिल्याचं मला स्मरतं. सुटीच्या दिवशीं मंडळी घरीं असतात. आणि त्यांना दुपारच्या विश्रांतीची अत्यंत जरुरी असते; पण घरांत दोन-तीन मुलं असलीं तर दुपारींच त्यांच्या दंगलीला ऊत येतो आणि विश्रांति मिळणं कठीण होतं. अशा वेळीं मुलांच्या हातांत एक एक कातर द्यावी आणि त्यांजपुढं निकामी वर्तमानपत्रांचा ढीग पसरून ठेवावा; मग त्यांच्या खोलीला बाहेरून कडी लावून घरांतल्या मंडळींनीं दोन-तीन तास खुशाल विश्रांति घ्यायला हरकत नाहीं.

माझ्या घरांत मुलं आणि लेखिकेनं सुचविलेली सामुग्री असूनहि हा प्रयोग झाल्याचं मला आठवत नाहीं आणि तसा तो इतर किती जणांनीं करून पाहिला असेल याचाहि मला अंदाज नाहीं. पण या चतुर लेखिकेनं सुचविलेल्या या उपायाचं यश प्रयोगांनीं पडताळून पाहाण्याची किंचितहि गरज नाहीं असं माझं प्रामाणिक मत आहे. कारण हरतऱ्हेच्या खेळण्यांनीं न समजणारं मुलाचं मन कात्री हातीं लागतांच हर्षभरानें फुलून येतं हा अनुभव प्रत्येकाचाच आहे. कितीहि तऱ्हेवाईक आणि मन रिझवणारं खेळणं तुम्ही मुलांना आणून द्या, चारदोन दिवसांपलीकडे तीं तें हातांत धरतील असं मला वाटत नाहीं. नवीनपणाची जादू जोंपर्यंत त्यांत आहे तोंपर्यंतच त्याची बालमनाला आसक्ति वाटते. एकदां का त्याचा नवीनपणा जून झाला, कीं झालीच त्याची रवानगी खेळाच्या खोक्यांत. माझ्या घरांत जें खेळाचं खोकं आहे त्यांतलीं बहुतेक खेळणीं धड असूनहि पेन्शनींत निघालीं आहेत. मला वाटतं, बालमनाच्या या प्रवृत्तीचा उगम त्यांच्या स्वाभाविक चंचलपणांत असावा. कदाचित् नावीन्याची आवड हेंहि त्याचं कारण असूं शकेल. पण तें कांहीं जरी असलं, तरी कोणत्याहि कारणामुळं बिनसलेलं माझ्या चिरंजिवाचं मन खोकंभर खेळापेक्षां नुसत्या कात्रीच्या दर्शनानं हरपावं हें किती विलक्षण ! आणि ही गोष्ट माझ्या नित्यांतल्या अनुभवाची असल्यामुळं मी त्या चतुर लेखिकेचं म्हणणं प्रयोग न करतांहि मान्य केलं आहे.

या सूचनेचा बिनचूकपणा मला बिनशर्त मान्य असला, तरी तो प्रयोग मीं अजून करून पाहिला नाहीं आणि लेखिकेनं ज्या कारणास्तव तो करून पाहायला सांगितला, त्या कारणास्तव तर तो मी करून पाहीन कीं नाहीं याबद्दल शंकाच आहे. पण इतरांनीं तो अवश्यमेव करून पाहावा अशी माझी त्यांना आग्रहाची शिफारस आहे. तो करून पाहावा असं जें मीं म्हटलं, त्यांतल्या ‘ करून ’ आणि ‘ पाहावा ’ या दोन्ही शब्दांचा अर्थ अगदीं अलग घ्यायचा हें मात्र त्यांनीं विसरूं नये. मला असं म्हणायचं आहे, कीं तो करावा आणि पाहावाहि. कारण प्रयोग केल्यानं जर विसाव्याची जोड होणार असेल तर पाहिल्यानं सुखाची जोड होणार आहे यांत संदेह नाहीं. मी जरी अजून मुलांच्या हातीं कागद-कात्र्यांचीं साधनं देऊन निर्बंधपणं करामत करायला त्यांना खोलीचा ताबा देऊन पाहिला नसला, तरी तसा तो दिला तर दाराच्या फटींतून किती मनोरंजक दृश्य दिसेल याबद्दल माझी पुरेपूर खात्री आहे. मोकळ्या खोलींत एक निवान्त कोंपरा गांठून आपापल्या कर्मांत कांहीं छोट्या व्यक्ति गढून गेल्या आहेत, एका बाजूला धड कागदांची तर दुसऱ्या बाजूला तऱ्हतऱ्हेनं कापलेल्या कागदांची रास पडली आहे; कापलेल्या अथवा कापावयाच्या कागदांपेक्षां कापल्या जाणाऱ्या कागदावरच कातर चालविण्यांत ज्यांचा लय लागला आहे, आणि आपल्याशिवाय दुसरं कोणी या खोलींत आहे याची शुद्ध गेल्यानं आपण, कागद आणि कात्री यांचंच अस्तित्व जमेस धरून ज्यांचा कारभार चालला आहे अशांची विश्वकर्म्यालाहि लाजविणारी ही सविकल्प समाधि पाहून कोणत्या महाभागाचं अंतःकरण आनंद आणि कौतुक यांनीं फुलून येणार नाहीं ! मला तर ही संधि साधून निद्रासुखाचा अनुभव घेण्यापेक्षां दृष्टिसुखाचा आनंद लुटण्याचा मोह अधिक होईल.

कात्रीनं खेळण्याचा मोह केवळ बाबालोकांनाच होतो असं नाहीं. तो मोठ्यांनाहि होत असतो. नाहींतर योग्य बंदोबस्तांत ठेवलेल्या माझ्या दाढीच्या सामानांतील कातर हरवली म्हणून तक्रार करण्याचा प्रसंग मजवर वरचेवर आला नसता. कोलमन फॅशनची कोरीव मिसरूड ठेवणारांना दाढीसामानांत कात्रीला केवढं महत्त्व असतं हें समजावून सांगायची जरूर नाहीं. एकवेळ वस्तरा हरवला तर दुसऱ्याच्या वस्तऱ्यावर वेळ मारून

नेतां येईल; पण श्मश्रुसाधनांतली कात्रीच हरवली तर त्या दिवशींचं कर्म कठीण! मी तर आतांपर्यंत अव्याहत 'नेझल' चीच छोटी कात्री वापरीत आलों आहें आणि एकवेळ स्ट्रॉप केल्याशिवाय वस्तऱ्यानं मी दाढी करीन, पण दाढी केल्यानंतर कात्रीच्या पात्यांना व्हॅसलीन लावल्याशिवाय मला चैन पडणार नाहीं. तिची निगा इतक्या आस्थेनं ठेवल्याशिवाय तिचा तिखटपणा टिकणार नाहीं आणि तसा तो टिकला नाहीं तर तिजकडून इतकं नाजूक काम घेतां येणार नाहीं. पण इतकी खबरदारी बाळगूनहि कात्री आयत्या वेळीं अचूक हाताला लागली आहे असं क्वचितच झालं आहे. आणि मग ओरड केल्यावर जी कात्री हातीं लागावयाची ती नको त्या वस्तूवर चालवून बोथटलेली! तसं म्हटलं, तर घरांत कांहीं नाहीं तरी अर्धा डझन कात्र्या नेहमींच असतात; पण केव्हांहि पाहिलं तर त्यांचीं हाडं खिळखिळीं झालेलीं. अवास्तव वापर हेंच त्याचं कारण. सांगायचं हें, कीं इतकं असूनहि शेवटीं उंचावर ठेवलेल्या माझ्या कात्रीवर गदा यायची हें ठरलेलं. आजपर्यंत माझ्या सहा कात्र्या निकामी ठरल्या त्या काय उगीच?

पण कातर खराब केली म्हणून मी सहसा कोणावर रागावलों नाहीं आणि रागावलों असलों तर त्याबद्दल नंतर मला मनांतल्या मनांत वाईटहि वाटलं आहे. कारण असं, कीं कांहीं तरी करायचं म्हणून आपण कात्रीशीं चाळा करीत असतों असं मला वाटत नाहीं. प्रत्येकाच्या स्वभावांतच अशी कांहीं एक प्रवृत्ति आहे, कीं जिचं स्वरूप या चाळ्यांत यथार्थपणें व्यक्त व्हावं. समोर चौरस कागद पडलेला असावा आणि कात्री हातांत असावी. मग त्या कागदाचे निरनिराळ्या आकाराचे कपटे केल्याशिवाय कुणालाहि सहसा राहावणार नाहीं. याचा अर्थ असा, कीं जो पदार्थ जसा आपल्या हातीं लागला, त्याच स्वरूपांत तो असावा हें आपल्याला मान्य नसतं. तो तसा नसावा, त्याचं स्वरूप आपल्याला वाटतं तसं असावं असं आपल्याला वाटत असतं. कुणी तरी अन्य शक्तीनं वस्तु आहेत त्याच स्वरूपांत आपल्यावर लादाव्यात हा एकप्रकारें आपला उपमर्दच नाहीं का? निसर्गानं त्या त्या वस्तूंना तें तें स्वरूप देऊन जणूं कांहीं आपला शिक्काच त्यावर मारला आहे आणि निसर्गावर मात करावयाची असेल तर त्या त्या वस्तूंवर आपलीहि कांहीं खूण असावी असं आपल्याला नकळतपणं वाटत असावं!

मीं वर्णन केलेल्या या वृत्तीला कांहींजण अहंकार असं नांव देतील. त्यांनीं तें तसं दिलं, तरी त्या वृत्तीचं महत्त्व कोठल्याहि प्रकारें कमी होतं अशांतला भाग नाहीं. कारण ज्या या वृत्तीमुळं आहे त्या वस्तूंचं आहे तें स्वरूप मान्य करायला आपण तयार होत नाहीं, त्या या वृत्तीमुळेंच आपण तिला नवीन स्वरूप द्यायला उद्युक्त होतों. नवीन स्वरूप द्यावयाची इच्छा, नवीन कृति घडवायची मनीषा—कांहीं जरी म्हटलं तरी नवीन निर्माण करण्याची शक्ति अहंकारांतच संभवते! आणि ज्या अनेक स्वरूपांत ही शक्ति व्यक्त होते त्यांत कातर-काम हेंहि अत्यंत महत्त्वाचं समजलं जातं. कातर चालविण्याची धडपड लहानापासून थोरापर्यंत जी चाललेली असते ती याच कारणामुळं. आणि या वृत्तीला वाव करून द्यायचा म्हणून वेळीं अवेळीं आपण कात्री चालविण्याची संधि घेत असतों.

कातर चालविण्याची ही प्रवृत्ति आपण योग्य रीतीनं जोपासली तर आपणांतून कातर-कामाचे तज्ज्ञ निर्माण होतील. या संसारांत कातर-कामाचं महत्त्व काय आहे हें काय सांगायला पाहिजे? कातर-कामाच्या विलासानं आपण गृहाला आणि देहाला शोभा आणली आहे. निरनिराळ्या रंगाच्या कागदांना निरनिराळे आकार देऊन त्यांच्या नयनमनोहर चिजा बनविणारे जपानी आणि आकारहीन कापडांतून मनपसंत कपडे बनविणारे शिंपी यांची जात एकच म्हटली पाहिजे.

शिंप्यांच्या दुकानांत काय किंवा कातर-काम करणारांच्या दुकानांत काय, दोन्हीकडेहि कात्रीचंच अधिराज्य! शिवणाराचं वर्णन करायचं झालं, तर यंत्रावर बसलेलं यंत्र असंच करावं लागेल. बेतलेला कपडा जमवून सुईच्या पट्टीखालीं सरकवीत जायचं येवढंच त्याचं काम! पण बेतणाराचं तसं नाहीं. बुद्धीची कल्पकता आणि हातांचं कौशल्य यांचा मेळ घालूनच कात्री चालवावी लागते त्याला. तशी ती चालवतां आली तरच कपड्यांचे काट आणि घाट लोकांच्या पसंतीस उतरतील.

पण ज्याप्रमाणं दोन घड्याळांचा मेळ कधींहि पडायचा नाहीं त्याप्रमाणें दोन शिंप्यांचे काट कधींहि सारखे यायचे नाहींत. दोन शिंप्यांकडे आपला एक एक कोट शिवायला देऊन पाहा, म्हणजे माझ्या म्हणण्याचं प्रत्यंतर तुम्हांला पटेल. दोघांनींहि शिवलेल्या कोटांची तऱ्हा आणि घाट एकच

असला, तरी त्यांत निराळेपणा हा असणारच. प्रत्येक शिंप्यानं शिवलेल्या, बेतलेल्या कपड्यांत त्याचं व्यक्तित्व व्यक्त होतं तें असं !

ठराविकांतून व्यक्तित्व फुलवणं, त्यावर आपल्या वैशिष्ट्याचा छाप मारणं यालाच आपण नव-निर्मिति असं नांव देत नाहीं का ? सर्वसाधारण वस्तुमात्रावर आपल्या व्यक्तित्वाचा मुलामा जर आपणांला देतां आला, तरच आपण इतरांना नावीन्याचा आनंद देऊं शकूं. आणि हें व्यक्तित्व सिद्ध करण्याचं शिंप्याचं एकमेव साधन म्हणजे त्याच्या हातांत असलेली कात्री ! म्हणूनच मला वाटतं, कीं एखाद्या तज्ज्ञ शिंप्यानं कर्तनकलेचं प्रतिभासाधन लिहिलं, तर त्यांत तो कात्रीच्या विलासाचं वर्णन अत्यंत तन्मयतेनं करील. आणि हें अत्यंत तन्मयतेनं केलेलं कात्रीच्या विलासाचं वर्णन प्रतिभेच्या विलासाला तंतोतंत लागू पडेल याबद्दलहि मला शंका वाटत नाहीं. कारण असं, कीं ललितकृति निर्माण करतांना लेखकाला शिंप्याप्रमाणंच कात्रीचा अत्यंत कुशलतेनं उपयोग करावा लागतो. अशा अभावितपणानं मी ललितलेखकांच्या हातांत कात्री दिलेली पाहून पुष्कळांना विस्मयाचा आणि कदाचित् रागाचा झटका येण्याचा संभव आहे. पण त्यांनीं थंडपणें विचार केला तर त्यांना कळून येईल, कीं जिला मीं कात्री असं संबोधलं, ती शिंप्याच्या हातांतली पोलादाची कात्री नव्हे आणि ती मीं त्यांच्या हातांत दिलेली नाहीं; ती निसर्गानंच त्यांच्या हवालीं केली आहे. कारण असं पहा, कीं जीवनपटांतून ललितकथेचा चित्रपट तयार करतांना लेखकाला विशिष्ट हेतूची कात्रीच चालवावी लागते. हजारों प्रसंगांतून आणि हजारों व्यक्तींतून आपल्या ध्येयाला परिपोषक अशाच व्यक्ति आणि असेच प्रसंग लेखकाला निवडून घ्यावे लागतात. आणि निवडलेल्या प्रसंगांस तरी कोठें आणि कशी कात्री लावावी लागेल याचा नेम नसतो. म्हणूनच मला असं म्हणावंसं वाटतं, कीं ललितकृति हें लेखकांनीं तयार केलेलं एक चिकटबूकच आहे. त्यांत जीवनाच्या दैनिकांतून घेतलेलीं कात्रणं लेखकानं एका विशिष्ट पद्धतीनं जुळवून डकवलेलीं असतात.

तेव्हां कात्रीचा प्रभाव वाङ्मयांतहि आहेच आणि म्हणून भविष्यकालांत एखादा शिंपी यशस्वी वाङ्मयभक्त झाल्याचं किंवा एखादा वाङ्मयसेवक शिंप्याचा धंदा किफायतशीरपणें करूं लागल्याचं आपल्या आढळांत आलं तर आश्चर्य मानण्याचं कारण नाहीं !

# चाळिशी

त्या दिवशीं मी घरीं परतलों तो खिन्न मनःस्थितींतच !

कपडे काढले नि मी खुर्चीतच बसून राहिलों. वास्तविक तो दिवस रविवारचा होता आणि घड्याळ दहाचे ठोके देत होतं. ती वेळ दुसऱ्यांदा चहा घ्यायची होती. एरवीं या वेळीं मी स्वयंपाकघरांत बसून चहा वसूल करायच्या खटपटींत असायचा ! पण मला कांहीं सुचतच नव्हतं. मला एक शंका आली. मीं टेबलावरचा आरसा पुढं घेतला आणि त्यांत स्वतःकडे निरखून पाहूं लागलों.

"इश्श ! चहा निवून चाललाय् म्हटलं घरांत." मला माझ्या पत्नीनं हटकलं तेव्हां कुठं मी भानावर आलों. ती पुढं म्हणाली, "आरशांत काय एवढं न्याहाळून पाहातां ? घरांत नाहीं वाटतं यायचं ?"

मीं तिजकडे पाहून एक सुस्कारा टाकला आणि पुढ्यांतील आरसा त्याच्या ठिकाणावर सरकवीत तिला म्हटलं, "चल, आलोंच."

मीं आंत जाऊन चहाला सुरुवात केली, पण आज आमचं कांहीं बोलणंच निघेना. तिनं एक-दोनदां कांहीं तरी बोलायला सुरुवात केली, पण त्यांत माझं चित्त लागत नाहीं हें तिच्या लक्षांत यायला वेळ लागला नाहीं. तिनं मला विचारलं, "आज मनांत कांहींतरी घोळतंयू. खरं ना ?"

"कशावरून ?" मीं हसण्याचा प्रयत्न केला.

"या तुमच्या हसण्यावरूनच. हें कांहीं तुमचं रोजचं हसं नाहीं." आणि मग तिनं अभिनय करीत विचारलं, "मला नाहीं सांगायचं वाटतं ?"

तिचा तो अभिनय पाहून आणि विचारण्याचा स्वर ऐकून आपण इतका वेळ गप्प बसलों हें मोठं पातक केलं असं मला वाटूं लागलं.

मी म्हणालों, "डॉ. देशपांड्यांच्याकडे गेलों होतों ना ! त्यांनीं चष्मा घ्या म्हणून सांगितलं."

"हात्तेच्या ! एवढंच ना ! मग त्यांत एवढं लावून घेण्यासारखं काय आहे ?" तिनं सुटकेचा निश्वास टाकीत विचारलं.

"कां बरं ! मी आतां चाळिशीच्या घरांत आलों ना. म्हातारपण व्हायला लागलं." मीं चहा संपवीत हंसत उत्तर दिलं.

“तर, म्हातारपण व्हायला लागलं म्हणे. कुठलं म्हातारपण? या मे महिन्यांत वयाला ...”

तिनं माझ्या वयाचा हिशेब दाखवीत माझं विधान खोडून काढण्याचा प्रयत्न केला.

पत्नीच्या हिशोबाप्रमाणं मी चाळिशीच्या घरांत आलों नसलों तरी शरिराच्या दृष्टीनं मी चाळिशीच्या घरांत प्रवेश करीत होतों, हें मला त्या दिवशीं डॉक्टरनीं पटवून दिलं होतं. डोळ्यांवर चाळशी आली, आतां केस देखील रुपेरी व्हायला लागतील या विचारांनीं माझं मन सुन्न झालं होतं. मी घरांतील प्रत्येक आरशापुढं वारंवार थांबून पाहात होतों. अजून माझ्या काळ्याभोर मस्तकावर जरेचा रुपेरी ध्वज फडकूं लागला नव्हता. पण तो आतां केव्हां आणि कुठं चमकूं लागेल याचा काय नियम? या शंकेनं माझं मन थरारून गेलं होतं आणि याच संशयानं आरशांत वारंवार डोकावत मी स्वतःची पाहाणी करीत होतों. शेवटीं जेव्हां डाव्या कानशिलावर काळ्याभोर केसांच्या झुबक्यांत एक रुपेरी केस चमकतांना मला आढळला आणि जेव्हां त्याला मीं मोठ्या शिताफीनं उपटून काढला तेव्हां कुठं मला हायसं वाटलं.

मीं तो उपटलेला केस मोठ्या विजयोन्मादानं पत्नीपुढं ठेवला आणि म्हटलं, “पाहिलंस, सांपडला हा चोर अखेर!” चोराला जन्मठेप सुनावणाऱ्या न्यायाधीशाच्या अभिनिवेशानं मीं त्याला खिडकीबाहेर हद्दपार केला; आणि मग एकदां मोकळेपणानं खळखळून हसलों.

या रुपेरी केसाबरोबर मला माझ्या चाळशीचं शल्य जरी उपटून टाकतां आलं नाहीं, तरी त्यामुळं आलेल्या उदासीनतेचं कुसळ मीं खात्रीनं उपटून काढलं. कारण मग माझं मलाच वाटूं लागलं, कीं चष्मा लावावा लागणार यांत एवढं धास्ती घेण्यासारखं तें काय होतं? माझ्या मित्रपरिवारापैकीं कित्येकांनीं यापूर्वीच नाकावर चाळशी चढविली होती. ती ज्या दिवशीं ते प्रथम चढवून आले, त्या दिवशीं आपण तर त्यांच्या पाठीवर थाप मारून. त्यांचं अभिनंदन केलं होतं आणि त्यांच्याकडून चहाहि उकळला होता. एकादा मित्र आपल्यापेक्षां जास्त ऐट करूं लागला म्हणजे जशी त्याची आपण टिंगल करतों तशी त्यांचीहि टिंगल केली होती. आतां हे

पेन्शनरांच्या यादींत सामील झाले असा विचार चुकूनसुद्धां आपल्या मनाला शिवला नव्हता आणि त्यांच्या वार्धक्याची शंका तर आपल्याला स्वप्नांतसुद्धां आली नव्हती. उलट दृष्टि मंद झाल्याचं निमित्त करून हे आतां चष्मा लावण्याची चूषच करीत आहेत अशा नजरेनं आपण त्यांजकडे पाहूं लागलों होतों.

आणि तसं पाहिलं तर चष्मा ही एक चूषच नाहीं, तर काय? ज्यांना चष्म्याची आत्यंतिक जरुरी आहे अशा अगदीं मोजक्या लोकांची गोष्ट सोडली, तर सगळ्या जगाला चष्म्याचं जें आकर्षण वाटतं तें ती एक चूष आहे म्हणूनच. आणि चष्मा लावण्याची ही चूष ज्यांनीं म्हणून कधीं करून पाहिली नाहीं असा जीव सांपडणं कठीणच! ज्यांनीं त्यांनीं आपापल्या वयांत आपापल्या इच्छेप्रमाणं ती करून पाहिलेलीच असते. अगदीं लहानपणीं सिगारेटच्या पेटीवरील पारदर्शक कागद डोळ्यांना चिकटवून डोळ्यांवर चष्मा चढवल्याची ऐट कुणीं करून पाहिली नसेल? मराठी शाळेंत असतांना जर जुन्या बाजारांतला जस्ताच्या काड्यांचा रंगीत चष्मा विकत घेतां यावा म्हणून आपल्या फीची गल्लत करण्याचा मोह किती जणांना टाळतां आला असेल? यौवनाची मर्यादा गांठल्यावर बुजऱ्या डोळ्यांना भोंवतालचं सौंदर्य हुडकतां यावं म्हणून ज्यांनीं विल्सन गॉगल्सचा आश्रय केला नसेल अशा व्यक्ति सांपडणं कठीणच! कॉलेजच्या रम्य वातावरणांत चष्मेवाल्या हॅरोल्डला कॉलेज जीवनाचं प्रतीक समजण्याचा वेडेपणा ज्यांनीं केला नसेल असे किती सांपडतील? आणि त्याचं अनुकरण करायचं म्हणूनच कीं काय बिन् काचांचे चष्मे लावून ज्यांनीं आपलीं छायाचित्रें काढून घेतलीं नसतील असेहि विरळाच! टागोरांप्रमाणं आपल्याहि चेहऱ्यावर विचारशीलतेची छाप दिसावी म्हणून काळ्या दोऱ्याचा नाकाला चिटकवायचा चष्मा लावण्याची इच्छा ज्यांना झाली नसेल असे कुणी सांपडतील कीं नाहीं कुणास ठाऊक!

केवढं हें चाळशीबद्दल आकर्षण! ज्यांना ती लावणं अपरिहार्य होऊन बसतं ते तर ती वापरतातच, पण ज्यांना ती लावून घेण्याचं भाग्य लाभत नाहीं ते मग आपली हौस अशा तऱ्हतऱ्हेच्या आणि रंगीबेरंगी चाळश्यांवर भागवून घेतात.

चाळशीबद्दल आपल्याला जें हें विलक्षण आकर्षण वाटत असतं तें ती एका सौन्दर्यप्रसाधनाचं साधन आहे म्हणून असेल असं मला वाटत नाहीं. तर या आकर्षणाच्या मुळाशीं असणारं रहस्य माझ्या मतें अगदीं निराळं आहे.

निसर्गानं दोन्ही डोळे शाबूत दिले असतांना चष्मा लावण्याचा हव्यास प्रत्येकाला वाटत असतो, तो केवळ चष्मा एक अलंकार आहे म्हणून नव्हे; तर आपल्या डोळ्यांच्या भिंगांहून निराळ्या असणाऱ्या अशा भिंगांतून जगाकडे पाहायला मिळावं म्हणून! आपण आपल्याच डोळ्यांनीं रोज जगाचं कळत न कळत निरीक्षण करीत असतों. त्याच डोळ्यांतून दिसणारं तेंच जग पाहून आपण आपल्या अंतर्मनांत अगदीं कंटाळून गेलेलों असतों. तेंच आकाश आणि तेच ढग, तोच रस्ता आणि तीच वर्दळ, त्याच इमारती आणि तींच माणसं जशींच्या तशींच पाहून डोळ्यांना एक प्रकारचा वीट आलेला असतो. प्रत्यहीं दिसणारीं सौंदर्यं सुद्धां फिकीं वाटूं लागतात. रंगाचा रसरशीतपणाहि कमी झाल्यासारखा वाटूं लागतो. म्हणूनच डोळ्यांपेक्षां दुसऱ्या कुठल्यातरी भिंगांतून जगाकडे पाहावं आणि साऱ्या सृष्टींत ताजेपणा उत्पन्न झाल्याचं सुख अनुभवावं असं प्रत्येकाला वाटूं लागतं आणि त्या भिंगाचा गुण म्हणून म्हणा, किंवा त्या असंतुष्ट मनःस्थितीचा गुण म्हणा, पण तीं डोळ्यांवर चढविलीं, कीं सारी सृष्टि बदलल्यासारखी वाटूं लागते. जगांतील सारा रखरखीतपणा लोप पावून सगळीकडे आल्हाद पसरल्या-सारखं वाटूं लागतं. जिकडे तिकडे सुखाशेचा रंग भरल्याचा प्रत्यय येऊन पूर्वीं नजरेस न आलेलीं सौंदर्यं डोळ्यांत भरूं लागतात. अंगांत यौवन संचारलं, म्हणजे जगांत वसंत बहरल्यासारखं वाटावं तसंच कांहींसं चाळशी चढविली कीं वाटूं लागतं.

दुसऱ्या भिंगांतून जगाकडे पाहाण्याची ही प्रवृत्ति मनुष्यमात्रांत वसत असते म्हणून तर चष्म्याला एवढी अमूप लोकप्रियता लाभली आहे! आणि म्हणूनच दुसऱ्याच्या डोळ्यांतून जगाकडे पाहाण्याची धडपड प्रत्येकजण करीत असतो. चाळशी लावणं हें या धडपडीचं एक प्रत्यंतर होय. पण या प्रवृत्तीचं अनादिसिद्ध असं प्रत्यंतर जर कोणतं असेल, तर तें वाङ्मयाची आवड हें होय. दुसऱ्याच्या दृष्टीनं जगाकडे पाहायची इच्छा सर्वतोपरी जर कुठं सफल होत असेल तर ती वाङ्मयांतच. कारण वाङ्मय

म्हणजे काय? तर दुसऱ्याच्या डोळ्यांनीं पाहिलेलं जग! विशाल दृष्टीनं जें आपल्याला पाहायला मिळालं, गाढ अनुभवानं जें आपल्याला प्रतीत झालं, तीव्र तळमळीनं जें आपल्याला आकलन झालं त्याचं चित्रण लेखक आपल्या वाङ्मयांत करीत असतो; आणि तें वाचतांना आपण लेखकाच्या डोळ्यांनींच त्याचं आकलन करीत असतों.

ज्या जगांत आपण वावरत असतों त्याचंच चित्रण लेखक करीत असतो, ज्या जीवनाचे आपण सहभागी आहोंत त्याचंच दिग्दर्शन तो करीत असतो हें जरी खरं, तरी तें चित्रण आणि दिग्दर्शन नवलाईचं वाटतं याचं कारण तें एका निराळ्या दृष्टिकोनांतून केलेलं असतं हें होय. रागलोभादि विकार हे अनादिसिद्ध असले आणि मानवी स्वभाव हा सनातन असला तरी त्याचं वाङ्मयांत उमटलेलं प्रतिबिंब पाहातांना तें नावीन्यपूर्ण आणि कुतूहल-जनक वाटत असतं याचं कारण असं, कीं मानवी स्वभावाचा अनुभव घेणारं लेखकाचं मन हें प्रत्येक वेळेला भिन्न असतं आणि या भिन्नत्वाच्या सुभगतेवरच वाङ्मयाची उंची ठरत असते. म्हणूनच जुन्या विषयांचा अनुभव नवीनपणानं यावा, जीवनाचं प्रत्यंतर अधिक चटकदारपणें यावं, मानवी स्वभावाचा साक्षात्कार तीव्रतेनं व्हावा, म्हणून तर आपण सतत वाङ्मयाकडे धाव घेत असतों. प्रत्येक कलाकृति म्हणजे जीवनाकडे पाहाण्याची एक अभिनव चाळशीच आहे. तिच्या लेखकाचं व्यक्तिमत्व जितकं भव्य आणि भरीव तितकी ती चाळशी निर्मळ आणि दूरदृष्टि! आपण वाङ्मयाकडे वळतों ते केवळ दोन घटका करमणूक व्हावी म्हणून खचित नव्हे; तर या आपल्या आकुंचित वैयक्तिक जीवनांतून निसटतां यावं आणि विशाल जीवनाच्या प्रवाहांत घटका, दोन घटका डुंबण्याचं सुख लुटतां यावं या हेतूनंच. वाङ्मयाची आसक्ति जी अमर्याद वाढलेली दिसते ती यामुळंच. आणि मानवतेला या सुखाचा लाभ करून देणारे महात्मे हे मानवतेला लाभलेले दिव्यचक्षुच होत असं जर कुणीं त्याचं वर्णन केलं तर तें योग्यच होईल!

मग त्या दिवशीं संध्याकाळींच मी माझ्या चाळशीचं काम उरकायचं ठरवलं. कारण वाङ्मयाचा हा दिव्यचक्षु चढविण्यापूर्वी मला माझी अधू दृष्टि सुधारून घेणं जरूर होतं.

# पोस्टाची पेटी

एका लोकप्रिय संगीतज्ञासंबंधीं अशी गोष्ट वाचल्याचं आठवतं, कीं पाहिला शेंदूर फासलेला दगड, कीं उचलले हात नमस्काराला— अशी त्याला संवयच लागून गेली होती. त्या भरांत तो अनेक वेळां पोस्टाच्या पेट्यांनाहि नमस्कार ठोकी. ही गोष्ट ज्या वेळीं मीं प्रथमच वाचली त्या वेळीं मला खूप हसूं कोसळलं. कारण ज्यानं ती लिहिली आहे त्याला त्या संगीतज्ञाच्या संवयीची गोड कुचेष्टाच करावयाची होती. त्याला ती उत्तम साधली आहे, पण आतां मला ती गोष्ट आठवली ती अगदींच निराळ्या कारणानं.

तो संगीतज्ञ त्या पेटीला शेंदूर फासलेला दगड म्हणून नमस्कार करीत असेल. पण मी मात्र त्या दिवशीं तिला अगदीं मनोभावानं पण मनांतल्या मनांत नमस्कार करीत होतों !

मी मनांतल्या मनांत तिला आर्जवून म्हणत होतों, "हें तरी माझं पत्र पोंचूं दे आणि त्याचं तावडतोब उत्तर येऊं दे."

मी इतक्या मनोभावानं प्रार्थना करीत होतों खरा, पण पत्र आंत टाकतांना माझ्या मनांत भीतीच्या छटा तरळल्याशिवाय राहात नव्हत्या. मीं त्या पेटीच्या गोमुखींत लांबवर हाताचा पंजा सरकविला आणि त्यांत धरलेला लिफाफा हळूच आंत सोडून दिला. हात बाहेर काढतांच त्या गोमुखीच्या लापट दाराचा खटकन् आवाज झाला नि त्यासरशीं मनांतल्या भीतीच्या शंका बळावून मीं म्हटलं, "झालं आपलं पत्र गडप !"

होय, गडपच नाहीं तर काय ?

आज आठ दिवस झाले, मी दररोज याच वेळेस, इतक्याच आशाळलेल्या मनानं या पेटींत पत्र टाकत आहें. पण जें उत्तर यावं म्हणून माझ्या मनाची सारखी तळमळ सुरू आहे तें येत नाहीं. किती कळवळ्यानं मीं प्रत्येक पत्र लिहिलं आहे ! कालपेक्षां आज आणि आजपेक्षां उद्यां असा माझ्या अधीरतेचा पारा वाढला आहे ! एखाद्या 'नाझी' लाहि तें वाचून द्रव आला असता. पण कशाला मी हा दुष्ट शब्द वापरूं ! जिचं उत्तर

अंकि. १५५

मला हवं, तिचं मन किती हळुवार आहे तें एक माझं मलाच ठाऊक ! मग होईल का तिच्या हातून एवढा अक्षम्य अपराध ? छेः, कधींहि शक्य नाहीं. मी एक वेळ पत्राबाबत हेळसांड करीन, माझी मला खात्री देतां येणार नाहीं, पण जिच्या पत्राची मी अपेक्षा करीत आहें तिच्याकडून असं स्वप्नांतहि होणं नाहीं, असा माझा गाढ विश्वास आहे.

मग झालं तरी काय माझ्या पत्रांचं ? पेटीच्या उदरांत तर तीं गडप झालीं नसतील ना ?

माझ्या मनांत हे विचार झरकन् सरकून गेले खरे, पण त्यामुळं मला ती पेटी किती भयंकर वाटूं लागली !

आपला मित्र आपल्याशीं हसतबोलत उभा असावा नि ध्यानींमनीं नसतांहि त्याच्या पायांखालच्या गुप्त भुयाराचं दार उघडून तो आपल्या डोळ्यांसमोर त्यांत गडप व्हावा म्हणजे जसं वाटेल तसं वाटलं मला आतां आणि एखाद्या गुप्त भुयाराच्या शंकेनं मीं पोस्टाच्या पेटीखालीं माझी नजरहि वळवली !

मागं कायदेभंगाच्या चळवळींत कितीतरी मित्रांना मला मुकावं लागलं होतं. पण ज्या दिवशीं ते तुरुंगाच्या लोखंडी दारांत शिरले नि कांहीं काळ त्या भीषण भिंतीआड गडप झाले त्य दिवशीं मला तुरुंगाचा जो भयंकरपणा प्रतीत झाला, त्याचा कांहींसा पुनःप्रत्यय मला आतां त्या पेटीकडे पाहातांना आला. माणूस आंत शिरतांना खळकन् लागणारीं तुरुंगाचीं दारं अन् पत्र आंत टाकून हात बाहेर काढतांच टपकन् होणारा दाराचा आवाज हीं दोन्हीहि मला सारखींच भयानक वाटलीं.

अशाच जड आणि खिन्न मनःस्थितींत मी घरीं परतलों. पण मग ती मनःस्थिति फार वेळ टिकूं नये असाच जणूं कांहीं संकेत होता. कारण मीं माझ्या टेबलाचा खण उघडतांच त्यांत जपून ठेवलेल्या पत्रांचा संभार माझ्या दृष्टीस पडला आणि माझ्या मनांत घर करूं पाहणारे ते दुष्ट विचार हळूहळू मावळूं लागले. मीं मनाशीं म्हटलं, मला वाटलं तितकी ही पत्रांची पेटी निर्दय नाहीं खास. एवढ्या गोड गोड पत्रांचा लाडका संग्रह जो माझ्याजवळ जमला आहे, तो ती इतकी दुष्ट असती तर खास जमला नसता. आणि मग जों जों खणांतील एक एक पत्र काढून मी वाचूं लागलों,

तों तों माझ्या मनावर सांचलेलीं खिन्नतेचीं अभ्रं वितळूं लागलीं. त्या संग्रहांतील एकाहून एक सरस पत्रांचं पारायण करतांना मला वाटूं लागलं, "पोस्टाच्या पेटीसंबंधीं एवढा वाईट ग्रह करून घेण्यांत तिचा केवढा गुन्हा करीत होतों आपण !"

हा विचार येतांच जसं मीं तिला मघां अभिवादन केलं होतं, तसंच फिरून आतां केलं.

कारण प्राणाहूनहि प्यार असणारा हा माझा पत्रसंग्रह हा कुणाचा प्रसाद आहे बरं ? इतकी ही अमूल्य ठेव तिच्यामुळंच मला लाभली आहे ना ! ही जर कुणीं माझ्याजवळून हिरावून घेतली तर माझ्या आयुष्यांतलं केवढं तरी काव्य नष्ट झाल्यासारखं होईल. मी जें काव्य जगलों तें मी पद्यरूपानं लिहून ठेवूं शकलों नसलों तरी पत्ररूपानं मीं तें खास लिहून ठेवलं आहे. पण याहूनही मनाला उन्माद आणणारी गोष्ट म्हणजे माझ्यामुळं दुसऱ्यांच्या आयुष्यांत जें कांहीं थोडंफार काव्य निर्माण झालं आहे त्याचीं प्रत्यंतरं मला या पत्ररूपानं मिळालीं आहेत हीं ! आणि खरंच, काव्य लिहिल्याच्या आनंदापेक्षां आपणच कुणाचा तरी काव्य-विषय झालों आहोंत हा आनंद केवढा तरी मोठा आहे. खरं म्हटलं, तर काव्यानंद म्हणून ज्याला म्हणतात तो हाच ! अन् प्रत्येकाला उन्मादविणारा हा दुर्मिळ आनंद प्रत्येकाच्या आयुष्यांत जर कुणीं निर्माण कला असेल तर तो या पत्राच्या पेटीनंच !

या माझ्या म्हणण्याचीं प्रत्यंतरं मी पुराणांतल्या उत्कृष्ट काव्यप्रसंगांतून काढून दाखवितों. पुराण हा शब्द ऐकतांच आश्चर्यानं बावरून जाण्याचं कारण नाहीं. पाहा—

नल-दमयंती आख्यानाचंच उदाहरण घ्या. या प्रकरणाची मोहनी आज शतकानुशतकं आपल्या मनावर कायम आहे आणि त्याचा आस्वाद आपण सारख्याच उत्कटतेनं घेत आलों आहोंत; पण या आख्यानाचा गाभा कोणता असं जर कुणाला विचारलं तर काय उत्तर येईल ? 'नलराज आणि हंस' हा प्रसंग, हेंच उत्तर कुणी झालं तरी देईल. खरंच आहे ; हें सोडलं तर केवळ माहितीवजा नलाचं पूर्वायुष्य आणि करुणपूर्ण असं उत्तरायुष्य यांत मनाला गुंग करून सोडणारं असं काय आहे ? या कथेंतील सारं अद्भुतरम्य काव्य हंसपक्षानं नलराजाच्या प्रेमदूताचं काम केलं या घटनेंतच

सामावलेलं नाहीं का? तें वगळा आणि त्या कथेंत काय शिल्लक उरतं तें पाहा.

कालिदासाच्या मेघदूताची कल्पना तर याहूनहि रम्योदात्त आहे. विरह-व्यथेनं व्याकुळून गेलेल्या यक्षानं आपल्या अंतःकरणाची वेदना देशांतराला निघालेल्या एका निर्जीव मेघाजवळ उकलून दाखवावी! कां तर तो अलकावतीला जातांच ती आपल्या प्रियेला निवेदन करील! काव्यरसाचं केवढं सार सांठवलं आहे या कल्पनेंत!

ब्रह्मचर्यपालनाच्या असिधाराव्रतामुळं ज्यानं आपलं आयुष्य वाळवंटा-प्रमाणं रुक्ष करून घेतलं आहे, अशा हनुमानाच्या आयुष्यावर माझ्या मतें एकाच गोष्टीचं रुपेरी चांदणं पसरलं आहे. ती गोष्ट म्हणजे त्यानं बजावलेली दूताची कामगिरी. ज्या वेळीं त्यानं रामाची मुद्रिका सीतेच्या हवालीं केली त्या वेळीं सीतेनं केलेल्या करुणरम्य शोकाला रामायणांत तरी दुसरी तोड आहे काय?

आपल्या मनींचं गुज श्रीकृष्णाला कळविण्याकरितां रुक्मिणीनं दूताकरवीं पत्र धाडलं होतं, हाहि प्रसंग किती रम्योत्कट आहे हें काय निराळं सांगायला पाहिजे!

तेव्हां जिच्या कृपेनं आपल्या साऱ्यांच्या आयुष्याला काव्यात्मकतेची चंदेरी कड जडली, त्या पोस्टाच्या पेटीची पूर्वपीठिका ही अशी आहे!

पण केवळ पूर्वपीठिकेवरून तिचं महत्त्व आपल्या ध्यानांत यायचं नाहीं. तिच्या खऱ्या स्वरूपाची कल्पना सहजासहजीं येणं कठीण!

गांवांतील थोरल्या पोस्टाच्या पेटींत पत्र टाकायला तुम्ही जातां त्या वेळीं पेटीच्या फटींत पत्र सरकवून लगेच तेथून झटकूं नका. एक क्षणभर तिच्या-पुढं थांबा आणि आपल्या मनाला विचारा—"काय काय सांठवलं असेल हिनं आपल्या उदरांत?"

आणि त्याचं उत्तर देणं कांहीं सोपं नाहीं. कारण हिनं आपल्या उदरांत काय काय सांठवलं असेल याची कल्पना करणं कुणाच्याहि आटोक्या-बाहेरचं आहे. कितीजणांचीं आणि किती प्रकारचीं पत्रं हिच्या जठरांत सामावलीं असतील! कुणीं आपल्या प्रेयसीला लिहिलेलं प्रणयमधुर पत्र हिच्या हवालीं केलं असेल, तर कुणीं आपल्या प्रतिस्पर्ध्यांचा पाणउतारा

करणारं शिव्यांनीं भरलेलं भेदक पत्र हिच्या स्वाधीन केलं असेल! एका पत्रांतून कुणाला पुत्रजन्माची वार्ता कळणार असेल, तर कुणाला आपल्या आवडत्या माणसाचा मृत्यु समजणार असेल! नुकत्याच फुटलेल्या लॉटरीनं कुणाचं उखळ पांढरं झाल्याचं वर्तमान एखाद्या पत्रांत असेल, तर कुणा एकाच्या घरादारावरून नांगर फिरल्यांच वृत्त इथूनच त्याच्या हातीं जाणार असेल! अशा कितीतरी कडु नि गोड, मंगल आणि अमंगल बातम्या हिच्यांतून जगावर उधळणार असतील! किती मनोविकारांचीं विलसितं इथून जगाला भेटायला जाणार असतील, कुणास ठाऊक!

अन् समजा, ही पोस्टाची पेटी हीं सारीं गुपितं एकदम बोलून दाखवूं लागली तर—?

तर मानवी मनाचं नग्न दर्शनच पाहायला मिळेल आपल्याला!

पण म्हणून घाबरून जायचं कारण नाहीं!

कारण तिनं आपलं तोंड उघडं ठेवलं असलं, तरी कायमचं मौन धारण केलं आहे. महदाश्चर्याची गोष्ट अशी, कीं जिनं आपल्या मनांतलीं गुपितं मनांतच ठेवण्याचं व्रत अचूकपणें पाळलं आहे अशी या भूतलावरची ही एकमेव स्त्री होय!

म्हणूनच तिला शेंदरी रंग फासून देवकळा आणण्याचा प्रयत्न केला आहे कीं काय, कोण जाणें!

## दुसऱ्याचे कपडे

**शक्य** तितक्या झट्कन् घर गांठावं म्हणून शेवटल्या वळणावरून मीं सायकल वळविली, पण उनाड पावसानं गाठलंच मला. हो, उनाड नाहींतर काय ? सगळीकडे लख्ख ऊन पडलेलं अन् पावसाच्या त्या एका ढगाशिवाय सारं आकाश अगदीं धुतल्यासारखं. क्षणार्धांत पाऊस थडकेल अशी कल्पना करतां आली नसती कुणाला. पण गाफील शिक्षकाची अकल्पितपणें फजिती उडविणाऱ्या उनाड पोराप्रमाणें त्या सरीनं मला आणि कित्येकांना पळतां भुई अगदीं थोडी करून सोडली. आपादमस्तक स्नान घडलं मला.

घरीं येतांच मीं सारे ओले कपडे उतरले आणि निथळणारं धोतर बदलण्याकरतां माझं तिसरेपणाचं धोतर शोधूं लागलों. स्नान करूनच मी बाहेर पडलों होतों अन् दुसरं धोतर दांडीवर ओलंच होतं; म्हणून अशा अडचणीच्या वेळेला शिवूनटिपून ठेवलेलं जुनंच धोतर मी त्याच्या नेमलेल्या खुंटीवर पाहूं लागलों. मला तें सांपडेना. मी पत्नीला हांक मारून चौकशी करणार होतों, पण ओलेत्यानें हुडहुडी भरायची पाळी आली म्हणून जवळच असलेला दामूचा पायजमा ओढला आणि चढवला पायांत. मग परीट-घडीचा ताजा गंजीफ्रॉक आणि शर्ट अंगावर चढविल्यावर असं गरम आणि ताजं ताजं वाटायला लागलं ! संचारलेल्या त्या उत्साहाच्या भरांत मीं पत्नीला एक पेलाभर चहा बनविण्यास सांगितलं. अन् चहाचा कप घेऊन तिनें जेव्हां माझ्या खोलींत प्रवेश केला तेव्हां मजकडे पाहातांच तिला एक आश्चर्याचा धक्काच बसल्यासारखा वाटला. तिनं थांबून मिस्किलपणं हसत विचारलं,

‘ इश्श ! हें काय ?’

‘ काय ?’ मीं म्हटलं.

‘ दामूभाऊजींचा काय तो चोळणा घालावयाचा, पोरासोरासारखा ! शोभतं का जरा ?’

मीं तिला थट्टेनं उत्तर दिलं,

'चार पोरांचा बाप झालों म्हणून काय झालं? आम्हीही होतों कधींतरी पोरसोरं! मग करावंसं वाटलं जरा त्यांच्यासारखं, तर काय बिघडलं त्यांत?'

यावर तिला हसूं आलं आणि चहाचा रिकामा पेला आणि बशी घेऊन ती खोलींतून पसार झाली.

पण मग मी जेव्हां आरशांत माझं रूप न्याहाळूं लागलों, तेव्हां माझं ध्यान माझ्या डोळ्यांत चांगलंच भरलं. दामूच्या त्या चोळण्याचा कांहीं विचित्र अंमल हळुहळू मजवर चढूं लागला. माझं त्या चोळण्यांत दिसणारं विचित्र ध्यान माझ्या डोळ्यांपुढून कांहीं केल्या हलेना; आणि या जाणिवेनं माझ्या मनाचं स्वास्थ्य हळूहळू नाहींसं होऊं लागलं. माझी अस्वस्थता सारखी वाढूं लागली आणि कांहीं केल्या ती कमी होईल असा रंग दिसेना.

मीं मनाशीं विचार केला, आपण पायजम्यांत पोरकट अन् बावळट दिसतों, म्हणून का आपलं मन इतकं अस्वस्थ झालंय्! छे, इतक्या सहजासहजीं तें अस्वस्थ होणार नाहीं. अन् मग मला जी जाणीव होऊं लागली तीच या अस्वस्थतेच्या बुडाशीं होती असं दिसून आलं. ती जाणीव म्हणजे आज आपण बिनसरावाच्या कपड्यांत वावरत आहों ही. याच जाणिवेनं माझं सारं मन व्यापून गेलं होतं.

खरंच, आपले कपडे किती आपल्या सरावाचे झालेले असतात याचा अनुभव आज मला पुरेपूर आला. आपल्या कपड्यांचा आपल्याला अखंड सहवास घडत असतो आणि त्यामुळंच त्यांजविषयीं एकंदर आपल्या शरीरांत इतका आपलेपणा भिनलेला असतो, कीं तें त्यांना आपला एक भागच म्हणून मानूं लागतं. कोट अंगावर चढविल्यानंतर तो आपल्या अंगावर आहे ही जाणीव क्वचितच वाहातों आपण. आपल्याला दोन हात आहेत, दोन पाय आहेत ही गोष्ट आपण किती सफाईदारपणें विसरून गेलेले असतों! कपड्यांचंहि होत नाहीं का तसं? पायांत चढविलेली पॅंट आणि मानेभोंवतीं सरकविलेला टाय हीं आपल्याच शरीराचीं उपांगं होत अशा सहजतेनं नाहीं का वावरत आपण? इतक्या सहजतेनं आपण वावरूं शकतों, कारण त्यांजविषयीं आपला दुजाभावच नष्ट झालेला असतो. आपलेपणा आणि दुजेपणा हे विचारसुद्धां मनांत डोकावूं नयेत इतक्या सहजतेनं आपण या गोष्टी गृहीत धरीत असतों.

पण जेव्हां केव्हां आपल्याला दुसऱ्याचे कपडे वापरण्याची पाळी येते, तेव्हां तेव्हां या साऱ्या विचारांची गर्दी मनांत उठू लागते अन् गृहीत धरलेल्या गोष्टींचा भलेपणा आपल्या नजरेंत भरतो.

आतांच पाहा. मीं दामूचा पायजमा केवळ धोतर सुकेपर्यंत म्हणून आड केला होता ना? पण त्यानं माझं मन किती बेचैन करून टाकलं! मला त्यांत अगदीं स्वस्थ वाटेना. अन् तें कसं वाटावं? तो पायजमा माझ्या कमरेवर धड बसेल तर शपथ! वारंवार तो गळून खालीं सरके आणि क्षणाक्षणाला मला तो सांवरून घ्यावा लागे. चालण्याची तर सोयच नव्हती. बरं, दामू तरी असा आचरट, त्यानं मला वाटतं तो फाजील रुंद शिवून घेतला होता. अलीकडे तसा शिवून घेणं ही फॅशन समजली जात होती कीं काय नकळे. आणि पायजम्याची ठेवण तरी काय विचित्र! कमरेवर तो जेथें मीं कसला होता, तो भाग जर सोडला तर त्याचा स्पर्श चुकूनही कोठें होतो आहे असं वाटेना मला. कटीखालचा भाग वस्त्राच्छादित असूनहि तो विवस्त्र आहे असं वाटण्याइतकी ही जाणीव होऊं लागली मला! पायांना तर कापडाच्या घरांत असूनही उघडेपणाचा अनुभव येत होता; अन् मग त्यांना आपल्या धोतराचं सुख आठवूं लागलं. किती नाजुक आणि मऊ स्पर्श त्याचा! असं तें भोंवतीं तरंगत राहाणार नाहीं. त्याची नाजुक मिठी सर्वांगावर सारखीच बसणार. मांड्या, कटिभाग आणि पोटऱ्या या साऱ्याशीं किती खेळीमेळीचं वर्तन त्याचं! उगीच नाहीं आपण आपलं म्हटलं त्याला!

तीन-चार तासांपुरताच मीं तो पायजमा पेहरला असेल! पण माझी स्थिति ही अशी विचित्र होऊन गेली. कमालीचं अस्वस्थ झालं माझं मन. आणि जें जें काम करायचं मीं मनांत आणलं, तें तें हटकून जमेना मला. सकाळीं वाचायचा राह्यला होता म्हणून टाइम्स उलगडला मीं! पण वारंवार कमरेकडे हात जाऊं लागून उगीचच पायजम्याची जाणीव होऊं लागली आणि वाचनांतील चित्त उडूं लागलं. अग्रलेख, लढाईची बातमी, कॅंडिडसूचं पत्र हीं सारीं मीं एकामागून एक वाचण्याचा प्रयत्न केला, पण मन रमेना कशांत! दुपारींही असाच वामकुक्षीकरतां आडवा झालों तर अस्वस्थपणामुळं झोंपच येईना. मग म्हटलं, पत्रं लिहायचीं राहिलीं आहेत

तीं तरी लिहून हातावेगळीं करावींत. एक लिहायला घेतलं आणि संपवलंही. पण संपविल्यानंतर मला समजून आलं, कीं त्यांत मजकुराची सरमिसळ झाली आहे म्हणून. मग तें टरकावलं आणि लिहायचा नादच सोडला. मीं मनाशीं जरा चिडूनच म्हटलं, 'आतां ओलं तर ओलं, पण आपलं धोतर नेसा; त्याशिवाय ही कामाची गाडी कांहीं सुरळित मार्गाला लागायची नाहीं.'

माझा हा अनुभव तर क्षुल्लक बाबतींतलाच आहे, पण मला माझ्या एका स्नेह्याची गोष्ट चांगलीच आठवते. कॉलेजांत असतांना त्यानं एका मुलीशीं चांगलीच ओळख केली होती. इतकी, कीं त्याचं पर्यवसान लग्नांतच व्हावं! अन् एक दिवस त्यानं मला आत्मविश्वासानं सांगितलंही, 'बघ करतों आज प्रपोज. परत आल्यावर दे मला कॅाँग्रॅट्स!' पण ठरल्याप्रमाणं संध्याकाळीं स्वारी फिरकली नाहीं; म्हणून मीं त्याला त्याच्या खोलीवर जाऊन गांठलं. चिमणीएवढं तोंड करून बसला होता तो! मीं आपले कॅाँग्रॅट्स आपल्याजवळच ठेवले आणि विचारलं, 'हें काय? तोंड कां उतरलं आमच्या हीरोचं?'

तो मोठ्या काकुळतीनं म्हणाला, 'चेष्टा करूं नको माझी. खरोखर गाढवपणा झाला माझ्या हातून. करायला गेलों एक आणि झालं भलतंच!'

'हो, पण झालं तरी काय!'

'त्याचं असं झालं–माझा नवीन कोट कांहीं आज शिंप्यानं दिला नाहीं. म्हणून त्या शेजारच्या बग्याचा ब्लेझर डबल ब्रेस्ट चढवून गेलों तिला भेटायला. तेथवर जाईपर्यंत होतों मोठ्या झाकींत! पण तिथं गेल्यावर असं कांहीं बैचन वाटायला लागलं त्या कोटांत! तिच्याही ध्यानांत आलं तें आणि तिनं मला विचारलं, 'तुमचा नव्हे वाटतं हा कोट?' आणि त्यावर ती अशी कांहीं हसली! त्यामुळं मी आणि माझा बेत साफ विरघळून गेला. मी तिथून तडक निघून आलों खोलीवर.'

मीं त्यावेळीं त्याला खूप धीर दिला, पण पुढं कसं कुणाला ठाऊक त्यांचं बिनसलं आणि शेवटीं आमचे सर्वांचे कयास चुकीचे ठरले!

आमच्या कॉलेजच्या क्रिकेट टीमच्या कॅप्टननं अशीच एकदां चूक केली होती. अगदीं महत्त्वाची मॅच! आणि बॅटिंगबाबत सारी मदार याच्यावर.

पण हे गेले झार्कीत आणि आले हातीं भोपळा घेऊन. त्याला प्रिन्सिपॉलनीं विचारलं,

'हें रे काय चिवटे ?'

त्यानं शरमेनं उत्तर दिलं, 'सर तें माझ्याकडूनच चुकलं जरा. मी त्या नवरंगेची फ्लॅनेलची विजार घातली खरी, पण त्यानंच माझी दांडी गेली. सारखं अन्ईझी वाटायला लागलं; अन् त्यांत त्या डांगेचा लेगब्रेग यायला आणि पॅंट सारखी खालीं गळते आहे असं वाटूं लागायला एकच गांठ पडली ! गेलं अवधान आणि पडली विकेट !'

या उदाहरणांवरून कुणी धडा घेवो अथवा न घेवो, मीं मात्र मनाशीं पक्कं ठरवून ठेवलं आहे, कीं दुसऱ्याचे कपडे वापरायचा प्रसंग म्हणून येऊं द्यावयाचा नाहीं. घरीं तर मीं तशी तजवीज करून ठेवलीच आहे, पण बाहेरगांवीं जातांनासुद्धां मी सारी तयारी इतकी जय्यत करतों, कीं तेथें कोणत्याही कपड्याकरतांच काय, पण वस्तूकरतांहि दुसऱ्याकडे पाहायची पाळी येऊं नये. मी बाहेरगांवीं जायला म्हणून बॅग आणि होल्डॉल भरूं लागलों, कीं सभोंवतीं जमवलेल्या कपड्यांच्या चवडीकडे आणि वस्तूंच्या पसाऱ्याकडे पाहून माझी पत्नी माझी थट्टा करूं लागते. कारण दाढीच्या टॉवेलपासून तिसरेपणाच्या धोतरापर्यंत, पलंगपोसापासून उशीच्या अभ्र्यापर्यंत आणि दाढीच्या ब्रशापासून तों बुटाच्या ब्रशापर्यंत साऱ्यांचा संग्रह मीं मजजवळ केलेला असतो. ती हसते या माझ्या तयारीला ! पण तिचं हें अज्ञानपूर्ण हसं पाहून मला कींव येते.

म्हणूनच मीं तिला एकदां सांगून पाहिलं, कीं दुसऱ्याचे कपडे मी परदाराधनाप्रमाणं वर्ज्य मानले आहेत !

## बोहारी

**माझ्या** मित्राची पत्नी माहेरीं जायला निघाली होती. तिला निरोप द्यायला म्हणून माझ्या मित्राबरोबर मी स्टेशनवर गेलों होतों. हमालाच्या ताब्यांतील सामान घेऊन तें वरच्या फळीवर ठेवूं लागतांच एक गोष्ट माझ्या नजरेस आली. मीं वहिनीला विचारलं,

"कां हो वहिनी, ही वळकटी, ट्रंक अन् ही फळांची करंडी हें सर्व ठीक, पण हें कसलं गाठोडं घेतलंत बरोबर?"

वहिनी जरा हसल्या आणि म्हणाल्या, "तें होय? आहे आपलं असंच."

पण त्याचा आकार अन् रंग—विशेषतः त्यावर घातलेलं विटकंसं आलवण पाहून माझं कुतूहल मला चैन पडूं देईना. मीं चौकशी केली,

"कांहीं न सांगण्यासारखं गुपित आहे वाटतं तें? सांभाळा, नाहींतर लोक म्हणतील, चालविलीं आहेत गांठोडीं माहेरीं यांनीं!"

यावर माझा मित्र हसत म्हणाला,

"लोकांनींच कशाला म्हणायला पाहिजे? मीच म्हणतों तसं."

"म्हणाल तर काय! पण म्हटलं, याचा मोबदला येणार आहे तुमच्याच घरांत. आणि त गाठोडं कांहीं सारं तुमच्याच घरचं नाहीं. म्हणायला काय होतंयू..." वहिनी जरा फणकाऱ्यानंच म्हणाल्या.

यामुळं त्या गाठोड्याचं गूढ फारच वाढलं.

"अरे, पण आहे तरी काय त्यांत एवढं? कळूं दे तर? मग तुमचं भांडण."

"असायचं काय? बोहाऱ्याला द्यायला जुने कपडे चालविले आहेत." माझा मित्र उत्तरला.

माझं आश्चर्य दुपटीनं वाढलं. मीं विचारलं, "पुण्यांत बोहारी नाहींत का हो वैनी?"

"अरे बाबा, पुण्यांत आहेत; पण त्यांना माहेरच्यांची का सर येणार आहे? माहेरच्या माणसांप्रमाणं माहेरचे बोहारीहि दिलदार असतात म्हणे! उगीच नाहीं तिनं आपल्या कपड्यांबरोबर शेजाऱ्यापाजाऱ्यांचेहि कपडे चालविले!" माझा मित्र मिस्किलपणें हसत उद्गारला.

"दुसऱ्याचे कसले! दिलं गंगूमावशींनीं आपलं आलवण अन् बनूताईनीं आपलीं जुनेरं, तर 'नाहीं' का म्हणायचं त्यांना ? अन् भाऊजी, परत आल्यावर दाखवीन तुम्हांला मी भांडीं ! मग तुम्हीच सांगाल, तिथले बोहारी किती चांगले असतात तें."

इतक्यांत गाडी सुटली, नाहींतर जुनेऱ्यावर पैदा केलेलीं भांडीं पाहाण्यापूर्वीच मी वहिनींना उत्तर देणार होतों,

"खरंच, फार दिलदार असतात तिथले बोहारी."

वहिनींची खुशामत करायची म्हणून मी हें उत्तर देणार नव्हतों, तर ज्या गोड भावनेनें त्या आज भारल्या होत्या आणि जिच्या भरांत सारंच कांहीं त्यांना मधुर वाटायला लागलं होतं, ती गोड भावना पटूनच मला तसं उत्तर द्यावंसं वाटलं. माहेरीं जायचं ही कल्पनाच किती रम्य! अन् तिथं आपल्या मायेच्या माणसांच्या संगतींत करायच्या गोष्टींचे बेत तरी किती उन्मादकारक! बिलवरांचा घाट बदलून घ्यायचा, एकदाणी नवीन करायची, मनासारख्या बांगड्या भरायच्या किंवा ठेवणींतल्या पातळाच्या जोडीला एक फक्कड पातळ घ्यायचं, हे किंवा यांसारखेच जे अनेक बेत सासुरवाशिणीनें माहेरीं गेल्यावर अमलांत आणायचे म्हणून मनाशीं ठरविलेले असतात त्यांतलाच हा एक. या साऱ्या गोष्टी सासरीं केल्या तर होत नाहींत असं थोडंच आहे ? पण माहेरच्या प्रेमळ अन् मोकळ्या वातावरणांत त्या करण्यांत जी गोडी आणि जें काव्य सांठवलं आहे त्याची सर एरवीं कोठून यायला ? मला तर वाटतं कीं प्रत्येक स्त्री ही माहेरून परत आल्यापासून तों पुन्हा माहेरीं जाईपर्यंत या गोष्टींचीं मनोराज्यं करण्यांतच सासरचे आपले अळणी दिवस घालवीत असली पाहिजे.

पण हें माहेरपणचं काव्यात्म वातावरण वगळलं तरी स्त्रियांना स्वभावतःच बोहाऱ्याचं केवढं आकर्षण वाटतं याचं प्रत्यंतर मला दुसऱ्याच दिवशीं आलं.

तो दिवस सुटीचा असून मीं माझी वामकुक्षी जरा लवकरच संपवली. कारण ज्या चित्रपटाची वाट मी आज कैक दिवस पाहात होतों, तो गांवांतल्या एका थिएटरमध्यें आला होता. आठ दिवसांपूर्वीपासूनच त्याला जायचा आमचा बेत नक्की झाला होता. पण मी खोलीबाहेर येतों, तों तिथं निराळाच प्रवेश सुरू असलेला माझ्या दृष्टीस पडला ! मीं मनाशीं म्हटलं,

'सिनेमाला जायला हा कांहीं शुभशकून नाहीं!' माझी पत्नी बोहाऱ्याशीं सौदा करण्यांत दंग झाली होती. मी तिला एकदां आठवण दिली अन् तिनं माझ्याकडे पाहून मान हालवली. पण तिच्या ती गोष्ट लक्षांत आली कीं नाहीं कोणाला ठाऊक!

नंतर मग माझा चहा आटोपला, तरी तिचा सौदा संपेना! अन् माझे कपडे झाले तरी तिचा चिकटपणा आवरेना! तेव्हां मीं चिडूनच पायांत वहाणा सरकविल्या आणि एकटाच सिनेमाला झटकलों.

माझं हें करणं तिला खूप लागलं असाव अशी माझी अपेक्षा होती. तें तसं लागावं म्हणूनच मीं तें वर्तन केलं होतं. पण मग घरीं आल्यावर तिनं माझ्याशीं जेव्हां बोलणं काढलं, तेव्हां माझा अंदाज साफ चुकल्याचं माझ्या लक्षांत आलं! कारण तिनं मनांतल्या मनांत खजील व्हावं म्हणून मी त्या चित्रपटाची तोंड भरून स्तुति करीत होतों! पण जेव्हां तिनं त्या साऱ्या गोष्टी हसतखेळत ऐकून दुप्पट उत्साहानं आपल्या सौद्याच्या गोष्टी सुरू केल्या, तेव्हां मात्र खजील होण्याची पाळी माझ्यावर आली. तिनं सांगितलेली सौद्याची रसभरित हकीकत ऐकून अन् प्रत्यक्ष सौदा केलेलीं तीं सुबक भांडीं पाहून मला हळुहळू पटूं लागलं, कीं तिनं त्या दिवशींच्या वागण्यांत चूक केली नव्हती.

कारण ज्याप्रमाणें मी त्या चित्रपटाची वाट आज कैक दिवस पाहात होतों त्याचप्रमाणें तीहि त्या बोहाऱ्याची वाट आज कैक दिवस पाहात होती. त्याच्या चांगुलपणाबद्दल अन् सच्चेपणाबद्दल तिनं मला कैक गोष्टी ऐकवल्या होत्या. 'पुढच्या खेपेला आपण अमुक अमुक कपडे काढणार आहोंत, त्याला साजेल असे उत्तम उत्तम जिन्नस घेऊन ये' म्हणून तिनं त्याला गेल्या खेपेलाच बजावलं होतं. अन् तिनें जें जरीकांठी पातळ द्यायला म्हणून काढलं होतं तें जरी तिच्या अत्यंत आवडींतलं होतं तरी तिनं तें पुरेपूर न वापरतां जरा धडपणींच बाजूला काढून ठेवलं होतं. त्याबरोबर द्यायचा माझा सिल्क शर्टहि जरा विरूं लागलासा वाटतांच तिनं माझ्याकडून पेन्शनींत काढायला लावला होता आणि या दोन कपड्यांवर तिनं केवढे बेत केले होते! किती मनोराज्यें केलीं होतीं! आपल्या संसारां-तल्या किती किती उणीवा तिनं त्यांवर येणाऱ्या जिनसांनीं भरून काढायच्या

ठरविल्या होत्या! त्या कपड्यांवर हें मागावं कीं तें मागावं याबद्दल तिनं हजार वेळां आपल्या मनाशीं हिशेब केले होते! आणि नेमका आजच तो बोहारी आपला मोठा हारा भरगच्च भरून प्रकट झाला होता! मग त्याचा आवाज ऐकतांच आज आपल्याला एक गोड सौदा करायला मिळणार या आनंदानं तिचं भान नाहींसं व्हावं यांत आश्चर्य कसलं!

आणि या प्रसंगानं माझं एका बाबतींत चांगलंच गर्वहरण झालं! दुसऱ्याचं मन आपल्याला अचूक ओळखतां येतं, अशी मला आजपर्यंत जरा घमेंडच होती असं म्हणायला हरकत नाहीं. पण मला आज कळून चुकलं, कीं आपल्या पत्नीचं मनसुद्धां कधीं कधीं आपल्याला असं ओळखतां येत नाहीं; मग आपल्या हातून कठोर वर्तन घडतं अन् तेढीचे प्रसंग उद्भवतात! पण यामुळें सर्वांत मोठं जें नुकसान होतं तें हें, कीं आयुष्यांतल्या कितीतरी मधुर प्रसंगांना आणि काव्यात्म गोष्टींना आपल्याला मुकावं लागतं.

आतांच पाहा! मीं इतके दिवस निदान दोन वेळां भोजनाच्या निमित्तानं आणि दोन वेळां चहाच्या निमित्तानं स्वयंपाकघरांत कांहीं काळ खात्रीनें घालविला असेल! पण आपल्या पत्नीनं आपलं स्वयंपाकगृह अत्यंत नमुनेदार रीतीनं सजवलं असेल याची दाद मला या क्षणापर्यंत नव्हती! पण आज चौफेर नजर फिरवितांच विस्मयाचा एक गोड धक्काच बसला मला! कारण जिकडं पहावं तिकडं लखलखीत भांड्यांची आरासच दृष्टीस पडत होती! फळीवर, शेल्फवर, रॅकवर सगळीकडं भांडीं, डबे अशा कांहीं आकर्षक थाटानं रचून ठेवले होते, कीं पाहाणाराला त्यांत मांडणाराचं कौशल्य दिसल्याशिवाय राहूं नये. भांड्यांच्या या प्रदर्शनांत कपबशांचा नाजूकपणा जास्तच उठून दिसावा अशी त्यांची व्यवस्था केली होती कीं काय कुणास ठाऊक! आणि काचेचं व चिनी मातीच्या बरण्यांचं शेल्फ तर अशा ठिकाणीं ठेवून दिलं होतं, कीं त्यामुळं या साऱ्या देखाव्याला एक गोड वैचित्र्य प्राप्त व्हावं! पण त्या स्वयंपाक-घरांतील जर अत्यंत गमतीची गोष्ट कोणती असेल तर तें कोपऱ्यांतील कपाट! तें जर तुम्ही उघडून पाहिलं असतं, तर एक सुंदर प्रदर्शन पाहिल्याचाच आनंद झाला असता तुम्हांला! कारण त्यांतल्या प्रत्येक फळीवर, घासून-पुसून ठेवल्यामुळें ज्यांना सुवर्णकांति प्राप्त झाली आहे असे पितळेचे डबे

आकारमानानं पण हारीनं ठेविले होते. मला वाटतं, बाजारांत जी जी म्हणून तऱ्हा आणि जो जो म्हणून आकार आजतागायत आला होता, त्याचं प्रदर्शन तिथं खचित पाहायला मिळत होतं. अन् त्या डब्यांविषयीं एकच प्रश्न करायचा अवकाश, कीं साऱ्यांचा मनोरंजक इतिहास तुमच्या कानांवर आला असता! त्या डब्यांपैकीं कोणता, कोणत्या महिन्यांत आणि कोणत्या कपड्यावर घेतला, तो घेतांना किती बोहऱ्यांशीं बोलाचाली करावी लागली आणि शेवटीं जो बोहारी देऊन गेला त्याच्याकडे किती सुबक आणि आजतागायत माल होता वगैरे बारीकसारीक तपशील ऐकतांना तुमची मजेदार करमणूक झाल्याशिवाय राहिली नसती!

त्या कपाटांतील प्रत्येक डब्याविषयीं केवढा जिव्हाळा हा! मला वाटतं, माझ्या शेल्फवरच्या पुस्तकांबद्दल जर कोणीं मला विचारलं तर इतकी साद्यंत हकीकत सांगणं मला खात्रीनं कठीण गेलं असतं. आणि ती कुणाला सांगतां येईल? कारण असं, कीं संसारांत स्त्रियांना भांड्यांचं जें महत्त्व वाटतं तें आम्हांला पुस्तकांचं वाटत नाहीं. ज्यांच्या घरीं पुस्तकांचे संग्रह मला पाहावयाला सांपडले आहेत, त्यांनीं ते व्यवस्थित टेवलेले होते असं मला क्वचितच आठवतं. उलट त्यांतलंच एखादं पुस्तक वाचायला घ्यायचं म्हटलं, तर तें झटकून घेतल्याशिवाय उघडण्याची सोयच नव्हती. भांड्यांबाबत अशी अनास्था कोठल्याहि स्त्रीकडून झालेली दिसेल काय? क्वचित् लागणारं भांडंसुद्धां किंचित् मलिन झालेलं दिसलं, तर कोणाहि स्त्रीला त्या दिवशींचीं कामें गोड लागणार नाहींत. दागिन्यांइतकीच, किंबहुना दागिन्यांपेक्षांहि भांड्यांची निगा बायका विशेष ठेवतील! कारण दागिन्यांहून कांकणभर जास्तच भांड्यांवर त्यांचा लोभ असतो अन् म्हणूनच सुबक भांड्यांनीं संसाराची सजावट करायला साहाय्य करणाऱ्या बोहाऱ्याबद्दल त्यांना एक विशेषच आकर्षण वाटत असावं.

माझ्या घरच्या आणि शेजारच्या बायका, जो येईल त्या बोहाऱ्याला बोलावून, आपल्या जुन्या कपड्यांवर सौदा पटविण्याचा जो एक चाळा सतत करीत असतात, त्याच्या मुळाशीं वरील कारण तर खचित आहेच; पण त्याहूनहि एक दुसरं विलक्षण कारण त्याच्या बुडाशीं आहे. अन् त्याच्याशीं तुलना केली तर सौदा पटविल्याचा आनंद आणि संसार सजविण्याचं

आकर्षण हीं व्यवहारी नि रुक्ष ठरण्याचा संभव आहे. स्त्रिया शिवूनटिपून धडपणा आणलेलं वस्त्र बोहाऱ्याला दाखवीत असतात अन् त्याबद्दल एक नवं करकरीत भांडं तो त्यांना हसत देऊं करीत असतो. पाहा, या दृश्यांत तुम्हांला त्याचा कांहीं मागमूस लागतो का ! आणि क्षणभर विचार केलात, तर तुम्हांला दिसून येईल, कीं या सौद्यांत जो एक विलक्षण आनंद प्राप्त होत असतो तो जुनं देऊन नवं घेतल्याचा! हा अलौकिकच नाहीं तर काय ? जगांत हा आनंद मिळण्याची दुसरी कांहीं सोय आहे काय ? जुनंपुराणं घेणारे पुष्कळ आहेत, पण नवं देणारा एक बोहारीच ! जरीपुराणेवाला जुनं जरतार नेईल आणि त्याबद्दल पैसे देऊन जाईल ! रद्दीवाला रद्दी घेईल आणि हातावर नाणीं टाकून जाईल ! इतरांचंहि हेंच. या सौद्यांत जुनं देऊन पैसे मिळाल्याचा आनंद जरी लाभला तरी तो किती व्यावहारिक आनंद ! त्याची तुलना जुनं घेऊन नवं मिळाल्याच्या आनंदाशीं करतांच येणं शक्य नाहीं. कारण व्यवहार आणि काव्य यांत जें अंतर तेंच यांत !

म्हणून हा आनंद ज्यांना वारंवार लुटण्याचं भाग्य लाभलं आहे त्या स्त्रीजातीबद्दल कुणाला जर हेवा वाटूं लागला तर त्यांत आश्चर्य कसलं ?

# आजारीपणाचं सुख

गेल्या कित्येक दिवसांपासून आजारी पडण्याचा बेत मी मनाशीं करीत आहें, पण तो कांहीं केल्या सफळ होऊं नये असाच योग दिसतो. त्यामुळं माझं मन कसं अगदीं बेचैन झालं आहे. चित्रपट पाहायची इच्छा व्हावी आणि तो चटकन् पाहातां यावा किंवा सहलीला जायचं मनांत यावं आणि तेंही सहज सहज जमवतां यावं, तसं आजारी पडण्याचं सहज सहज जमलं असतं तर किती किती बरं झालं असतं! मनांत आलं, कीं आजारी होतां येण्याची युक्ति अजून कशी कुणीं शोधून काढली नाहीं याबद्दल मला राहून राहून आश्चर्य वाटत आहे. नाहीं म्हणायला माझ्या एका मित्रानें मागें परीक्षेला चाट द्यायची म्हणून ताप भरण्याचं इंजेक्शन घेतल्याचं मला पक्कं आठवतं. पण ज्या अमोघ इंजेक्शननं हमखास ताप भरतो, तें अजून सर्वसाधारण डॉक्टरमहाशयांना ज्ञात झालेलं दिसत नाहीं. अन् ज्या माझ्या मित्रानं हा प्रयोग अगदीं यशस्वी रीतीनं करून पाहिला होता, त्याचा मजजवळचा पत्ता गहाळ झाल्यानं, त्या अवलिया डॉक्टरचा तलास लावणंहि मोठं कठीण काम होऊन बसलं आहे. आजारी पडण्याची —थोडंसं आजारी पडून अंथरुणांत लोळत पडण्याची—लहर तर मला वारंवार येते आणि आजारी पडण्याचं तंत्र हें असं परावलंबी! माझी किती कुचंबणा होत असेल तें एक माझं मलाच ठाऊक!

आजारी पडण्याची हुक्की मला जी वारंवार येते ती दररोजच्या चक्रनेमि-क्रमांतून कांहीं काळ सुटी मिळावी म्हणून नव्हे किंवा अति कामानं जीव वैतागला म्हणजे आजाराच्या निमित्तानं विश्रांतीचं सुख मिळावं म्हणूनही नव्हे. कारण विश्रांतीचं सुख केवळ आजारांतच घेतां येतं असं थोडंच आहे! विश्रांतिसुखाची मौज लुटण्याच्या अनेक तऱ्हा आहेत आणि त्या आपापल्या परीनं अत्यंत आल्हाद देणाऱ्या आहेत हें मला मान्य आहे. पण आजारी पडण्यांत—थोडंसं अंग मोडून येऊन अंथरुण पसरण्यांत—जें एक सुख आहे तें या सर्वांहून अगदीं न्यारं आहे असं माझं मत आहे.

आजारीपणाची कल्पनाच किती हृद्य आहे पाहा! अंग मोडून आल्याचं

निमित्त करून ऑफिसला चिठी पाठवायचा योग आला, कीं एखाद्या पर्वणीचा योग यावा असं मला वाटतं! एखादा सुंदर नांवाजलेला बोलपट संध्याकाळीं पाहायला येण्याचं आमंत्रण अचानकपणें यावं, म्हणजे जी एक सुखाची हुरहुर मनाला लागून राहते तशीच अगदीं मला त्या दिवशीं लागून राहते. मग त्या दिवशीं माझा मुक्काम अंथरुणांत. आणि खरं सांगायचं, तर अंथरुणाचं सुख घ्यायचा प्रसंग आजारीपणाशिवाय तरी केव्हां येतो? एरवीं डोळयांवर झोंप आली कीं अंथरुणावर अंग टाकायचं आणि निद्रेच्या आधीन व्हायचं, हा कार्यक्रम! पण आजारीपणांत तसं नसतं! गादीच्या भरदारपणाचा आल्हाद घेण्याकडे आपली प्रवृत्ति असते. उश्यांच्या मृदुमृदुल संभारांत आपलं डोकं रुतवून घेण्याचं सुख आपण मनसुराद घेत असतों. पांघरुणाच्या गुलगुलीत उबदारपणाची लपेट तर त्यावेळीं इतकी सुखावह वाटते कीं तिला कसली उपमा द्यायची म्हटलं तरी देतां यायची नाहीं. ह्या ऐषारामांत तापाच्या ग्लानीची मजा घेत पडावं आणि जरा वेळानें जों डोळे उघडावेत, तों आपली खोली आपल्याला निराळी वाटूं लागते. नेहमींपेक्षां खोलीची स्वच्छता आणि टापटीप वाढल्याचं प्रत्ययाला येतं. खिडकीचे निळसर तलम पडदे आटोपशीरपणें सरकवून घेतल्यावर अन् खिडकीचीं तावदानं किलकिलतीं करून घेतल्यावर खोलींत जो एक गारवट मंद अंधार पसरतो, त्यामुळें तेथील वातावरणाला अद्भुतरम्यतेची झांक आल्यासारखं वाटतं! पण ज्या एका गोष्टीनें माझं मन एकदम प्रसन्न होतं ती गोष्ट म्हणजे खोलींत पसरलेला मंद मंद दरवळ! माझा कोमट झालेला हात माझ्या मस्तकाकडे वळतो आणि तिथें आपल्या शीतल स्पर्शानें मस्तकाला आणि डोळयांना आराम देणारी कोलनवॉटरची घडी ठेवलेली आढळून येते. पलंगाजवळच्या शुभ्रवस्त्राच्छादित तिवईवर ठेवलेली तांबड्या औषधाची बाटली आणि ग्लास नजरेस पडलीं कीं मात्र अंगांतून शहाऱ्याची एक चमक निघून जाते. पण तिच्याच पलीकडे पांढऱ्या चकाकणाऱ्या डिशमध्यें मांडून ठेवलेलीं रसाळ घोसदार द्राक्षं आणि डाळिंबी रंगानें रसरसलेलं दाणेदार डाळिंब हीं पाहिलीं कीं जीव खालीं पडतो.

पण आजारीपण मला जें हवंहवंसं वाटतं, तें केवळ औषधावर द्राक्ष-डाळिंबाची चविष्ट मुखशुद्धि खायला मिळते म्हणून नव्हे, तर डाळिंबाहून

मधुर आणि द्राक्षाहून गोड अशा माझ्या पत्नीचा प्रेमळ सहवास ह्यावेळीं मला घडतो म्हणून ! होय ह्याच वेळीं घडतो म्हणून ! कारण एरवीं तिच्या स्वभावाला व्यवहाराची मुरड पडल्यानें एक प्रकारची रुक्षता प्राप्त झालेली असते. मुलांच्या खस्ता काढतां काढतां त्रासिकपणाची लकेर तिच्या स्वभावांत चमकतांना आढळते. संसाराचे कष्ट उपसतांना वल्लभेचीं कर्तव्यं दुर्लक्षित करण्याकडे तिचा कल होऊं लागतो. मग तिच्या ह्या तुटक संसारीपणाचे सल माझ्या हृदयाला इतके बोचूं लागतात कीं या सहजीवनाचा सासुरवास संपावा म्हणून मी आजारी पडण्याची इच्छा तीव्रतेनं करूं लागतों. कारण मीं एकदां अंथरुण पसरलं कीं तिच्या ह्या कडवट वृत्ति एकदम मधुर स्वरूप धारण करतात आणि तिच्या प्रेमळपणाला जणुं उधाण येतं. तिच्या स्वभावांतल्या साऱ्या कोमल वृत्ति एकदम उचंबळून येतात आणि त्यांचं सिंचन तिला ज्या ज्या तऱ्हेनें करणं शक्य असतं त्या त्या तऱ्हेनें ती मजवर करूं लागते. माझ्या उशालगत तिनें एकदा बैठक मारली कीं तिथून हालणं तिच्या जिवावर येतं. मग ती आपल्या नाजुक हातानें कपाळाला बाम चोळील किंवा उगीचच चाळा म्हणून डोक्याचे केस कुरवाळीत राहील. ताप अंगांत भरला कीं तिचा गार कोमल स्पर्श अमृतासारखा वाटावा ! पाय चेपल्याशिवाय किंवा पाठ दाबल्याशिवाय तिला चैन पडणार नाहीं. हें चाटण घ्या, तो सुंठवडा घ्या, मोरावळा देऊं का, म्हणून नाहीं नाहीं ते लाडिक आग्रह करील ! अन् हें सर्व चालू असतांना तिचं जें बोलणें सुरू असतं तें तरी किती गोड आणि लाडिक ! अमुक करूं या अन् तमुक करूं या म्हणून तिच्या मनांतले सारे मधुर बेत मला ह्यावेळीं कळायचे. आणि माझ्या आजाराच्या निमित्तानें घडलेल्या ह्या मधुर-मीलनांत आमच्यांत सांठलेलीं गैरसमजांचीं जळमटं जळून खाक होऊन मनं पुन्हा निर्मळ व्हायचीं !

मित्रांचं तरी काय असंच ! ज्यांच्या भेटीची वाट पाहात तिष्ठत असावं त्यांची भेट एरवीं सुखासुखी होईल तर शपथ ! कामाच्या कचाट्यानें जेव्हां ज्याला सवड होईल तेव्हां त्याची भेट. मनांत असूनही परिस्थितीमुळें कठोरतेचं कवच धारण करावं लागतं तें असं ! पण आजारीपणाचा सुगावा लागायचा अवकाश कीं हें कठोरपणाचं कवच जिथल्या तिथें गळून पडावं

आणि आंतला स्नेहाळ गाभा विकसित व्हावा. मग ह्या ना त्या कारणानें दुर्मिळ झालेले सारे दोस्त एकामागून एक हजर व्हायचे आणि त्यांच्या प्रेमळ संमीलनाचं विलोभनीय सुख त्या वेळीं मिळायचं! सारे जमले कीं जिव्हाळ्याची विचारपूस व्हावयाची, फिरफिरून भेटण्याचीं स्नेहाळ आश्वासनं मिळायचीं आणि काव्यशास्त्रविनोदाचा आनंद खळखळून वाहावयाचा!

पण आजारीपणांत ज्यांच्या भेटीची अपरंपार भूक मला लागलेली असते, ते माझे स्नेहाळ सोबती मात्र माझ्या फुरसतीच्या क्षणाची वाट पाहत माझ्या उशालगत मुग्धपणें तिष्ठत असतात! मी त्यांना स्पर्श करायचा अवकाश कीं त्यांनीं आपलं अंतरंग खोलून आपल्या सर्वस्वाचा वर्षाव मजवर सुरू केलाच! ह्या माझ्या जिव्हाळ्याच्या ग्रंथमंडळींना मीं मुद्दामच माझ्या उशालगतच्या आलमारींत जागा दिली आहे; कारण असं पडल्या पडल्या देखील त्यांच्या सान्निध्याचं सुख मला मिळावं. पण मला जरी त्यांच्या सान्निध्याचा लाभ सतत होत असला तरी ते मात्र बिचारे माझ्या स्वागताची अपेक्षा करीत कपाटांत तिष्ठत उभे असतात! कारण ग्रंथ खरेदी करण्याचा माझा हव्यास आणि मला मिळणारी फुरसत ह्यांचा मेळ घालणं कठीण होतं. शिवाय हप्त्याहप्त्यानें वाचन करायला लागणारा धीर माझ्या स्वभावांत नाहीं, म्हणून त्यांच्या वाचनाचे माझे बेत सारखे लांबणीवर पडत असतात. पण जेव्हां शेल्फवर पांच सहा ताज्या पुस्तकांची रांग सांचलेली माझ्या नजरेस पडते तेव्हां आतां आजारीपणाचीच फुरसत काढली पाहिजे, त्याशिवाय ह्यांचं वाचन व्हायचं नाहीं असं मला वाटूं लागतं! आणि ह्याच कारणास्तव माझे आजारीपणांतले दिवस इतके संस्मरणीय झाले आहेत. मागें एका तीन दिवसाच्या तापांत मीं प्रसिद्ध रशियन लेखक सोलोकॉव्ह ह्याची And Quiet Flows the Don ही रम्योदात्त कादंबरी वाचली. अंथरुणावर पडून ती वाचतां वाचतां मी रशियन रणांगणावर कोसॅक लोकांच्या गर्दींत केव्हां घुसलों तें माझं मलाच कळलं नाहीं. तो सबंध दिवस त्या स्त्रीपुरुषांच्या सुखदुःखांचे आणि रणांगणावरील त्यांच्या अद्भुत पराक्रमांचे अनुभव मी घेत होतों. ज्या दिवशीं मीं तें पुस्तक संपवून हातावेगळं केलं, त्यावेळीं माझ्याच घरांत मला नवखं नवखं वाटूं

लागलं आणि मी आजारी होतों ही गोष्ट मला सांगून सुद्धा खरी वाटेना! आणि एका आजारांत मीं नामवंत फ्रेंच लेखक रोमाँ रोलाँ याची 'जां ख्रिस्तोफ' ही जगद्वंद्य कादंबरी वाचली. परवाच्या आजारांत शरद्‌बाबूंची 'पाथेरदाबी' ऊर्फ 'भारती' वाचून हातावेगळी केली. ह्या ग्रंथांनीं माझा आजारीपणाचा काल किती उज्ज्वल केला आहे तें माझं मलाच ठाऊक! आणि आज त्या आजारीपणाच्या स्मृति माझ्या मनांत रेंगाळत आहेत त्या तरी ह्या ग्रंथामुळेंच ना?

पण ह्या आजारीपणांत तापाचं प्रमाण जर का चढतं असलं तर वाचनाचा ग्रंथ आटपलाच! कारण अशा वेळीं वाचावयास लागणारा थंडपणा मजजवळ क्वचितच शिल्लक असतो. मेंदूची स्थिति तर ह्यावेळीं इतकी तल्लख झालेली असते कीं दुसऱ्याचे ग्रंथ वाचण्याऐवजीं स्वतःचेच निर्माण करण्याकडे प्रवृत्ति होते. हें जें मीं म्हटलं, तें अक्षरशः खरं आहे. गवयाच्या आवाजाप्रमाणं मेंदु एकदा तापला कीं त्याची फिरत सुरू होते. मग त्यांतून कशाकशाचे धागे निघतील तें सांगतां येणार नाहीं. कल्पनाशक्ति देखील इतकी तरल होते कीं नाहीं नाहीं तीं कल्पनाचित्रं मनश्चक्षूंना दिसूं लागतात. एका आजारांत मीं एका कादंबरीचं तपशीलवार कथानक तयार केलं होतं. शेवटल्या पूर्णविरामापर्यंत सर्व गोष्टी इतक्या बेमालूम जमल्या होत्या कीं तापांत मला उठवत नव्हतं म्हणून, नाहीं तर कादंबरीचं हस्तलिखित मी तिथल्या तिथें लिहून मोकळा झालों असतों. दुसऱ्या एका आजारांत मीं वाङ्मयाच्या इतिहासाचा प्रकरणशः आराखडा तयार केल्याचं स्मरतं. लघुकथा आणि लघुनिबंध ह्यांच्या कल्पना आणि घटना मला ह्या ग्लानींत किती सुचल्या असतील त्याची मोजदादच नाहीं! पण इंद्रधनुष्याचं जीवित ज्याप्रमाणं सूर्यास्ताबरोबर मावळावं त्याप्रमाणं साऱ्यांचं झालं आहे. हें सारं जरी क्षणवत् ठरलं, तरी त्या त्या वेळीं मला जें नवनिर्मितीचं सुख मिळालं तें कांहीं नाहींसं होऊं शकलं नाहीं. आणि ग्रंथकर्तृत्वाचं श्रेय एरवीं मला मिळो वा न मिळो, तें मला तापाच्या धुंदींत अनुभवायला मिळतं हें काय थोडं झालं!

अशा कितीतरी प्रकारांनीं मला सुख आणि समाधान हवंसं वाटलं कीं मला आजारी पडण्याची तीव्र इच्छा होते.

## बँक-बुक

परवां सकाळच्या पोस्टमननें माझ्या हातांत जें टपाल आणून दिलं त्यांत एक जाडजूड लांबट पाकीट असल्याचं माझ्या नजरेस आलं. पत्र हातांत येतांच तीं ताबडतोब फोडून वाचून पाहण्याची प्रवृत्ति सहसा कधीं होत नाहीं. तीं उघडून पाहण्यापूर्वी तीं कुणाकडून आलीं असावींत आणि त्यांत काय मजकूर असावा ह्याविषयीं तर्क करण्यांत आणि नंतर तो पडताळून पाहण्यांत जी एक गंमत आहे, ती प्रत्येकजण नेहमीं करून पाहत असतोच. त्या लांबट पाकिटानें त्या दिवशीं माझं लक्ष वेधून घेतलं होतं. मीं सारीं पत्रं बाजूला सारलीं आणि त्या लिफाफ्याविषयीं मनांत तर्क चालवूं दिले. युनिव्हर्सिटीला मीं कोणत्याही प्रकारें पृच्छा केली नव्हती. तेव्हां तिकडून ह्या प्रकारचं पाकीट यावं ही कांहीं शक्यता नव्हती. शिवाय तें युनिव्हर्सिटी-कडून आलं असतं, तर त्यावर O. H. M. S. हीं अक्षरं आणि डाव्या बाजूच्या खालच्या कोपऱ्यांत ' डोंगरकेरी ' ही लपेटदार सही माझ्या दृष्टीस पडली असती. गेल्या सहा महिन्यांत माझ्या हातून कांहीं लेखन झालंच नव्हतं. तेव्हां एखाद्या ध्येयवादी मासिकाच्या संपादकाकडून अशा पाकिटांतून तें साभार परत येण्याचीही आशा नव्हती. तेव्हां ह्या पाकिटांतून कांहीं अनपेक्षित असें हातीं लागणार ह्या कल्पनेनं माझं मन उल्हसित झाल्यावांचून राहिलं नाहीं. पण मग त्या लिफाफ्याचं तोंड उघडतांच माझ्या हातीं जें कांहीं आलं त्यानें माझी मोठी निराशा झाली. कारण त्या पाकिटांतून माझं मुंबईस राहिलेलें बँक-बुक तिथल्या लोकांनीं मजकडे पाठवून दिलं होतं.

तें बँक-बुक हातांत येतांच माझी नजर माझ्या खोलींत टांगलेल्या जवाहर-लालांच्या भव्य तजविरीकडे वळल्याशिवाय राहिली नाहीं आणि त्यामुळें माझ्या आठवणी चाळवल्या जाऊन एक प्रसंग माझ्या डोळ्यांपुढें उभा राहिला.

मुंबईस असतांना माझी पत्नी एकदा आजारी होती. आपल्याला बरं नाहीं म्हणून मलाही तिनें घरीं ठेवून घेतलं होतं. दुपारचं जेवण उरकल्यावर हळूच हसत हसत तिनें मजकडे विषय काढला. “मी एक काम सांगितलं तर तें अगदीं न चुकतां कराल?”

मी मानेनें होकार देतांच तिनें आपल्या गादीखालून बँक-बुकाची घडी काढली आणि ती माझ्या हातांत देत तिनं हसत मजकडे पाह्यलं.

"हें काय?" तिचा भावार्थ न कळून मीं विचारलं.

"तेवढं ठेवा बँकेंत." तिनें उत्तर दिलं.

"पैसे ठेवूं बँकेंत!" मी आश्चर्यानें उद्गारलों आणि हसलों.

पण तिनें माझ्या हातचं तें पुस्तक घेतलं आणि त्याची घडी उघडून तें मजपुढें केलं. त्यांत दहाची एक व पांचाची एक अशा नोटा दिसतांच मी चकित नजरेनें तिजकडे पाहूं लागलों.

"सांगीन मग, आतां ठेवून या बँकेंत." तिनें माझी समजूत केली.

कोटटोपी चढवून मी बँकेंत गेलों. तिथें खिडकीवर चिकार गर्दी होती. गर्दी ओसरेपर्यंत एक चक्कर मारून यायचा मीं विचार केला. पलीकडच्या एका रस्त्यानें मी हिंडत होतों, तोंच माझ्या कानावर कुणाची तरी हाक पडली. मी वळून पाह्यलं तर दुकानाची शेवटली फळी लावणारा एक बोहरी मला बोलावीत होता.

"सायब, तुमी मागितलेला टागोरांचा फोटो तो आला हाय. या या पगा तर." मी जवळ जातांच तो म्हणाला. गुरुदेवांचा एक उत्कृष्ट फोटो आपल्याकरतां पैदा करण्याबद्दल मीं त्याला केव्हांतरी सांगितल्याचं मला स्मरलं. त्यानें आपल्या दुकानाच्या दोन फळ्या पुन्हा काढल्या व मला टागोरांची भव्य तजबीर दाखविली. तब्येत खूष व्हावी अशीच ती होती ह्यांत शंका नव्हती. पण पलीकडे ठेवलेल्या जवाहरलालजींच्या फोटोकडे पाहतांच तर मी मोहून गेलों. मी खूष झालेला पाहातांच तो म्हणाला, "काय हाय का नाय माल? अरे, सकाळपासून वीस गिऱ्हाईक मागून गेला, पण ही तुमाला द्यायची म्हणून दिली नाय."

"आणि ही जवाहरलालजींची?" मीं विचारलं.

"ती बी द्यायचीय् एका शेठला!"

"नाहीं नाहीं, मलाच द्या ह्या दोन्ही." मीं आग्रह धरला. आणि थोड्याशा आग्रहानंतर त्यानें जेव्हां होय म्हटलं, तेव्हां माझा आनंद गगनांत मावेना. पण मग जेव्हां पैसे देण्याकरितां म्हणून मीं खिशांत हात घातला

तेव्हां मात्र माझ्या मनाची चलबिचल झाल्याशिवाय राहिली नाहीं. मीं चाचरतच म्हटलं, "पण शेटजी......"

माझी मनःस्थिति त्याच्या लक्षांत आली. तो म्हणाला, "हें पाहा, आतां नेल तोच ये फोटो मिळेल. संध्याकाळीं हे इथें राहेल नाय."

मीं मनाचा निश्चय केला आणि बँक–बुकांतल्या नोटा देऊन त्याचं बिल चुकतं केलं. "उंः, त्यांत काय मोठं!" मीं मनाशीं म्हटलं, "पगार झाला, कीं पंधरा रुपये ठेवून देऊं बँकेंत." आणि दोन आवडत्या व्यक्तींच्या उत्कृष्ट तजबिरी मिळविल्याच्या आनंदांत मी घरीं परतलों. पण मग ह्या प्रकारानें चिडलेल्या पत्नीचा मला जो रोष सहन करावा लागला त्याची आठवण आज देखील माझं मन बेचैन करून टाकीत आहे.

एकंदर काय, तर घरखर्च चोखपणें चालवून गांठीं पैशांचा संग्रह करणं ही एक मोठी कला आहे आणि वरून दिसते तितकी ती सोपी खास नाहीं, असं अनेक अनुभवांनीं माझं मत बनलं आहे. लहानपणीं गॅदरिंगच्या वेळीं निरनिराळ्या शर्यती ठेवीत असत, त्यांत दांतांत चमचा धरून त्यांतून रस्त्यांतल्या अडचणींना न जुमानतां लिंबू इच्छित स्थळीं नेण्याची जी एक शर्यत असे, ती मला अतिशय गमतीची वाटे. मजेची वाटणाऱ्या परंतु जिंकायला अत्यंत अवघड अशा ह्या शर्यतीइतकंच किंबहुना त्याहूनही कठीण असं ह्या संसाराच्या अडचणींतून शिलकेचं लिंबू बँकेपर्यंत संभाळीत नेण्याचं काम आहे. ही शर्यत जिंकण्याकरितां मीं काय थोडे परिश्रम केले आहेत! पण बहुतेक वेळेला मी सुरुवातीसच बाद झालों आहें.

कारण नूतन वर्षारंभाच्या पूर्वरात्रीं एखाद्या सात्त्विक विद्यार्थ्यानें ज्याप्रमाणें दररोज वक्तशीरपणें व्यायाम करण्याचा निश्चय करावा व तो डायरींत नमूद करून ठेवावा किंवा एखाद्या विवेकी माणसानें 'उद्यांपासून सिगरेटला स्पर्श करायचा नाहीं' अशी डायरींत नोंद करून ठेवावी, त्याप्रमाणें पगार होण्यापूर्वी मीं अनेकदां निश्चय केलेला मला आठवतो, कीं ह्या महिन्याला कमींत कमी इतकी रक्कम शिल्लक टाकायचीच. पण वर सांगितलेल्या वर्षारंभ-निश्चयांची वर्षान्तीं जी वासलात लागते अगदीं तशीच माझी गत होत असे. कारण एक तर पगार घेऊन बाहेर पडावं आणि वाऱ्याच्या वावटळीनें हातांतील नोटांचीं चिटोरीं भिरीभिरीं देशो-

घडीस उडून जावींत, त्याप्रमाणें माझ्या पगाराची गत सुरुवातीच्या तीन चार दिवसांत व्हावयाची ! आणि ह्या मासिक देणेदारांच्या वावटळींतून कांहीं सुरक्षित राह्यलंच तर त्यावर आमचे अनेक मनोरथ उड्या घेत असायचे ! अमुक एक गोष्ट घ्यावी, कीं तो मोह टाळून पैसे बँकेंत जमा करावेत ह्या अनिश्चिततेंत जों असावं तों तिसरंच कांहीं त्रांगडं उपस्थित होऊन आमची शिल्लक त्यांत गडप व्हायची. एखाद्या महिन्याला कोणी अनपेक्षित पाहुणाच उपस्थित व्हावा आणि त्याच्या सरबराइत आमची पुंजी कारणीं लागावी. दुसऱ्या एखाद्या महिन्याला आजारपणच पाहुण-चाराला यावं. मग कर्ज न काढतांच निभावलं तर शेपटीवर निभावलं म्हणण्याची पाळी यायची. पुन्हां केव्हां तरी कुणाचा स्मारकनिधि उभा राह्यचा आणि त्यांत आमचा निधि गडप व्हायचा ! कधीं दुसऱ्याच्या मदती-करितां स्वतःची मदत गमावून बसायची पाळी यायची, तर केव्हां आमच्याच बुद्धीला ऐन वेळीं मोह व्हायचा आणि ध्यानीं मनीं नसणाऱ्या सौद्यांत आम्हीं लुबाडले जायचे. दैव देतं अन् कर्म नेतं ह्या कहाणींत ब्राह्मणाच्या मुलाला निरनिराळ्या सोंगानें लुबाडणाऱ्या कर्माचाच अनुग्रह आमच्या कर्मानें घेतला होता कीं काय नकळे !

एवढं होऊनही ज्या ज्या वेळीं मला बँकेंत जाण्याचा प्रसंग आला, त्या त्या वेळीं पैसे ठेवतांना मला आल्हाद तर झाला नाहींच, उलट तिथल्या एकंदर वातावरणाबद्दल माझ्या मनांत एक अढीच उत्पन्न झाली. तिथें काम करणारीं माणसंच घ्या ना. नेहमींच्या व्यवहारानें त्यांची आपली ओळख झालेली असते. एरवीं तीं ती दाखवीतही असतात. पण तीं एकदां खिडकी-मागच्या आपल्या आसनावर विराजमान झालीं, कीं परिचयाचा हुंकार किंवा ओळखीचं स्मित कांहीं त्यांच्या तोंडावर उमटायचं नाहीं. मुखवटा चढविल्यासारखे साऱ्यांचेच चेहेरे गंभीर अन् संत्रस्त ! मला वाटतं, कीं त्या जागेचा गुणच असा असावा. तिथें नाण्याचा कठोरपणा आणि नोटांचा कागदीपणा ह्यांचंच वर्चस्व चालावं. पैसा हा तिथल्या व्यवहाराचा प्राणच असल्यानें पैशापुढें तिथें माणूस हिशेबी नसावं हें योग्यच होय ! आणि काम उरकण्यास विलंब लागल्यामुळें ज्यांचेवर तिथेंच कांहीं वेळ रेंगाळण्याचा प्रसंग येतो, त्यांचेही एकमेकांबद्दलचे अनुभव फारसे निराळे असतील असं

वाटत नाहीं. कारण आपला नंबर पुकारला जाईपर्यंत एकाच बांकावर बसलेले चार आसामी पासबुक व नोटांचं पुडकं असलेल्या आपल्या आंतल्या खिशावरून, बाहेरून हात फिरवितांना एकमेकांकड साशंकतेनें पाहत असतात. एवढंच कशाला, पैसे ठेवायला आलेलीं दोन ओळखीचीं माणसं बँकेंत एकमेकांस भेटलीं तर शक्यतोंवर एकमेकांशीं बोलायचं टाळतांना आढळतात! हो, कदाचित् बोलण्याच्या ओघांत शिलकेचा आंकडा विचारायचा मोह झाला तर! आणि बँकेच्या व्यवहाराशिवाय मनुष्य सर्व बाबतींत खरं बोलूं शकतो हें ह्यांना माहीत नसतं असं थोडंच आहे!

मला आठवतं कीं एकदा मी पैसे भरावयाचे फॉर्म भरून खिडकीशीं जों जातों, तों तिथें माझ्या ओळखीचा एक वाणी नगद रुपयांच्या चवडी आंतल्या कारकुनाकडे सरकवीत होता. मीं त्याच्याकडे पाहून मंदस्मित केलं आणि खिशांतले पैसे न काढितां खिडकीच्या जरा बाजूलाच उभा राहिलों. तोंच त्या वाण्याच्या ओळखीचा एक मारवाडी तिथें घुसला आणि आपल्या खिशांतलं दहा दहाच्या नोटांचं एक भलं मोठं पुडकं काढून तें त्यानें त्या खिडकींत सरकवलं. कारकून रुपयांच्या चवडी मोजून घेतच होता. त्या दोघांच्या गर्दींत मला माझं घोडं पुढें दामटणं अशक्य वाटूं लागलं. त्या दोघांतून मला पुढें घुसतां येत नव्हतं म्हणून नव्हे, तर एकाच्या नाण्यांच्या चवडीपुढें आणि दुसऱ्याच्या नोटांच्या पुडक्यापुढें मला माझी रक्कम इतकी क्षुद्र वाटली कीं मी स्वतःशींच हंसलों आणि म्हणालों, "आज कांहीं हें जमेलसं दिसत नाहीं. गर्दी फार दिसते आहे. आपण उद्यांच येऊं" आणि मी तिथून काढता पाय घेतला!

ह्या सगळ्याचं तात्पर्य काय, तर त्या ह्या बँक-बुकांत माझ्या नांवं आज दोन आणे नऊ पै शिल्लक आहेत हें!

# पानाचा षोक

" आम्ही वृद्ध माणसं घरांत आहोंत कीं नाहीं ह्याची दाद सुद्धा नसते तुम्हां तरुणांना." अशी नेहमीं तक्रार करणाऱ्या माझ्या वडिलांना मी पत्र लिहीत होतों. " तुम्ही येथून गेल्यापासून आम्हांला इतकं चुकल्याचुकल्यासारखं होत आहे! सकाळीं अंथरुणांत जाग यावी आणि तुमचं प्रेमळ आवाजांतलं प्रातःस्मरण कानीं येऊं नये. किती अडखळल्यासारखं होतं! स्नानाच्या वेळीं सुरू असणारा तुमचा गंगास्तोत्राचा घोष ऐकायला मिळूं नये, कोण चुटपुट लागून राहते! आणि तुम्ही म्हणत असतां, आम्हांला तुमची दाद नसते! उगीचच का मग इतकं चुकल्याचुकल्यासारखं वाटतं आम्हांला? पण सर्वांत तुमची गैरहजेरी जर केव्हां तीव्रपणानें जाणवत असेल तर ती जेवणानंतर! न्हाणीघरांतून आंचवून बाहेर पडावं आणि तुमच्या पानाच्या खलबत्त्याचा खणखणाट ऐकूं येऊं नये म्हणजे जाणीव होते कीं आजही आपण वडिलांच्या पंक्तीला मुकलों! हो, पण तुम्हांला तेथें कळीदार पानं मिळताहेत ना? जातांना तुम्ही घरचा कात आणि चुना न्यायला विसरलां नाहीं ना? आणि परवां दिल्लीहून मागविलेला जर्दा—? मीं घरांत चौकशी करतों आणि जरूर असली तर पाठवून देण्याची व्यवस्था करतों—" सही करून मीं पत्र संपवलं आणि समाधानाचा एक निश्वास टाकला.

माझं हें पत्र वाचून वडिलांना आनंद झाल्याशिवाय राहणार नाहीं ह्याबद्दल मला खात्री होती. कोठल्याही पित्याविषयीं कोणत्याही सुपुत्राला वाटावा इतका जिव्हाळा मला माझ्या वडिलांविषयीं वाटत होता. पण तो प्रकट करण्याचे प्रसंग एरवीं किती येत असतात! आजच्या माझ्या या पत्रानें त्यांच्या मनांतला रोष नाहींसा झाल्याशिवाय राहाणार नाहीं आणि यदाकदाचित तो सुरुवातीच्या मजकुरानें झाला नाहीं तरी तो नंतरच्या मजकुरानें खास होईल ह्याबद्दल मला यत्किंचितही संशय नव्हता. कारण त्यांच्या पानाच्या षोकाविषयीं जी मीं आस्थेवाईकपणें चौकशी केली होती, ती वाचून त्यांची कळी खुलल्याशिवाय राहणार नाहीं. त्यांनीं आपल्या

उभ्या आयुष्यांत जर कोणता षोक केला असेल तर पानाचा आणि तो असा कीं त्याबद्दल कुणालाही कौतुक आणि आदर वाटावा!

आमच्या वडिलांचा हा पानाचा षोक म्हणजे आमच्या घराचं एक वैभव आहे. आमच्या दिवाणखान्यांत पाऊल ठेवतांच स्वच्छ बिछायितीवर शुभ्र गादीतक्क्याजवळ मांडलेलं पानाचं साहित्य पाहून कुणाचंही मन उल्हसित झाल्यावांचून राहणार नाहीं. इतर कोणत्याही बाबतींत हयगय झालेली वडिलांना खपेल, पण ह्या बाबतींत यत्किंचितही निष्काळजीपणा ते सहन करणार नाहींत. किंबहुना तशी पाळी येऊं नये म्हणून ती सारी व्यवस्था जातीनेंच पाहायचा परिपाठ त्यांनीं ठेविला आहे. सुवर्णकांतीनें झळकणारं त्यांचं लखनौचं पानदान कोणीं केव्हांही उघडून पाहलं, तरी त्यांत केतकीसारखीं पिवळीं जर्द पानं मोठ्या निगेंत ठेवलेलीं आढळतील. पानांची निगा राखण्यांत रोज त्यांचा तास अर्धा तास तरी खास जात असेल! बाजारांतून शेलकींच पैदा केलेलीं पानं घरीं आणल्यावर स्वच्छ पाण्यांत धुवायचीं आणि मग टॉवेलवर सुकवून पानदानांतल्या ओलसर फडक्यांत लावून ठेवायचीं हा त्यांचा संध्याकाळचा ठरीव कार्यक्रम! चुन्याचीही मिजास त्यांनीं किती ठेवावी! कळीदार चुना पैदा करावा, तो नेमक्या तऱ्हेनें मडक्यांत भिजवावा, लोण्यांत खलून त्यावर केशरी छटा चढवावी अन् मगच तो चुन्याच्या पात्रांत भरावा! साधासुधा चुना त्यांना चालणार नाहीं! काताचंही असंच. केवड्याच्या नाहींतर गुलाबपाण्यांतल्या कातगोळ्या त्यांच्या आवडीच्या. त्याशिवाय शिरशीची हिरवी टपोर वेलची, तुकतुकीत वेचीव जायपत्री आणि भाजलेली दाणेदार बडीशेप या मालमसाल्यानें त्यांचं पानदान सज्ज असायचं. काठेवाडी भाजलेल्या सुपारीशिवाय ते दुसरी तोंडांत ठेवणार नाहींत. पानाच्या ह्या साहित्याजवळ त्यांचा घाटदार खलबत्ता तिष्ठत असायचा आणि पलीकडे चकचकीत डेरेदार तस्त विड्याच्या सेवेला हजर असायचं. निवांतपणें जेवण उरकल्यावर गोविंदनामाचा उच्चार करीत ते एकदा पानाच्या साहित्याशीं येऊन बसले कीं त्यांत त्यांचा तास अर्धा तास खुशाल जायचा.

मला वडिलांच्या ह्या षोकाबद्दल नितान्त आदर वाटतो. पण कोणत्याही पानबहाद्दराबद्दल मला आदर वाटतो असं ह्यावरून कुणीं अनुमान

काढलं तर तें चुकीचंच ठरेल. कारण मला वडिलांच्या चैनीबद्दल कौतुक वाटत नसून त्यांच्या षोकांत दिसून येणाऱ्या त्यांच्या कलासक्तीबद्दल ! केवळ शेलकंच साहित्य वापरण्याच्या हव्यासांत त्यांची जी रसिकवृत्ति दिसून येते ती कौतुकास्पद नाहीं असं कोण म्हणेल ? कलावंताच्या चोखंदळ अंतःकरणानें ते ह्या मुखविलासाचा आस्वाद घेत असतात. नाहीं तर आमच्या वडिलांचे स्नेही बाबुराव ; तेही पानाचे षोकी आहेत, पण त्यांची तऱ्हा औरच ! केव्हांही पाहा. त्यांचा खिसा चंचीनें आणि तोबरा पानानें फुगलेला असायचा. आणि पान खायचं म्हणजे काय, तर ओल्या-सुक्या पानाची धांदोटी चंचींतून काढायची, त्याला मनसोक्त चुना फासायचा आणि तें तोंडांत कोंबतांच वर तंबाखूचा बार ठासायचा. बाबुरावांचंच उदाहरण कशाला ! घरोघरीं असे पुरुष आढळतील कीं ज्यांची पानसेवनाची तऱ्हा बाबुरावांनाही मागें सारणारी असते. बाबुराव पानाचं तरी निमित्त करतात ; पण हे बहाद्दर पान तर राहूंच द्या, पण चुनाही नसला तरी भिंतीचा खरवडून आपली तंबाखूची लज्जत भागवून घ्यायला कमी करणार नाहींत. आमच्या वडिलांना निर्भेळ कलावादी समजलं, तर ह्या वीरांना जीवनवादीच म्हणावं लागेल ; कारण ह्या लोकांच्या पानाचा प्रपंच हा पानाच्या आस्वादाकरितां नसून तो तंबाखूच्या तलफेकरितां असतो आणि जीवनवादी कलावंताप्रमाणं पान असेल तर पानाबरोबर आणि नसेल तर त्याशिवाय केवळ तंबाखूचा बार भरण्यांतच ह्यांचं पर्यवसान व्हावयाचं ! कलेकरितां कला कीं जीवनाकरितां कला ह्या कलहाचं पिल्लूं अशा रीतीनें पान-तंबाखूच्या प्रांतांत शिरलेलं पाहून आमच्या साहित्यिकांना आनंद वाटल्यावांचून राहणार नाहीं. पण ह्या लोकांनीं ह्या वादाला अजून रंग चढविलेला दिसत नाहीं. आणि पान-तंबाखूनें आपलंच मुख रंगविण्यांत दंग झाल्यामुळें वादाच्या निमित्तानें दुसऱ्याचं श्रीमुख रंगविण्यापर्यंत ह्यांची मजल गेलेली दृष्टीस पडत नाहीं.

वडिलांच्या ह्या षोकाबद्दल माझं एवढं चांगलं मत असूनही मला मात्र ती संवय लागूं नये ह्याचं इतरांप्रमाणं मलाही राहून राहून आश्चर्य वाटतं. घरांत एवढं साहित्य सज्ज असतां त्याची सेवा नियमितपणें घेण्याची बुद्धि मला होऊं नये ह्याबद्दल कधीं कधीं मला खेद वाटल्यावांचून राहत नाहीं.

पण ह्याचा अर्थ मी कधींच पान खात नाहीं असा नव्हे. कधीं लहर लागली म्हणजे आमच्या राणीसाहेब आम्हांला त्रयोदशगुणी विडा करून देतात; तेव्हां त्याचा स्वीकार करण्यांत आम्हांला आनंदच वाटतो. पण तो सेवन करीत असतां त्याच्या रसास्वादापेक्षां तो ज्या आपुलकीनें करून दिलेला असतो त्याच्याच आस्वादाकड माझं लक्ष असतं. विडा कसा जमला आहे हें पाहाण्यापेक्षां तो कसा रंगला आहे हें आरशांत पाहाण्याची मला इच्छा होते. कारण विड्याच्या रंगानें आपण आपल्यावर असलेल्या प्रेमाची उत्कटताच अजमावून पाहात नसतों काय? जीभ रंगून लाल चटक होणं हें प्रेमिकांच्या महद्भाग्याचंच लक्षण होय! म्हणूनच विवाहाच्या सीमारेषेवर उभीं असणारीं तरुणतरुणी विडा खातांच जीभ काढून पाहाण्याचा चाळा वारंवार करीत असतात. ह्या त्यांच्या गोड चाळ्याची मधुर चेष्टा करण्याचा मोह सहसा कुणाला आवरत नाहीं. आणि ही चेष्टा जर का मार्मिक ठरली, तर तिचा परिणाम रंगलेल्या विड्याशीं स्पर्धा करणारी लज्जेची रक्तिमा गालावर पसरविण्यांत होतो आणि एका व्यक्तीचं हळुवार मनोगत अभावितपणें बाहेर फुटतं!

ह्या साऱ्या गोष्टी पटूनही पानसेवनाविषयीं वाटावी तितकी आसक्ति मला वाटत नाहीं ही गोष्ट तितकीच खरी! ती कां वाटूं नये ह्याबद्दल मी जेव्हां विचार करूं लागतों, तेव्हां पानाविषयींची अप्रीति माझ्या मनांत कुठें तरी खोल रुतून बसली असावी असं मला वाटूं लागतं आणि मला एक प्रसंग आठवूं लागतो. मी अगदीं लहान–चार वर्षांचा–असेन त्यावेळीं. आम्ही सर्व नाशिक जिल्ह्यांतल्या एका खेडेगांवीं एका नातेवाइकाच्या लग्नानिमित्त गेलों होतों. आम्ही लहान मुलं लग्नसमारंभाचा आनंद मनसोक्त लुटीत होतों. प्रयोजनाच्या दिवशीं जेवणं अगदीं थाटामाटानें झालीं. लहानासकट साऱ्यांना टपोर सुरेख विडे वाटण्यांत आले. विडे खाऊन आम्ही जानवस्या-कडे परततों, तोंच रस्त्यांत एकच गोंधळ माजला. सारीं बायकामुलं, कुणी मळमळीनें तर कुणी ओकारीनें बेजार झालीं. मुलांचा एकच हलकल्लोळ, मी तर ओकतां ओकतां हैराण झालों. मोठी मंडळी मात्र सुरक्षित होती. तीं व्याह्यांना लाखोली मोजूं लागली. व्याही आले. त्यांनीं पदर पसरून क्षमा मागितली. कारण विडे लावण्याचं काम जिच्यावर सोपवण्यांत आलं

होतं, तिच्या अधु दृष्टीमुळें विड्यांत कुटलेल्या सुपारीऐवजीं तंबाखूच घातली गेली होती! तेव्हांपासून विड्याबद्दल एक प्रकारचा तिटकाराच माझ्या मनांत उत्पन्न झाला होता. आणि हरिभाऊंची 'पण लक्षांत कोण घेतो?' ही कादंबरी मीं वाचली नसती, तर तो कधीं कमी झाला असता कीं नाहीं कुणास ठाऊक! कादंबरींतला तोही प्रसंग मला अजून जसाच्या तसा आठवतो. रात्रीचीं जेवणं लवकरच उरकलीं आहेत. रघुनाथ गांवाला जायला निघाला आहे. बाहेरच्या सोप्यांत तो सर्वांचे निरोप घेत आहे. तांगा दारांत उभा आहे. रघुनाथला निरोप द्यायची उत्कट इच्छा असूनही यमू स्वयंपाकघरांत उष्टीं आवरत आहे. मनांत पुष्कळ असूनही तिला बाहेर जातां येत नाहीं. तांगा निघाल्याचा आवाज येतो. ओणव्यानेंच ती आपलीं आसवं दंडावर चोळीला पुसते. जेवण झाल्यावर द्यायचा म्हणून तयार ठेवलेला विडा तिच्या ओच्यांतच राहून गेलेला असतो. विड्यासंबंधींचा हा करुणरम्य प्रसंग मी कधीं विसरेन असं वाटत नाहीं. आणखी एक प्रसंग मला स्मरतो. मी मागें दिल्लीला गेलों होतों. तिथल्या वातावरणांत मोगली विलासाचं ऐश्वर्य अजून जिवंत असल्याचं प्रत्यंतर मला ठिकठिकाणीं येत होतं. रात्र चांदणी होती. आम्ही भटकायला बाहेर पडलों होतों. एका विख्यात मुसलमान पानवाल्याच्या दुकानीं आम्ही थांबलों. मी चार फर्मास पानांची मागणी केली. त्यानें विचारलं, "केवढ्याचीं देऊं?" मी त्याला रुबाबांत म्हणालों, "केवढ्याचीं देतोस बाबा?"

तो म्हणाला, "तुम्ही मागाल तशीं. चार आणे, आठ आणे, रुपया, दोन रुपये, पांच रुपये—कोणतीं घेतां?"

"काय, पांच रुपये?" मीं सर्द होऊन विचारलं.

"होय पांच रुपयांचं सुद्धां आहे. मोत्याचा चुना, सोन्याचा कात आणि असली मोगली मसाला. अगदीं शहानशहा खात तसलं पान करून देतों."

मला चांदणी चौकांतल्या अत्तरवाल्याची आठवण झाली. त्यानें मला ऐशीं रुपये तोळ्याचा हिना दाखविला; आतां हा पानवाला मला पांच रुपयांची पट्टी दाखवीत होता.

पण इतकं असूनही मी पान-तंबाखूच्या व्यसनापासून अलिप्त राहिलों होतों आणि त्याबद्दल वडिलांना मनांतून समाधानही वाटत असावं.

मीं तें व्यसन जडवून घेतलं असतं तर त्यांत त्यांना वाईट वाटलं असतं असंही म्हणतां यावयाचं नाहीं. कारण आपलं व्रत पुढें चालविणाऱ्या सुपुत्राबद्दल कोणत्या पित्याला आनंद होत नाहीं ? पण मीं हें विड्याचं व्रत वडिलांच्याच एकनिष्ठेनें पुढें चालवावं असं जर कुणाला कळकळून वाटत असेल तर तें माझ्या पत्नीला. पान-तंबाखूच्या कुलाशीं चालत आलेला हा घरंदाज संबंधच तिला पसंत होता. त्या कुलाशीं मी करीत असलेली नवी सोयरीक तिला मान्य नव्हती आणि वडिलांना तर ती मुळींच मानवली नसती. तंबाखूच्या एका आधुनिक कन्येशीं मीं संबंध ठेवावा ही कल्पनाच त्यांना छिचोर वाटली असती आणि म्हणूनच मी हा सारा व्यवहार घराबाहेर आणि चोरटा ठेविला होता. पण ह्या माझ्या गुपिताचा संशय माझ्या पत्नीला मधून मधून येत होता. मला आतां वेळींच खबरदारी घेतली पाहिजे. सिगरेट ओढल्यावर पान खाल्ल्याशिवाय घरीं येतां कामा नये !

# साखरेची गोडी

ज्या कारणाकरितां मी गेले कांहीं दिवस माझ्या ‘ क्ष ’ मित्राकडे जायचं टाळीत आहें, त्याच कारणाकरितां मला माझ्या इतर मित्रमंडळींनाही घरीं बोलवायचं टाळावं लागेल, असं दिसतं.

त्याचं असं झालं. सुटीचा दिवस म्हणून नेहमींप्रमाणं सकाळीं मी त्याच्याकडे गेलों. निरनिराळ्या विषयांवर आमच्या गप्पा चालू झाल्या. सुरुवात छान झाली आणि संभाषणाला रंगही भरूं लागला. पण माझा मित्र एकदा घरांत जाऊन आला आणि त्याचा उत्साह एकाएकीं खचल्याचं माझ्या लक्षांत आलं मी. मात्र बोलतच राहिलों. माझा मित्र जांभया देत “ हं आणखी काय ? ” “ आस्सं ! ” “ विशेष काय ? ” अशा तुटक प्रश्नांची पुनरुक्ति करूं लागला ; तेव्हां माझाही उत्साह ओसरूं लागला. माझी चुळबुळ सुरू झाली. बोलण्यांतलं लक्ष उडूं लागलं. मी घड्याळांत पाहिलं. एक तास होऊन गेला होता. आज कांहींतरी चुकतं आहे ह्याची अस्पष्ट जाणीव मला होत होतीच. पण आतां लखकन् माझ्या डोक्यांत प्रकाश पडला. आमच्या दोघांच्याही निरुत्साहाचं कारण माझ्या लक्षांत आलं. मी ताडकन् उठत म्हटलं, “ चला आपण बाहेरच पडूं या. ” त्यावर अगदीं कडवट चेहेरा करीत माझा मित्र म्हणाला, “ काय करावं, घरांत साखरच शिल्लक नाहीं. ” मला वाईट वाटलें. त्याचा तो चेहरा अजूनही माझ्या नजेरसमोर आहे.

आपल्या रोजच्या जीवनांत साखरेनें केवढी मोहिनी पेरली आहे ह्याचं प्रत्यंतर मला त्या दिवशीं पूर्णपणें आलं. मित्राच्या घरीं गप्पा मारायला जावं आणि तास अर्ध्यातासांत आंतील घरांतून स्टोव्हचा किंवा कपबशांचा मधुर आवाज ऐकूं येऊं नये ह्यासारखं निरुत्साहजनक दुसरं कांहींच नाहीं, हें संकोच सारून कबूल केलं पाहिजे. घरीं चहा मिळत नाहीं म्हणून आपण दुसऱ्याकडे चहा उकळायला जातों, असं कुणालाही म्हणतां यायचें नाहीं. पण ह्या पेयाचा प्रभावच असा आहे, कीं अंतर्मनांत त्याची अपेक्षा दबा धरून बसलेली असते आणि त्या गुप्त अपेक्षेनं गप्पांना रंग भरत असतो.

बैठक रंगत असतां एक क्षण असा येतो कीं त्या क्षणीं खोलींत चहाचा प्रवेश झाला नाहीं तर बैठकीचा बहर हमखास ओसरूं लागतो. कल्पना करा, चार दोस्त गप्पा झोडायला एकत्र जमले आहेत, हास्यविनोदाच्या फवाऱ्याबरोबर धूम्रपानाचे फवारेही खोलींत सुटत आहेत, संभाषणाचा प्रवाह खळखळून वाहत आहे, अशा वेळीं प्रत्येकाच्या मनांत कोणती इच्छा डोकावत असेल? शिष्टाचार बाजूला सारून सांगायचं म्हटलें, तर आतां ह्या क्षणीं कुणीतरी चहाचा ट्रे घेऊन प्रवेश करावा असंच प्रत्येकाला वाटत असतं. आणि अशा वेळीं चहाचा ट्रे पुढें आला नाहीं, तर गप्पांचा बदरंग तर टळत नाहींच, पण कधीं कधीं चर्चेला असं कांहीं वळण लागतं कीं मग चहाचा कप पुढें आला तरच तें आवरणं शक्य होतं! आणि गोष्टी जर निकरावर आल्या आणि चर्चेचं रूपांतर चिमट्यांत होऊं लागलं, तर मग परिस्थिति चहाच्याही आटोक्याबाहेर जाते आणि चहाबरोबर कांहीं चमचमीत पुढें आलं नाहीं तर तोंड गप्प होणं कठीण जातं. पण घरांतल्या सुगृहिणीच्या धोरणीपणामुळें चहाचं आगमन योग्य वेळीं झालं, तर शिष्टाचाराला साजेल इतपत अधीरतेनें प्रत्येकाचा हात कपाकडे धावतो आणि त्या चविष्ट पेयाचे गरम घोट घशाखालीं जातां जातां जिभेला विलक्षण तल्लखपणा येतो! मग कुणाला शेलक्या आठवणी सुचूं लागतात, कुणाच्या विशाल जीवनाला वाचा फुटते, तर कुणाच्या विनोदवृत्तीला उधाण येतं. बैठकीचा रंग मग कोठवर चालेल तें सांगतां येणार नाहीं.

साखर-नियंत्रणामुळें चहाची साधी मिजास करणं सुद्धा कठीण होऊन बसलं आहे. सकाळीं अंथरुणांतच कपबशांचा किणकिणाट ऐकूं आला नाहीं, तर कांहीं तरी भयंकर चुकल्यासारखं वाटूं लागतं. कांहींतरी शर्करायुक्त पेय घेतल्याशिवाय सकाळचे सारे व्यवहार थांबल्यासारखे वाटूं लागतात. एखादे दिवशीं चहाशिवाय स्नानभोजनादि कार्यक्रम उरकण्याची पाळी आली, तर पायऱ्या चुकवून जिना चढल्यासारखं वाटतं. साखरेचा आपल्या जिभेवर एवढा ताबा असावा ह्याचं मला नवल वाटत नाहीं, तर तिनें आपल्या मनावरही जें वर्चस्व मिळवलं आहे त्याचं मला आश्चर्य वाटतं. सकाळच्या पेयाचे गोड घोट प्यायला मिळाले नाहींत, तर सकाळचं वर्तमानपत्रही बेचव वाटूं लागतं; फार काय, सकाळचीं उन्हंही फिकटल्याचा भास होऊं लागतो.

स्वयंपाकघरांत साखरेला केवढं महत्त्व आहे पाहा. पक्वान्नापासून तो चटणी कोशिंबिरीपर्यंत कोठल्याही पदार्थाला तिच्या मध्यस्थीशिवाय पानावर स्थान मिळणं कठीण होतं. साहित्याप्रमाणें पाकसिद्धींतही नऊ रसांना स्थान असावं असं आपलं आहारशास्त्र सांगतं. पण तिखट, आंबट, कडू, खारट ह्या रसांचं सेवन करायचं झालं तर तें साखरेच्या पेरणीशिवाय कसं शक्य होणार? हे रस स्वभावतःच कर्कश; त्यांची निर्भेळ चव जिभेला रुचावी कशी? ह्या रसांना माधुर्य आणायचं, तर त्यांना साखरेची साथ घ्यावीच लागते. सोलाचं सार किंवा कैरीचं पन्हं, काऱ्यांची भाजी किंवा टोमॅटोचा रस्सा हीं साखरेच्या अभावीं साधणं शक्य आहेत काय? कोणत्याही रसाला चवदारपणा यायला गोडाची आवश्यकता असते. साखरेची ही मध्यस्थी राजकारणांतल्या सप्रू-जयकरांच्या मध्यस्थीइतकीच महत्त्वाची मानली पाहिजे. किंबहुना साखरेचं हें वर्चस्व आपण सुधारल्याचं लक्षण समजतों. आंबट ढवण आणि तिखट जाळ सार ओरपणारे किंवा अति मिठाचा आणि हिरव्या गार मिरच्यांचा भरपूर उपयोग करणारे लोक मागासलेले आहेत, त्यांची अभिरुची अजून रानवट आहे असंच आपण समजत नाहीं का? आणि खरंच आहे, ह्या कर्कश रसांचं अति सेवन करणारे वृत्तीनेंही कर्कशच असतात. फार तिखट खाणारा स्वभावानें तापट, फार आंबट सेवन करणारा वृत्तीनें तिरसट असतो असं आपलं शास्त्र सांगतं तें कांहीं खोटं नाहीं. ह्या आम्लरसादि तामस आहाराला राजसपणा आणायचा असेल तर त्यांत साखरेचा सात्त्विक पाक मिसळलाच पाहिजे.

साखरेचं हें स्वयंपाकघरांतलं अधिराज्य निरपवाद असंच आहे. पण स्वयंपाकघराबाहेरचाही तिचा प्रभाव कांहीं कमी नाहीं. कारण सर्वांनाच कांहीं मिठ्ठास बोलण्याचं साधत नाहीं आणि गोड वागण्याबद्दल तर बोलायलाच नको. ह्या गोष्टी कांहींशा जन्मजात असतात असं मानलं पाहिजे. ज्यांना त्या लाभल्या ते खरोखर सुदैवी. पण ज्यांना त्या लाभल्या नाहींत—असेच पुष्कळ—त्यांनाही माणसांत वागायचं असतं आणि त्यांचीं मनं राखायचीं असतात. साऱ्यांशीं आपले संबंध गोड असावे असं त्यांनाही वाटत असतं. रसाळ वाणीवर आणि मोहक वागणुकीवरच केवळ हें अवलंबून असतं, तर तुमची आमची स्थिति अति केविलवाणी झाली असती. पण

सुदैव आपलं कीं साखरेसारखी गोड जादुगारीण आपल्याला वश झाली आहे! तिच्या प्रभावानें आपण ह्या रोजच्या व्यवहारांत वाटेल तें करूं शकतों. एखाद्याशीं आपला खटका उडाला असला तर त्याला श्रीखंड-पुरीचा मलिदा चारला कीं तो सुतासारखा सरळ येतो. कांहींही कारणांनीं तटलेली बढती सुटावी अशी इच्छा असेल तर सणाच्या दिवशीं साहेबाला सुरती मिठाईचं पार्सल पोचलं कीं बस! चहाच्या सिंगल कपानें तर ह्या जगांत इतके चमत्कार घडवून आणले आहेत कीं त्यांची मोजदाद चित्रगुप्ताच्या वहींतच लागली तर लागेल!

दुसऱ्याला खूष करण्यास साखरेसारखं दुसरं गुणकारी कांहीं नाहीं. कारण साखरेचा आनंदाशीं असलेला संबंध तसाच निकटचा आहे. आनंदप्रसंगीं तोंड गोड करण्याची रीत उगीच नाहीं. आणि तोंड गोड करण्याबाबत साखरेची बरोबरी चुंबनदेखील करूं शकेल कीं नाहीं ह्याबद्दल मला शंका आहे. आनंदाचं प्रदर्शन गोडासारखं दुसऱ्या कशानंही होऊं शकत नाहीं. आनंदाची पूर्तता मिष्टान्न सेवनानेंच होऊं शकते, दुसऱ्या कशानें नाहीं. मग तो आनंद पुत्रप्राप्तीचा असो वा यशप्राप्तीचा असो. अशा प्रसंगीं पेढे मिळाले नाहींत तर बत्तासे अन् तेही मिळाले नाहींत तर साखरेची चिमटी. पण ती पाहिजे. ती मिळाली नाहीं तर त्या आनदांत वैगुण्य राहणार हें खास!

सणाचा अन् साखरेचा तर रक्तापेक्षांही दाट संबंध आहे. सणांतून गोड वगळा आणि खालीं कांहीं राहतं का पाहा. सणांतलं सारं काव्य साखरेच्या पोटीं जन्माला आलं आहे. ह्या काव्याचा रस त्या दिवशींच्या पक्वान्नांतून चाखायला मिळाला नाहीं तर सणांना विडंबनकाव्याचंच स्वरूप प्राप्त होईल. सणांच्या निमित्तानें आपण आपली साखर खाण्याची बालिशवृत्ति ताजी ठेवली आहे. 'वार्धक्यीं निज शैशवास जपणें' असंच कोणा एका कवीनें काव्यात्म वृत्तीचं लक्षण सांगितलं आहे ना, झालं तर मग. सणांच्या निमित्तानें आपण लहान मुलांचं साखर खाण्याचं व्रतच पुढें चालू ठेवलं आहे. फरक एवढाच कीं त्यांना नुसतीच साखर खायला आवडते आणि आपण नवीन कांहीं खाल्ल्याचा आनंद मिळावा एवढ्याकरितां तिचे निरनिराळे पदार्थ करून खातों. पण मला नुसतीच साखर खाण्याची

मुलांची ही आवड अधिक नैसर्गिक आणि निरागस वाटते. मला लहानपणची आठवण आहे. सणाच्या दिवशीं स्वयंपाकघरांत आईची गडबड सुरू आहे. तिनें निरनिराळया पदार्थांची सिद्धता सुरू केली आहे. सारं साहित्य मांडलं आहे. मध्येंच एका परातींत साखरेची रास रिचवून ठेवली आहे. तिची ती शुभ्र, रुपेरी, दाणेदार रास पाहून कुणालाही बालकाच्या गोड निरागस हास्याची आठवण व्हावी. त्या राशीच्या कमीजास्त ढिगावरून त्या दिवशींच्या सणाचं महत्त्व आम्हांला पटत आहे. मग स्वयंपाकघरांत आमच्या येरझाऱ्या सुरू व्हावयाच्या. पक्वान्नांत आमचं लक्ष क्वचित्‌च असे. तोंपर्यंत कुणीं धीर धरावा ? कारण डब्यांतून साखर निघायला लागल्यापासून तों तिचा पाक होईपर्यंत किती मुठींचा पाक आमच्या पोटांत होत असे तें सांगणं कठीण. साखरेच्या प्रत्येक नवीन मुठीबरोबर आईनें दिलेल्या शिव्याही त्या दिवशीं आम्हांला गोड लागायच्या.

हें सुख आतां दुर्मिळ झालं आहे. एक तर माझं आतां तें वय राहिलं नाहीं आणि दुसरं म्हणजे साखरेचं दुर्भिक्ष्य. पण मनाशीं मीं ठरवलं आहे कीं ज्या दिवशीं अर्धा शेर साखरेचा पुडा हातीं येईल त्या दिवशीं त्यांतली चिमुटभर तरी साखर नुसती तोंडांत टाकायची. आणि ती तोंडांत टाकून तोंड गोड करायला कांहींच हरकत नाहीं; कारण साखरेच्या ह्या दुष्काळांत आपण तेवढी तरी मिळवूं शकलों हा काय थोडा आनंद झाला ?

## लिफाफे

**माझ्या** अभ्यासिकेंत जें एक देवदाराचं पेटीवजा खोकं ठेवलेलं आहे त्यावरून माझं आणि माझ्या पत्नीचं नेहमीं भांडण होत असतं. तिचं म्हणणं, तें मीं तेथून काढून खालच्या सामानाच्या खोलींत टाकावं. सौंदर्यदृष्टीनें लावलेल्या आमच्या अभ्यासिकेंत तें अडगळ वाटण्यासारखं आहे, हें तिचं म्हणणं खरं असलं तरी मी तिला म्हणतों, “इथली सजावट उठून दिसावी म्हणून तरी तें इथेंच असावयास हरकत नाहीं. दृष्ट होऊं नये म्हणून तूं नाहीं पुष्पाला तीट लावीत? झालं तर मग.” कधीं कधीं ह्या माझ्या बोलण्यानें तिचं समाधान झाल्यासारखं दिसतं आणि तो विषय कांहीं काळ टळतो. पण कांहीं कारणानें तिचं मन बिनसलं असलं, तर ती अगदीं निकरावर येऊन विचारते, “थट्टा नको, ह्याच्या शोभेनें तुम्ही आपली शोभा करून घेणार काय?” ह्या तिच्या निकराच्या प्रश्नाला माझींही निकराचीं उत्तरं ठरलेलीं असतात. त्यांची झटापट झाली कीं ती तो नाद सोडून देते अन् तें खोकं तिथेंच ठेवून घेतल्याच्या निगरगट्टपणाचं समाधान मला मिळतं!

माझ्या ह्या कोडगेपणाचीं कारणं तिला पुरतेपणीं ठाऊक आहेत. तिलाच काय, मजकडे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीलाही तीं आतां माहीत झालीं आहेत. कारण जी कोणी नवीन व्यक्ति मजकडे येते, तिनें माझ्या अभ्यासिकेंतलं जेवढं म्हणून पाहण्यासारखं आहे तेवढं पाहून घेतलं म्हणजे मी अगदीं शेवटलं हुकमाचं पान उघड करण्याच्या आविर्भावानें तिला म्हणतों, “हें पाहा आमच्या घरांतलं सगळ्यांत मोठं आकर्षण!”

होय, सगळ्यांत मोठं आकर्षण! त्या पेटींत मीं जें साठवून ठेवलं आहे त्याचं वर्णन ह्या दोन शब्दांनीं होईल कीं नाहीं कुणास ठाऊक! कारण भाषा ही बोलून चालून दुबळी. आमच्या यशवंतरावांनीं कुठें तरी म्हटलं आहे ना? कीं

‘वाणीला दुबळीच निर्मिलि जयें तो धन्य वाटे मला  
वाणी व्यक्त जरी करील हृदयें व्यापार आटोपला’!

झालं तर! म्हणून तिच्या नादीं लागण्याऐवजीं मी ती प्रत्यक्ष उघडूनच प्रत्येकाला दाखवीत आलों आहें.

ती उघडतांच तींतलीं अगदीं कांठोकांठ खचून भरलेलीं पत्रं पाहून 'अरे बाप रे!' असे उद्गार कुणाच्याही तोंडून निघाल्याशिवाय राहत नाहींत.

माझा हा सांचलेला पत्रव्यवहार गेल्या कित्येक वर्षांतला आहे. पत्रांच्या प्रेमाकरितांच मीं हीं सारीं सांठवून जतन केलीं आहेत. आपल्या मोठेपणाचं एक लक्षण म्हणून कांहीं पत्रव्यवहार जमा करतात, कांहीं त्यांचा योग्य वेळीं खुबीनें उपयोग करण्याकरितां सांठवितात, तर कांहीं तो कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत प्रसिद्ध करण्याच्या मनीषेनें जपून ठेवीत असतात. मीं जो हा पत्र-संभार उराशीं बाळगून ठेवला आहे त्यांत ह्यांपैकीं एकही हेतु मुळांत नाहीं असं म्हटलं तर असत्याचं पाप माझ्या कपाळीं चिकटेल. माझ्या अप्रकट मनांत हे हेतु कुठें तरळत असल्यास मला माहीत नाहीं; पण मी एवढं अगदीं प्रतिज्ञेवर सांगू शकतों कीं माझ्या प्रकट मनांत सूर्यप्रकाशाइतका जो हेतु स्वच्छ आहे तो ह्या पत्रव्यवहारापासून मला असीम आनंद मिळतो हा होय!

मग तुम्हीच सांगा, माझ्या असीम आनंदाला मूळ होणारी ही पेटी अडगळीच्या खोलींत मी कशी लोटूं?

कारण ही पेटी मी इतरांना जशी अभिमानानें उघडून दाखवितों तशी मीही ती अभिमानानें उघडून पाहत असतों. ती उघडून पाहत बसणं हा एक माझा सुखाचा व्यवसाय आहे. दुसरं कांहीं करण्यासारखं नसलं, मन कुठें लागत नसलं, हिरमुसल्यासारखं वाटत असलं तर त्यावर ही पेटी उघडून बसणं हा एक रामबाण उपाय आहे! माझा चंदु आपल्या दप्तरांतला अजबखाना उघडून बसला म्हणजे मग त्याला 'खानापिना' कांहीं सुचत नाहीं, तसंच हा पत्रसंचय मीं काढला कीं माझं होतं.

किती जणांनीं, किती तऱ्हेनें हा माझा पत्रसंचय समृद्ध केला आहे! कित्येकजण आणि कित्येकजणी! हो जणी! जणी म्हटल्यावर मिस्किलपणानें हसण्याचं कारण नाहीं. ह्या जणींत माझ्या बहिणी आहेत, कांहीं मैत्रिणीही आहेत. माझा माझ्या पत्नीशीं झालेला लग्नपूर्व आणि लग्नोत्तर पत्रव्यवहारही ह्यांतच आहे. माझे मित्र–इंजिनियर, पायलट, डॉक्टर, शिक्षक, संपादक, नट–आणि काय वाटेल ते–ह्या साऱ्यांचा पत्रव्यवहारही ह्यांतच सांपडेल. शिवाय नात्याच्या माणसांचीं आणि परक्यांचीही पत्रं ह्यांतच सामील आहेत. थोडक्यांत, माझ्या चिमुकल्या जगांत जीं जीं जाणतीं माणसं वावरत आहेत

त्यांच्या हातचा एकतरी कपटा ह्यांत नाहीं असं होणार नाहीं.

अशा ह्या अनेक व्यक्तींच्या प्रकृति मीं ह्या माझ्या अजबखान्यांत पत्र-रूपानें सांभाळून ठेवल्या आहेत! प्रकृतीच नाहीं तर काय? पाहा, हें वरच पडलेलं कार्ड! ह्यांतला मजकूर वाचलात तर ह्या गमत्या माणसाची प्रकृति तुम्हांला समजून येईलच. पण त्याकरितां तेंही करण्याची जरूर नाहीं. कारण एक तर त्यांतला मजकूर जरी खाजगी नसला तरी तो मी तुम्हांला वाचून दाखविणार नाहीं. मजकूर खाजगी असो वा नसो, तो शक्य तोंवर खाजगी ठेवणं हें बंधन पत्रव्यवहार ठेवणारानें पाळणं अवश्य आहे आणि तें पाळणं मी माझं कर्तव्य समजतों. म्हणून तें वाचून दाखविण्याचा आग्रह करणार नसाल तर सांगतों कीं ह्या गृहस्थानें कार्डाशिवाय मला कधीं पत्र लिहिलं नाहीं. वास्तविक त्याची माझी मैत्री जुनी आणि जीवाची आहे. अन् आमचा पत्रव्यवहारही जिव्हाळ्याचा आहे. पण बिचाऱ्यानें कधीं म्हणून पाकीट लिहिलं असेल मला तर शपथ! मजकूर कितीही असो अन् कसाही असो, तो तो कार्डावरच लिहिणार. मग त्याला मित्रामित्रांतल्या पत्रव्यवहाराला पाकीट कशाला हवं असं वाटतं कीं आमचं खाजगी असलं तरी तें ‘उघडं गुपितच’ आहे असं वाटतं कीं पाकिटांनींच दुसऱ्याच्या मनांत कुतूहल उत्पन्न होतं आणि म्हणून तें चोरून उघडलं जाण्याचा संभव असतो असं वाटतं, कुणास ठाऊक? मात्र कार्डच लिहिण्यांत त्याचा कंजूषपणा असावा, दुसरं काय, असा संशय जर कुणीं प्रगट केला तर तो अगदीं निराधार आहे. ह्याच पत्रांत हें शेवटीं पाहा—‘कर्व्यांच्या आश्रमाला भाऊबीजेची ओवाळणी म्हणून कालच रु. ७५ पाठविले.’

आतां हा दुसरा मासला. किती सुंदर पाकीट हें! कागद तरी किती मोहरेदार! आणि हें निळ्या गडद पातळ कागदाचं आंतून लावलेलं अस्तर! किती छान! अशीं पाकिटं मी आतांपर्यंत फक्त एकाच व्यक्तीकरितां वापरलीं आहेत. केव्हां आणि कुणाकरतां हें न सांगतांच कळण्यासारखं आहे. लग्नापूर्वी आमचा पत्रव्यवहार जेव्हां सुरू झाला तेव्हां अस्सल जपानांत तयार झालेल्या मिमोसा फॅब्रिक्सचे नोटपेपर्स आणि पाकिटं मीं मुद्दाम विकत घेतलीं. आपल्या ‘जीवींचे भाव’ लिहायचे तर त्याला साहित्यही तसंच शेलकं आणि साजरं नको का? साध्या कोऱ्या कागदावर का कधीं कुणीं प्रेमपत्र

लिहिलीं आहेत? आणि इतक्या साक्षेपानें जीं पत्रं लिहिलीं जातात तीं काय पोस्टांत मिळणाऱ्या लिफाफ्यांतून पाठवायचीं? सरकार तर ह्या पाकिटांकरितां इतका घाणेरडा कागद वापरतं कीं तें आपण वापरावं असं कोणत्याही प्रेमिकाला स्वप्नांत सुद्धा वाटूं नये. कागद घाणेरडा तो घाणेरडा आणि पातळ किती, तर आंतल्या प्रेमपत्रावरच्या घडीवरचं एखाद्‌दुसरं लाडकं विशेषण पोस्टमनला सुद्धा त्यांतून वाचतां यावं! छे, पोस्टांतल्या लिफाफ्यांतून प्रेमपत्र पाठविण्याची कल्पनाच अशक्य. त्याला मिमोसाचींच पाकिटं योग्य! मऊ बिछाना केलेल्या पाळण्यांत आपल्या लाडक्या जीवाला निजवून त्याला मऊ उबदार पांघरुणांनीं लपेटून टाकलं म्हणजे आईला जें समाधान होतं, तेंच मिमोसाच्या पाकिटांतल्या अस्तरांत प्रेमपत्राची घडी अलगद सरकवून दिली म्हणजे प्रेमिकाला होतं!

पण हें जें पाकीट तुम्हांला मीं दाखविलं तें माझ्या पत्नीचंही नाहीं अन् दुसऱ्या कुणा मैत्रिणीचंही नाहीं. तें माझ्या भाच्याचं आहे. नुकताच तो बनारसला कॉलेजांत दाखल झाला आहे. त्याचं दर आठवड्याला अगदीं न चुकतां मला पत्र येतं आणि तें अगदीं अशा रंगदार अन् ढंगदार लिफाफ्यांत! मी त्याचा आवडता मामा असलों तरी प्रियाराधनाकरितां वापरायचीं हीं प्रसाधनं त्यानें मजवर खर्च करूं नये हें खरं. पण ह्याबाबत मी त्याला मुळींच बोलणार नाहीं – नव्हे याची जाणीव सुद्धा देणार नाहीं. उलट त्याच्या ह्या उत्साहाचा संसर्ग मलाच होऊं लागला आहे कीं काय असा संशय येतो! नाहीं तर बाजारांत जाऊन मीं अगदीं शेलके नोटपेपर्स आणि लिफाफे कालच कां खरेदी केले असते? किशोरावस्थेंत (adolescence) पाऊल टाकलेल्या माझ्या भाच्याला कुणावर तरी आपल्या मधुर भावांचं सिंचन करावं, कुणाला तरी आपल्या सौंदर्यासक्तीनें दिपवावं, कुणाला तरी आपण आपल्या अंतरंगांत घ्यावं किंवा कुणी तरी आपल्याला आपल्या अंतरंगांत घ्यावं, असं वाटलं तर त्यांत नवल कसचं? आणि त्यानें ह्या आपल्या नवथर गोड लहरींचा वर्षाव प्रथम आपल्या आवडल्या मामावरच करायचं ठरवावं हें त्या मामाचं भाग्यच नाहीं काय? हे नोटपेपर्स आणि हे गोंडस लिफाफे ह्या त्याच्या नाजूक मनःस्थितीचीच साक्ष देतात. अशा नाजूक स्थितींत त्यानें मला आपला विश्वस्त ठरवून मजवर जी जबाबदारी टाकली

ती मला फारच कुशलतेनें पार पाडली पाहिजे. म्हणून मींही त्याजसारखीं सुंदर पाकिटं आणून त्याच्या मनोवृत्तीची साथ करायचं ठरवलं आहे!

ह्या ठिकाणीं मला माझ्या एका मित्राची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं. गेल्या पांच-सहा वर्षांत आम्ही एकमेकांपासून दुरावलों आहोंत. शरीरानें आणि मनानेंही! पांच-सहा वर्षांपूर्वी असलेला आमचा पत्रव्यवहारही आतां थंडावला आहे. तरीपण तो जेव्हां जेव्हां मला भेटतो तेव्हां हवा-पाण्याच्या गप्पा संपतांच आमच्यांतल्या पूर्वीच्या व्यक्ति जागृत होतात अन् त्या वेळच्या घटनांबद्दल बोलूं लागलों कीं त्या वेळच्या भावना अन् विकार अंतःकरणांत रसरसूं लागतात. अशा वेळीं ज्या एका विषयाशीं तो येऊन थडकायचा तो म्हणजे आमचा पत्रव्यवहार. त्यानें माझीं पत्रं इतक्या जिव्हाळ्यानें जतन करून ठेवलीं आहेत आणि तो तें इतक्या परोपरीनें ऐकवील कीं त्याला सीमाच नाहीं. फारच रंगांत आला तर सांगेल, "तीं तुझीं जाड जाड निळीं पाकिटं! आमच्या घरच्या लोकांना भलताच संशय यायचा. तुझं पत्र आलं कीं दादा अन् आई विचारायचीं, 'कुणाचं आलं रे पत्र?' पण मी कसला वस्ताद. मी दाद लागूं देतों? मी म्हणें, 'आलंय रघुनाथचं.' त्यांना तें खरं वाटायचं नाहीं. पण खरी मौज निराळीच. आमच्या त्या शेजारच्या वत्सलेला — तिला माहीत नव्हतं तीं तुझीं पत्रं असत म्हणून — तुझा अगदीं मत्सर वाटायचा. तिला वाटे, कुणातरी पुण्याच्या मुलीचींच मला पाकिटं येतात!" एवढं सांगून तो हसायचा आणि तो तसा हसला कीं मलाही समाधान व्हायचं. समाधान हें कीं अजूनही याला माझीं तीं निळीं पाकिटं म्हणजे प्रेयसीकडून आलेलीं पाकिटं वाटतात! तसं वाटवून घेण्यांत तो अजून समाधान मानतो! ह्या माझ्या अविवाहित मित्राला माझ्या लिफाफ्यानें अजून हें समाधान मिळावं ही केवढी गमतीची गोष्ट! गॉर्कीच्या एका गोष्टींत एक तरुणी आपल्या प्रियकराला धाडण्यासाठीं म्हणून पत्र लिहवून घेते आणि कांहीं दिवसांनीं त्या पत्राला आपल्या प्रियकरानें जें उत्तर घालावं असं तिला वाटतं तेंही लिहवून घेते! माझ्या मित्राची मनःस्थिति कांहींशी अशीच नाहीं का? मानवी मनाचं केवढं हृदयंगम सत्य भरलं आहे ह्यांत!

मानवी मनाचे गूढ व्यापार कधीं कधीं लिफाफ्यासारख्या छोट्या गोष्टींनींही व्यक्त होतात ते असे!

## हिशेबाचें व्यसन

**गेल्या** तीन-चार महिन्यांत मला ज्या एका गोष्टीमुळें मनांतून आनंद होत आहे आणि जीकरितां मीं ह्या युद्धपरिस्थितीचं मनःपूर्वक अभिनंदन करायचं ठरवलं आहे ती गोष्ट म्हणजे पैन् पैचा हिशेब करण्याची कटकट टळली ही होय ! हिशेब करणं मला कधींच जमत नाहीं, म्हणून तो ठेवण्याचे प्रसंग मी सहसा टाळीत असतों. अगदींच बिनहिशेबी कारभार होऊं नये इतपत हिशेब टाळण्याचं तंत्र मला आतां सरावानें जमलं आहे असं अभिमानानें सांगावंसं वाटतं ! केव्हां हिशेब करण्याचं कारण लागलंच तर तें सोयिस्करपणें मी माझ्या पत्नीवर टोलवतों किंवा कुणी हाताशीं सापडला तर त्याला वेठीला धरतों. हातांत पेन्सिल घेऊन कागदावरच्या रुपये आणे पैंत मी डोकं खुपसून बसलों आहें असं मला आठवत नाहीं. हिशेब ठेवण्याबद्दल एकप्रकारची अढीच माझ्या मनांत आहे कीं काय कुणास ठाऊक ! ती तशी असली तर तिचं अर्धं श्रेय माझ्या वडिलांकडे जातं. कारण त्यांनीं आपल्या उभ्या हयातींत हिशेबाचा कारभार केला नाहीं. धंद्यानें ते इंजिनीअर असल्यानें त्यांनीं हिशेब पाहिले ते ठेकेदारांचे. पण घरचे हिशेब—हिशेबच म्हणायचे तर—संभाळले आमच्या मातोश्रीनें ! आणि म्हणूनच आईकडून मिळालेल्या गुणांत हिशेबीवृत्तीचा वांटा मला मिळाला नाहीं, असं सांगून वाईट वाटून घेण्यापेक्षां, वडिलांची बिनहिशेबीवृत्तीच आपल्या स्वभावांत उतरली, असं पितृभक्तीच्या अभिमानानें सांगणं मला अधिक पसंत पडतं !

पण मला राहून राहून आश्चर्य वाटतं तें माझ्या चुलत्यांचं—सख्या चुलत्यांचं ! एकाच मातापितरांच्या पोटीं जन्म घेऊन माझ्या वडिलांत आणि चुलत्यांत हिशेबीवृत्तीबद्दल इतकं अंतर असावं हें केवढं नवल ! एकानें साऱ्या हयातींत हिशेबाकरितां कागद-पेन्सील कधींही वापरली नाहीं, तर कागद पेन्सिलीनें हिशेब नोंदून ठेवला नाहीं असा एकही दिवस दुसऱ्याचा गेला नाहीं. काकांच्या ज्या कांहीं स्मृति माझ्या मनांत स्थिर झाल्या आहेत त्यांत, रात्रीं झोंपण्यापूर्वी ओंठावर पेन्सिल टेंकून हिशेब जुळवीत बसलेल्या

काकांची स्मृति विशेष स्पष्ट आहे. वडिलांच्या आणि काकांच्या स्वभावांतल्या ह्या दोन ध्रुवांबद्दल मला भयंकर कुतूहल वाटत आलं आहे आणि मानस-शास्त्र व अनुवंशशास्त्र ह्यांच्या साहाय्यानें त्यांचं संशोधन करण्याची उमेद मी नेहमीं मनाशीं बाळगीत आलों आहें.

हिशेब ठेवणं हें हिशेबीवृत्तीच्या माणसाच्या बाबतींत एक व्यसनच असावं असं मला वाटतं. कोणतीही वस्तु खरेदी केली—भाजी घेतली, फुलं-फळं आणलीं, कोठेंही पैसे खर्च केले तरी त्यापासून त्यांना लगेच समाधान होत नसावं. मोतियाचा गजरा घेऊन त्याचा उन्मत्त सुवास लुटला, चार मित्रांच्या संगतींत आईस्क्रीमची लज्जत घेतली किंवा चित्रपट पाहतांना कथानकाच्या रंगतीबरोबर सिगरेट मागून सिगरेटसूची मजा घेतली तरी ह्या गोष्टींच्या उपभोगांतच त्यांना अखेरचं समाधान लाभत नसावं. रात्रीं हिशेब जमवितांना ह्या गोष्टी त्यांत नीट बसल्या आणि हिशेबाचा ताळेबंद एकदम जमला कीं ह्या साऱ्या चैनींतलं अखेरचं समाधान त्यांना होत असावं. रोजचा हिशेब जमल्याशिवाय अशा वृत्तीच्या माणसांना झोप येत नाहीं. किंबहुना हिशेब जमल्यावर ज्या समाधानाच्या भरांत त्यांना झोप लागते तिच्या निर्वेधपणाबद्दलचं वर्णन त्यांच्या तोंडून ऐकण्यासारखं असतं! एक पैचा हिशेब जमविण्याकरितां रात्रीच्या दोन वाजेपर्यंत तळमळणाऱ्या एकनाथांच्या उदाहरणांतलं मर्म नाहींतरी हेंच असावं. हिशेब जमविल्याच्या समाधानाचा अंमल केवढा दांडगा असतो ह्याचं प्रत्यंतर देणारी गोष्ट मला अर्न्स्ट टोलरच्या आत्मचरित्रांत वाचल्याचं आठवतं. जर्मनींत राज्यक्रांति करण्याचा सोशलिस्टांनीं जो प्रयत्न केला त्यांत अर्न्स्ट टोलर व त्याचे साथी ह्यांचं प्रमुख अंग होतं. कांहीं काळ त्यांच्या प्रयत्नाला अमूप यश आलं, पण लवकरच आपल्या प्रतिस्पर्ध्यांपुढें त्यांना हार खावी लागली. ज्या शहरांत सोशलिस्टांनीं ठाणं दिलं होतं त्याला शत्रूचा चौफेर वेढा पडला होता. निसटून जाणं अशक्यप्राय असल्यानें प्राणपणानें लढून ध्येयासाठीं देह ठेवायचा असं त्यांनीं ठरवलं होतं. शत्रु आंत घुसून केव्हां चालून येईल ह्याचा नियम नसल्यानें जो तो प्राणार्पणाला सिद्ध होता. अशा वेळीं अर्न्स्ट टोलर आपल्या पक्षाच्या कचेरींत गेला, तों त्याला आश्चर्यमूढ करणारं दृश्य दिसलं. कीर्दखतावण्यांच्या पसाऱ्यांत बसलेले हिशेबतपासनीस

हिशेबाच्या ब्रह्मानंदीं टाळी लावून बसले होते. त्यांना भानावर आणून टोलरनं विचारलें, " काय मेहेरबान, शत्रु तर उंबऱ्याशीं येऊन ठेपला आहे अन् आपलं हें काय चाललं आहे ? "

त्यांनीं हसत उत्तर दिलं, " हं, मरायचंय् हें ठरलंच, मग हिशेबांत कां चोख असूं नये ? सोशलिस्टांचे हिशेब अगदीं चोख आहेत असं त्यांच्या शत्रूंना देखील वाटलं पाहिजे. तीस मार्क्सचा हिशेब लागत नाहीं तेवढा शत्रु येण्यापूर्वीं लागला तर हिशेब अगदीं शेवटल्या मार्कपर्यंत चोख ठेवल्याचं समाधान मला मरतांना राहील. " हें त्यांचं म्हणणं ऐकून टोलरनें काय उत्तर दिलं तें आतां मला स्मरत नाहीं.

बडोद्यांत काकांकडे माझं जें कांहीं आयुष्य सुखाचं गेलं त्यांत ह्या माझ्या बिनहिशेबीवृत्तीमुळें थोडंसं वैगुण्य उत्पन्न व्हावं हें साहजिकच होतं. मला हिशेबाचा कंटाळा तर काकांची हिशेबी शिस्त ! पण काकांच्या ह्या हिशेबी-वृत्तीपेक्षांही ज्या कांहीं गोष्टी मला अडचणीच्या वाटल्या त्या म्हणजे बडोद्यांतलं दुहेरी चलन ! खुद्द गायकवाडांचं बाबाशाही नाणं आणि इंग्रजसरकारचं कलदार नाणं – हीं दोन्हीही बाजारांत सुरू. कलदार आण्याचे चार तर बाबाशाही पांच असा दुहेरी हिशेब करावा लागे. आणि स्टेशनवर बाबाशाही नाणं बंद ही एक त्यांत मौज. पण एवढा घोटाळा पुरेसा नाहीं हें पाहूनच कीं काय, त्या पैशांचा पयांत आणि पयांचा बदामांत हिशेब ही उतरती भांजणी करावी लागायची ! मी लहान असल्यानें मलाच चिल्लर बाजार करावा लागे अन् कलदार, बाबाशाही, पै अन् बदाम ह्यांच्या कोष्टकांचा सारा घोटाळा त्यांतच असायचा. रोज कांहींना कांहीं आणावं लागायचं आणि रात्रीं त्याचा हिशेब द्यावा लागायचा. काकांचं हिशेबाला बोलावणं आलं कीं माझी नक्की तारांबळ उडायची. मग पै अन् बदामांचा जो घोटाळा व्हायचा तो पुसतां सोय नाहीं.

बडोद्यांतून बाबाशाही नाणं, पै अन् बदाम ह्यांची हकालपट्टी झाल्याचं जेव्हां मला कळलं तेव्हां जितका आनंद मला झाला नसेल तितका आतां ह्या युद्धपरिस्थितीमुळें चलन आटल्याचं ऐकून झाला. पैचा किचकट अन् क्षुद्र हिशेब व्यवहारांतून कधींच बाद झाला होता. त्याबद्दल मी आपल्या मायबाप सरकारला मागेंच धन्यवाद दिले आहेत. पण आतां ह्या चलनाच्या

चणचणीमुळें उत्पन्न झालेल्या आशादायक परिस्थितीबद्दल कुणाला धन्यवाद द्यावेत ह्याच्या मी विचारांत आहें. पैशाचं नाणं दुर्मिळ झाल्यानें हिशेबांत केवढा सरळपणा आला आहे पाहा. तीन पैशांचं कार्ड विकत घेऊन एक पैशाचा मेळ लावीत बसण्यापेक्षां दोन किंवा चार कार्डें घेऊन हिशेबाचा प्रश्नच निकालांत काढणं बरं नव्हे का ? राहतील तीन कार्डें शिल्लक, राहीनात. शिल्लक राहिलेलीं कार्डें पाहून पत्र लिहिण्याची स्फूर्ति झाली तर ती आम्हांला हवीच आहे. कारण त्यानें पत्रव्यवहार वाढून मराठींतलं पत्रवाङ्मय सुधारण्याची बळकट आशा आहे. बरं, एकच कार्ड घेण्याचा अट्टाहास कुणाला करायचा असेल, तर पाव आण्याचं तिकीट वर घेऊन तोही प्रश्न सरळ सुटतो. फुटकळ तिकिटं जवळ राहिल्यानें निरनिराळीं तिकिटं गोळा करण्याचा छंद एखाद्याला जडणार नाहीं हें कशावरून ? मंडईंत अर्ध्या पैशाची कोथिंबीर अन् अर्ध्या पैशाच्या मिरच्या घेऊन मनाचा कद्रूपणा प्रकट करण्यापेक्षां पैशाची कोथिंबीर व पैशाच्या मिरच्या घेऊन उघड उघड हिशेबाबरोबर उदारवृत्तीही उघड केल्यासारखं होणार नाहीं का ? अर्धा आणेवाल्या गिऱ्हाइकाबद्दल मिरच्या-कोथिंबीर विकणारांना नेहमींच आदर वाटतो ही गोष्ट मुद्दाम लक्षांत ठेवण्यासारखी आहे. अडीच आणे शेर बटाटे घेऊन रुपयाची मोड मोजून देण्याघेण्याची भानगड करण्याऐवजीं एक शेर बटाट्याबरोबर चार पैसे शेराचे दीड शेर कांदे घेणं किती शहाणपणाचं ! व्यवहार इतका चतुराईनें केला तर डोक्यांत बटाटे भरल्याची शंका कोणी घेईल असं वाटत नाहीं. पैशाचं चलनच बंद झाल्यानें हे सारे व्यवहार अगदीं सोयीचे झाले आहेत. पण किंमती वाढवितांना हिशेबी मारवाड्यांच्या मेंदूत ही गोष्ट कां शिरू नये ह्याचं मला आश्चर्य वाटतं. किंमती सबंध आणेलींत असाव्यात असं माझं अगदीं प्रामाणिक मत आहे. तेलाचा भाव चढवून साडेपंधरा आणे करण्यापेक्षां तो सरळ सोळा आणे ठेवला तर काय बिघडेल ? अर्धा आणा गिऱ्हाइकालाही आणायला नको अन् व्यापाऱ्यालाही द्यायला नको.

ह्या बाबतींत हॉटेलांत फारच पंचाईत होते ; कारण, चमचमीत पदार्थ खातांना, होणाऱ्या हिशेबाकडे नजर ठेवून खाणं मला तरी जमत नाहीं. ज्यांना जमत असेल त्यांना जमो ! आणि मग ‘ एक इसम सव्वादोन आणे ’

असा जेव्हां आंतून पुकारा होतो, तेव्हां येतो कीं नाहीं पेंच, आतां तीन पैशांचं काय करायचं म्हणून ? सुपारीच्या पुड्या घ्यायच्या का सिगरेट्स घ्यायच्या ? का चाकोलेटच्या वड्या घेऊन मुलांचं समाधान केल्याचं श्रेय घ्यायचं ? काउंटरपुढें उभं राहून ह्या बाबतींत एक निश्चय करणं फारच कठीण जातं. मनांत येतं, सव्वादोन आणे असं आडनीड बिल करण्यापेक्षां तीन आण्यांचं सरळ बिल त्यानें कां आकारलं नाहीं ? कांहीं हॉटेलवाल्यांनीं अलीकडे एक अभिनंदनीय ट्रूस सुरू केली आहे. त्यांनीं पाव आण्याचीं कुपनं काढून गिऱ्हाइकांवर मोठे उपकार करून ठेवले आहेत. उपकारच नाहीं तर काय ? दोन-चार कुपनं फुकट जाऊं नयेत म्हणून पुन्हा एकदा हॉटेलांत चैन करण्याची संधि साधते, ती ह्या नवीन क्लृप्तीमुळेंच कीं नाहीं ? आतां त्या वेळेस आणखी कांहीं पैसे खर्च होतात अन् पुनः एखादं कुपन गळ्यांत येतं हें जरी खरं असलं, तरी त्यांत वाईट वाटण्यासारखं कांहीं नाहीं. कारण तें कुपन म्हणजे पुनः एकदा हॉटेलांत चैन करण्याची संधि !

युद्धजन्य परिस्थितीनें व्यवहारांत जो हा सरळपणा आला आहे त्याबद्दल आम्हां गिऱ्हाइकांना पूर्ण समाधान वाटत आहे. पैशाचीं नाणीं अजिबात दुर्मिळ झाल्यानें आणि अर्ध्या आण्याचीं अगदींच थोडकीं असल्यानें आमच्यावर केवढेतरी उपकार झाले आहेत. सतरा पाव आणि तेरा पावणं अशा अडाणी हिशेबानें मेंदूला होणारा केवढातरी त्रास वांचला, असं म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. पावकी अन् पाउणकी हिशेबांतून कायमचीं गेलीं तर एक मोठी ब्याद गेली असं मजप्रमाणें अनेकांना खचित वाटेल. आणि वाण्याच्या वहींतल्या हिशेबांत आळ्यापुढच्या आडव्या आणि उभ्या रेघांचा घोटाळा पाहतांना हा आपल्याला फसवीत तर नाहीं ना असा जो न्यून-गंड उत्पन्न होई तोही मग होणार नाहीं.

पण ह्या सुखसोयींनीं आमच्या व्यापारी बांधवांचं समाधान झालेलं दिसत नाहीं ; आणि तें होऊं नये हेंच साहजिक ! सारे हिशेब इतके सुतासारखे सरळ आले तर त्यांच्या व्यापारीवृत्तीचं कसं व्हायचं ! आळ्यापुढच्या उभ्या-आडव्या रेघा लुप्त झाल्या तर त्यांच्या कीर्द-खतावण्या किती आळणी दिसूं लागतील आणि हिशेबांतलीं हीं मर्मस्थळं वगळलीं तर हिशेबांत राह्यलं काय अन् असल्या बेचव हिशेबांनीं आमच्या व्यापारी बांधवांच्या हिशेबीवृत्तीची

तलफ भागायची कशी ? आणि तशी ती भागत नाहीं म्हणूनच तर तलफ न भागल्यामुळें चिडखोर बनलेल्या व्यसनी माणसाप्रमाणें त्यांची आज स्थिति झाली आहे. चिडखोरपणाचा हा आपला राग ते गिऱ्हाइकावर काढीत आहेत. पाव आण्याचा अर्धा करून किंवा पाऊण आण्याचा एक करून हिशेब सरळ केल्याचा आनंद मानायचं सोडून 'मोड असल्यास आंत यावं', 'मोड नसल्यास मॅनेजरला भेटावं', 'सुटे पैसे असल्यास माल मिळेल' असला तिरसटपणा ते उगीचच करीत आहेत. त्यांच्या ह्या तिरसटपणालाच उर्मटपणा समजण्याचं पाप गिऱ्हाइकाकडून होण्याचा संभव आहे; पण त्यांनीं त्या बाबतींत दक्ष असावं असं मला त्यांना विनम्रपणं सांगायचं आहे. आणि वरून दिसणारा हा उर्मटपणा जरी आपल्या व्यापारी बांधवांच्या हातून होत असला तरी त्याचं खरं कारण लक्षांत घेऊन आपण त्यांजबद्दलचा आपला मित्रभाव रतीभरही कमी होऊं देतां कामां नये !

जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाहीं असं म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं. नाहींतर चिल्लर नाण्यांची ब्याद गेली म्हणून आनंदोत्सव करण्याऐवजीं सुतकी चेहेरे करून आमचे हे बांधव निराळ्याच उद्योगाला लागलेले दिसतात. वर्तमानपत्रांत आम्ही वाचतों, 'अमक्या हॉटेलमालकानें इतकी चिल्लर दडवून ठेवली.' 'तमक्या मारवाड्यानें दोन हजारांचीं नाणीं पसार केलीं' वगैरे. ह्यावरून आमचे हे व्यापारीबंधु स्वार्थी, लोभी, समाजहितविरोधी असावेत असा ग्रह होण्याचा संभव आहे. पण मला एवढंच सांगायचं आहे कीं ह्या उदाहरणांवरून असे निष्कर्ष काढण्याचा मोह होत असला तरी होऊं देतां कामा नये. हिशेबीवृत्तीची तलफ भागत नाहीं म्हणून चिडखोर बनलेल्यांचे हे वेडसर चाळे आहेत हें लक्षांत घ्यावं अन् त्यांच्या ह्या मनःस्थितीबद्दल सहानुभूति बाळगावी !

पण ह्या मोड दाबून ठेवण्याच्या वृत्तीनें कोणता अनर्थ ओढवून आणला आहे ह्याची कल्पना मला परवांपर्यंत नव्हती. मी आनंदांत होतों कीं आतां नाण्यांच्या टंचाईमुळें हिशेबाची कटकट आयतीच टळली म्हणून. पण इतकं कुठलं आमचं सुदैव बलवत्तर असायला ! वर्तमानपत्रांतून बातम्या येऊं लागल्या कीं सरकार नवीं नाणीं काढणार म्हणून. त्यांच्या जन्माचीं भविष्यं येऊं लागलीं अन् बातमीदार नाण्यांचीं वर्णनंही देऊं लागले.

मजल इथपर्यंत आल्यावर माझ्या बिनहिशेबीवृत्तीचं समाधान डळमळूं लागावं ह्यांत नवल कसचं! वर्तमानपत्र हातांत घेतलं कीं माझं मन बेचैन होई. कारण कुठें ना कुठें नव्या नाण्यांबद्दल मजकूर असायचाच. पुन्हा एकदा पूर्वीचा भोग कपाळीं येणार म्हणून जिवाला खंत लागून राहिली. पण जेव्हां तें नवं बाळ माझ्या हातांत आलं तेव्हां त्याच्या करंटपणाबद्दल माझी पुरेपूर खात्री पटली अन् ह्याची कारकीर्द औट घटकेची होणार ह्याबद्दल मला शंका उरली नाहीं. त्याचं फुटकं कपाळ, तोळा-मासा प्रकृति अन् अक्करमासं स्वरूप पाहून कोणालाही तसंच वाटलं असावं! नाहींतर नाणं होण्याचं नशीब लाभलं असतां वॉशर होण्याचा दुर्भोग त्याच्या कपाळीं आला नसता!

अखेर माझी भीति निराधार करून सरळ व्यवहाराचं रामराज्य फिरून सुरू केल्याबद्दल युद्धपरिस्थितीला पुन्हा एकदा धन्यवाद देतों!

# चक्रवर्ति आणि रस्ते

**पुणें** शहराबद्दल मला नेहमींच जें आकर्षण वाटत आलं आहे, तें अलीकडे भूमितिश्रेणीनं वाढूं लागलं आहे, ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. एक तर गेल्या कांहीं वर्षांत पुण्यापासून मी दूर दूर सरकूं लागलों आहें, आणि त्यांतच मी जेव्हां जेव्हां पुण्याला पाहुणा म्हणून जातों तेव्हां तेव्हां पुण्यांत झालेला बदल माझ्या दृष्टीस पडतो आणि तें मला अधिकच प्रिय होतं. पुण्यांत पूर्वी महिना न् महिना गर्जत राहाणारा शिमगा आतां तेथल्या साहित्यांतच स्मृतिरूपानं उरला आहे; पावसाळ्यांत रस्तोरस्तीं सांचणारा चिखल आतां तेथील नगरपालिकेंतच उडून राहिला आहे; तेथील रस्त्याचा खडतरपणा आणि वाकडेपणा ह्यांचा आतां 'अनुरागपंथांतच' अवशेष राहिला आहे. हे सर्व बदल घडून आल्याबद्दल पुणेंकरांना धन्यता वाटते कीं नाहीं हें मला ठाऊक नाहीं, पण पुण्याबद्दल प्रेम बाळगणाऱ्या आम्हांसारख्या त्रयस्थांना ती वाटते ही गोष्ट मुद्दाम नमूद करून ठेवतों.

पुण्यांतील रस्तेही आतां पूर्वीसारखे अवखळ आणि खेडवळ वाटत नाहींत. कांहींशा नीटस झालेल्या ह्या रस्त्यांवर बसलेलीं दुकानंही आतां नीट लावल्यासारखीं दिसतात. मुंबईहून पुण्यास आलेल्या इसमास पूर्वी चक्रावून गेल्यासारखं वाटे. मुंबइचे भव्य आणि कोनशुद्ध आखलेले रस्ते आणि त्यांवर विशिष्ट योजनेनुसार गौरीसारखीं आरासलेलीं दुकानं, हीं पाहाण्याची संवय ज्यांच्या डोळ्यांना झाली आहे त्यांना पुण्याचा तो पेशवाई कारभार पाहून कसंसंच वाटलं तर नवल नाहीं. 'रस्किन पुण्यांत आला असता तर त्यानं येथील शिल्पशास्त्राचा खून पाहून आत्महत्या केली असती' असं माझा एक मित्र गंमतीनं म्हणत असे. पण ही वस्तुस्थिति आतां पुष्कळच पालटली आहे आणि पुण्यांतील रस्त्यांनीं हिंडतांना आतां मुंबईकरांना देखील कसंसंच होत नाहीं. झालं तरी तें दुसरं कशानं तरी होत असतं. मला तरी निदान पुण्यांतल्या रस्त्यानं हिंडतांना आनंद वाटतो.

पुण्याच्या नगरपालिकेनं जेव्हां तेथले रस्ते डांबरी केले तेव्हां पुण्याच्या लोकांनीं आपल्या या मायसंस्थेला धन्यवाद दिले कीं नाहीं कुणास ठाऊक. ते द्यावयास हवे होते ही गोष्ट निर्विवाद. कारण पुण्यांतील पुष्कळसे लोक

'चक्रवर्ती' आहेत; आणि सायकलस्वारांचा आणि रस्त्यांचा जेवढा जिव्हाळ्याचा संबंध आहे तेवढा इतरांचा नाहीं. रस्त्यांचा उंचसखलपणा, खडतरपणा किंवा वाकणंवळणं ह्यांचा ताप पथिकाला कधीं होत नाहीं. किंबहुना रस्ता खडबडीत आहे कीं गुळगुळीत आहे, उंच आहे कीं सखल आहे, त्याचीं वळणं आड आहेत कीं सरळ आहेत ह्याची त्या बिचाऱ्याला दादही नसते. 'रस्ता उखडला आहे तो दुरुस्त करा.' अशी तक्रार नगरपालिकेकडे करणाऱ्यांत पथिक क्वचितच असतात. 'सर्व रस्ते रोमला जातात' ह्या म्हणींतलं तत्त्वज्ञान त्यांच्या पूर्ण पचनीं पडलेलं असतं.

सायकलस्वारांची गोष्ट ह्याहून अगदीं वेगळी असते. त्यांचं लक्ष आपल्या प्रस्थानाकडे जितकं लागून राहिलेलं असतं तितकंच, किंवा त्याहूनही अधिक तें जो रस्ता त्याला तिकडे नेत असतो त्याकडे लागून राहिलेलं असतं. 'सारे रस्ते रोमला जाऊन भिडतात' म्हणून ते सारखेच असा गबाळ-ग्रंथी समज तो कधींच करून घेत नाहीं. ह्या बाबतींत तो पथिकाप्रमाणं बावळट ध्येयदर्शी नसतो तर हुशार वास्तववादी असतो. नव्हे, तसं त्याला रस्त्यानं बनवलेलं असतं. कोठल्याही शहरांतील रस्त्यांची पाहाणी करावयाची झाल्यास तेथल्या सायकलस्वारांची जबानी घेतली कीं पुरे. त्यांनीं केलेलं वर्णन अगदीं अधिकृत मानावयास हरकत नाहीं, कारण सायकलस्वारांचा रस्त्यांशीं जो संबंध येतो तो इतका जिव्हाळ्याचा असतो, कीं त्याला कोठलीही उपमा पुरी पडणार नाहीं. रस्त्याचं खरंखरं सुखदुःख कळतं तें सायकलस्वारालाच! रस्ता जीर्ण होऊन त्यावर ठिकठिकाणीं व्रण उठले असले तर त्याचं दुःख सायकलस्वाराइतकं दुसरं कुणाला होणार नाहीं. रस्ता जर लहरी माणसासारखा चढेल आणि उतरेल असेल तर त्याजपुढं सायकलस्वाराइतकी कुणालाही दमछाट करावी लागणार नाहीं. बरं, रस्ता जर एखाद्या खेडवळ माणसाप्रमाणं आडवळणी असेल तर त्याच्या संगतीनं सायकलस्वाराचं थोबाड केव्हां फुटेल ह्याचा नेम नाहीं! मागं कॉलेजांत असतांना सायकलवर बसण्यामुळं मूळव्याध उपटते कीं काय अशी जी धास्ती मला वाटे ती त्यावेळच्या पुणेरी रस्त्यांमुळंच!

पण रस्त्यांच्या ह्या दुःखांबरोबरच त्यांचं सुखही सायकलस्वारांच्या वांट्याला येतं हेंही कांहीं थोडं नाहीं. पक्क्या डांबरी रस्त्यावरून सायकल

मारण्यांत जी मौज आहे ती कांहीं औरच. रस्ता सरळ अन् गुळगुळीत असावा, मग त्यावरून सायकल भरधाव काढतांना वाटतं, 'विहारनौकेंतून' प्रवाहाच्या ओघांत आपण तरंगत पुढं जात आहोंत किंवा वाऱ्याच्या झोताबरोबर चढणाऱ्या पतंगाबरोबर वरवर चढत आहोंत! रस्त्याच्या टणक-गुळगुळीतपणाचा, स्प्रिंगनं हेलकावणाऱ्या सीटवर जो सुखकर अनुभव येतो तो भरदार मऊ गाद्यांनीं बिछायलेल्या पलंगावर निजल्यावरच कळण्यासारखा आहे.

डांबरी रस्त्यावरून सायकल मारण्याचं सुख घ्यायचं असेल तर तें मुंबापुरींत जितकं मिळेल तितकं पुण्यांत मिळणार नाहीं, असं कुणीं म्हटलं तर त्याला गप्प करणं कठीण जाईल. मुंबईंतले समुद्रासारखे पसरलेले सरळ रुंद ॲसूफाल्टचे रस्ते पाहिले म्हणजे असं म्हणण्याचा मोह व्हावा ह्यांत नवल नाहीं. मुंबईच्या त्या भव्य आणि मातबर रस्त्यांचं वैभव पाहिलं म्हणजे मन दिपून जातं. त्यांचा तुकतुकीत काळेपणा इतका घोटीव असतो, कीं त्यांवरून लीलेनं सरकणाऱ्या रंगदार मोटारींचीं प्रतिबिंबं त्यांत दिसावींत. मला तर मुंबापुरीच्या इतर वैभवापेक्षां तिचं हें राजरस्त्यांचं ऐश्वर्यच अधिक लोभनीय वाटतं. पण म्हणून ह्या रस्त्यावरून सायकल मारण्याचा मोह होईल म्हणतां काय? छे. तो आतांपर्यंत कधींही झाला नाहीं आणि पुढंही होणार नाहीं. मलाच काय, तो इतर कोणालाही सहसा होईल असं वाटत नाहीं. माझं म्हणणं मुंबईच्या सायकलस्वारांना लागू नाहीं. कारण पुण्यांत दिसणारी सायकलस्वारांची जात अजून मुंबईंत निर्माण झाली नाहीं. आणि ती पुढं कधीं होईल ह्याची आशा नाहीं. पुण्यांतल्या लोकांना सायकलींचं एक व्यसनच जडलं आहे. आणि तें इतकं, कीं पुढील पांच-पंचवीस वर्षांत जन्माला येणाऱ्या पिढीला जन्मतांच सायकलिंग येऊं लागेल कीं काय असा अंदाज कोणीं केल्यास ती अतिशयोक्ति वाटण्याचं कारण नाहीं. मुंबईचे बिचारे सायकलस्वार आपद्धर्म म्हणून सायकल वापरीत असतात. ज्या ठिकाणीं ट्रॅम, बस किंवा लोकल पोचूं शकत नाहीं आणि जिथं पायानंही जाणं अशक्य आहे अशा ठिकाणीं जाण्यास सायकलीशिवाय गत्यंतरच उरत नाहीं; आणि गत्यंतर नाहीं म्हणूनच ते तिची आराधना करतात आणि तिच्या ताबेदारींत वागतात. पण त्यांना केवळ सायकल-

च्याच ताबेदारींत वागून चालत नाहीं, तर रस्त्याच्याही ताबेदारींत राहावं लागतं. एक वेळ सायकलीची ताबेदारी पुरवली, पण रस्त्याची नको. तेथल्या रस्त्यांची जरब इतकी विलक्षण आहे, कीं सायकलवर टांग मारणं म्हणजे मानेवर तरवार टांगून सर्कस करण्यापैकीं प्रकार. आपण सायकलवर टांग मारण्याऐवजीं सायकलच केव्हां आपल्याला टांग मारील, आणि सायकलनं रस्ता काटण्याऐवजीं रस्ताच केव्हां आपणाला काटील ह्याची धास्ती प्रत्येक सायकलस्वाराला मनांतून वाटत असते. साहजिकच आहे. ज्या रस्त्यानं ट्रॅम, बसेस्, लॉरीज्, टॅक्सीज् आणि व्हॅन्स् ह्यांचा तुफान प्रवाह सुरू असतो तेथें सायकलसारख्या नाजूक आणि चंचल वाहनाला सुरक्षितपणं वाव मिळावा हें कठीणच. एक तसूभर बाजू चुकली किंवा रतिभरही गाफीलपाणा झाला कीं काय, ‘ अगदीं जमीन अस्मानचा फरक ! ’

पुण्याची गोष्ट ह्याहून अगदीं वेगळी. तिथल्या रस्त्यांत सायकलस्वार हिंडतात ते मुलं अंगणांत खेळावीं तसे निर्धास्तपणं. पुण्याच्या रस्त्यावरून सायकलवरून जायचं म्हणजे आईच्या मांडीवर लोळायचं. तिथंही रस्त्यानं इतर वाहनं धावतात, पण आदबीनं — सायकलच्या आदबीनं. जणूं कांहीं रस्त्यावर मालकी त्यांची; आणि त्यांच्या परवानगीनं इतरांना रहदारीची मुभा. तिथले रस्तेही मुंबईच्या रस्त्यांसारखे आपल्या वैभवाच्या मदानं अंध झालेले नाहींत. श्रीमंत मोटारींची धुंदी मुंबईच्या रस्त्यांवर नेहमींच चढलेली असते. त्यांना सायकलसारख्या क्षुद्र वाहनांनीं आपल्याशीं लगट करावी ह्याचा तीव्र संताप वाटत असतो. संधि सांपडतांच ते तिच्यासकट तिच्या सहचराला अपघाताची भयंकर शिक्षा करीत असतात तें उगीच नाहीं ! पुण्यांतही अपघात होतात; पण तेथल्या अपघातांत विघ्नापेक्षां विनोदच जास्त होतो.

पुण्यांतल्या चौकांतून हिंडतांना गर्दी झालेली दिसली, कीं कांहींतरी अपघात झाला आहे असं हमखास समजावं; आणि ह्या अपघातांत सायकलवाला हा एक पक्षकार नेहमींच असावयाचा. हा अपघात झालेला पाहून तो दृष्टीस पडण्याच्या भीतीनं परस्पर निघून जायचं कारण नाहीं. तिथं अपघाताचं भयंकर दृश्य दिसण्याऐवजीं विनोदाचा एक खुमासदार मासलाच दृष्टीस पडतो. तिथं जमलेल्या गर्दीत घुसतांच टांगेवाल्याशीं सायकलवाल्याचा

सुरू असलेला हमरीतुमरीचा प्रवेश पाहावयास मिळावयाचा. पुण्यांतले टांगेवाले आणि सायकलवाले दोघेही प्रसिद्ध आणि इरसाल. पुणेरी टांगेवाल्याप्रमाणं पुणेरी सायकलवाला हाही आतां इतिहासप्रसिद्ध पुरुष ठरूं पाहात आहे. दोघेही एकमेकांला ओळखत असतात आणि ओळखून असतात. निमित्तापुरता झालेला हा अपघात त्यांच्या ह्या प्रसंगाला पुरेसा असतो. ह्या दोन वाचिवीरांची लढत जुंपली म्हणजे जो कांहीं विनोद पिकतो त्याची कल्पनाच केलेली बरी. फाटलेलं धोतर एका हातानं सावरीत आणि मोडलेलं मडगार्ड दुसऱ्या हातानं परजीत सायकलस्वार टांगेवाल्यावर अस्सल पुणेरी शिव्यांची फैर झाडीत असतो, तर आपली गळणारी खाकी विजार सावरीत पुणेरी टांगेवाला आपल्या घोड्याची शेपटी दुखावली म्हणून सायकलस्वारावर तुटून पडत असतो. अशीं आणि अशासारखीं इतर कांहीं विनोदी स्थळं प्रत्येक पुणेकराच्या फेरफटक्यांत दररोज येत असतात. कुठं भाजीवालीला धक्का देऊन तिची सांडलेली भाजी तिच्या शिव्यांसह वेचीत असलेला सायकलस्वार दृष्टीस पडतो, कुठं वळणावर आपल्याच भाईच्या गळ्यांत मिठी मारून फिरून निर्लज्जपणं हसत जाण्याच्या तयारींत असलेला सायकलस्वार दिसतो. गल्लींतून जातांना सायकलवाल्याशीं एकदा तरी आट्यापाट्या खेळण्याचा प्रसंग आला नाहीं असं क्वचितच घडतं. एकदा तर भर चौकांत उभ्या असलेल्या पोलीसासच समोरून भरधाव येणारा सायकलस्वार धक्का मारून गेला आणि तो इतक्या सफाइनं, कीं पोलीसाच्या हातांतील छत्री सायकलस्वाराच्या हातांत. केवढा विनोद-प्रसंग! पोलीस देखील प्रथम हसला व मग रागावला. आणि रागावला तो रागवायला पाहिजे म्हणून. फार काय, अत्र्यांच्या "प्रेमाचं अद्वैत" ह्या कवितेंत एकाच सायकलवरून जाणारीं तरुण-तरुणी "आम्ही वरून दोन दिसत असलों तरी प्रेमामुळं एकच आहोंत," आणि "सायकलला दिवा नसला तरी आमच्या अंतःकरणांत प्रीतीचा दीप तेवत आहे" अशी पोलिसाला दमबाजी करून जो विनोद पिकवितात तो तरी पुण्यांतील रस्त्यावरचा! पुणें आणि पुण्यांतील रस्ते ह्यांच्याविषयीं उगीच नाहीं मला आकर्षण वाटत!

# माझा प्रेमळ मित्र !

**पुण्यांत** राहाणाऱ्या कोठल्याही भाडेकऱ्याला, आपण जागेचं भाडं भरतों म्हणून तिचे मालक आहोंत असं म्हणतां यावयाचं नाहीं. भाडेकऱ्यालाच काय, मालकाला सुद्धा आपल्या जागेवर आपली एकमेव मालकी आहे असं सांगतां येणं कठीण ! मालकाच्या काय, कीं बिऱ्हाडकराच्या काय, जागेंत जागेचा खराखुरा उपभोग घेणारे निराळेच असतात. खोलींतलं कुठलंही कपाट उघडून पाहा, दाराच्या फटींकडे अथवा भिंतींच्या वळचणींकडे नजर टाका, माळयावर न्याहाळून पाहा किंवा अडगळीच्या खोलींत निरखून पाहा, तुमच्या सूक्ष्म नजरेला तेथें जे जे गृहस्थ वसाहत करून राहिलेले आढळतील तेच घराचे खरे मालक ! भाडेकरी बिचारा आज इथं तर उद्यां तिथं; मालकाचं सुद्धा असंच ! पिढ्यान्‌पिढ्या घराची मालकी उपभोगणारे किती ? फारच थोडे. पुण्यांत तर अगदीं बोटावर मोजण्याइतके ! पण ज्या घरांत ते राहात असतात आणि ज्याची मालकी आपणांकडे आहे असं समजत असतात त्यांत खऱ्या अर्थानं राहाणारे अन् त्याचा मनाप्रमाणं उपभोग घेणारे जे असतात त्यांच्या किती पिढ्या त्या घरांत झाल्या असतील हें सांगणं पट्टीच्या इतिहाससंशोधकाच्याही आवांक्याबाहेरचं आहे. भाडेकरी आले अन् गेले, जुना मालक जाऊन नवा आला तरी ह्यांची वस्ती कायमच ! 'लोक येवोत आणि जावोत मी मात्र कायम वाहात आहें', असं म्हणणाऱ्या जलवाहिनी-प्रमाणं ही मंडळी ये-जा करणाऱ्या भाडेकऱ्यांना आणि मालकांना म्हणत असली तर नवल कसलं ? आणि त्यांना तसं म्हणायचा खासच हक्क पोचतो. कारण कैक पिढ्यांचे रहिवासी असणाऱ्या ह्या मंडळींना वहिवाटीच्या हक्काप्रमाणं त्या घराची मालकी केव्हांच मिळालेली असते. 'चंदनवाडीं'तल्या अभिमन्यु-प्रमाणं त्यांना 'अग्रजन्माचा हक्क सांगण्याचीही जरूर नाहीं. वास्तविक ह्या लोकांचा हा हक्क मान्य करून त्यांच्याशीं गोडीगुलाबीनं वागलं तर नाहीं चालणार ? पण मालकीहक्काच्या ह्या भलत्या भावनेनं पछाडलेल्या आम्हांला त्यांचा सुहृद्भाव संपादन करतां आला नाहीं तर नवल नाहीं. उलट त्यांचं हाडवैरच आम्हीं पैदा केलं आहे आणि त्यांचीं फळं आतां भोगतों आहोंत !

पुण्यांतल्या जुन्या पेठांत राहायचं म्हणजे खऱ्या मालकाशीं अन् लटक्या मालकाशीं अविरत संग्राम करीतच भाडेकऱ्याला राहावं लागतं! भाड्याचा मलिदा वेळेवर चारला, कीं मालकाला गप्प करणं कठीण नाहीं; वेळीं अवेळीं उसन्याला येणाऱ्या मालकिणीला तें तत्परतेनं दिलं अन् त्याची आठवण दाखविली नाहीं म्हणजे तिची भुणभुण बंद; खाण्याच्या वेळीं अचूक दत्त होणाऱ्या मालकाच्या मुलांना हातावर भरपूर खाऊ ठेवला, कीं त्यांचाही अवखळपणा गोड होतो. पण विश्रांतीच्या वेळीं आपल्या चटकदार गुणगुणीनं कपाळ उठविणाऱ्यांना, किंवा ऐन झोपेच्या सुखांत आपल्या अस्तित्वाची कडकडीत साक्ष देणारांना अथवा घडांत छिद्रं पाडून त्याचं निःशंक विधड बनविणारांना कसं गप्प करावं हा एक मोठाच प्रश्न असतो! ह्यावर उपाय नाहींत असं नाहीं. सांपळे, मच्छरदाण्या, ढेकण्या, कॅटोल पॉवडर, पॉयझा अशीं कितीतरी साधनं आहेत. आणि जो तो ह्या साधनांनीं ह्या लोकांशीं मुकाबला करण्याची कोशीस करीत असतो. पण ही मंडळी कांहीं कमी नाहींत. तीं ह्या साऱ्यांना पुरून उरलीं आहेत अन् ह्यापुढं तीं कोठल्याही उपायांना पुरून उरतील ह्याबद्दल शंका बाळगण्याचं कारण नाहीं.

ह्या सर्व मंडळींबद्दल माझ्या मनांत निरनिराळ्या प्रकाराचा जिव्हाळा वसत आहे. डांसाबद्दलच घ्या, त्या इवल्याशा प्राण्याबद्दल मला केवढं कौतुक वाटतं! बेट्याचें शरीर किती नाजूक! पाय म्हणजे कोळ्याच्या जाळ्याचे धागेच. अन् त्यांत कुठंतरी शरीराचा मुगायवेढा ठिपका. त्यावर डोळे केवढे असतील अन् त्यांनीं त्याला ह्या जगाचं किती ज्ञान होत असेल तें असो! त्याची सोंड म्हणजे तर त्याच्या कर्तबगारीचं सर्वस्व. ती किती नाजूक अन् किती टोकदार. पण ह्या चिमुकल्या प्राण्याचा स्वभावही फारच मजेदार. अगोदर आपली गुणगुण ऐकवणार; ती ऐकून तिचं स्वागत केलं तर ठीक, नाहीं तर स्वारी चिडणार — माझी गुणगुण ऐकत नाहीं म्हणजे काय! कोण निगर्गट्टपणा हा! ऐकत नाहीं तर ऐकवलीच पाहिजे ह्याला, म्हणून सोंडेनं दंश करून त्याला जागविणार आणि गुणगुण करणारे आपणहीं कुणी आहोंत ह्याची साक्ष पटविणार. केवढा अहंकार! सूरत केवढी आणि अहंगंड केवढा! गंमत अन् कौतुक वाटूं नये अशा प्राण्याबद्दल तर काय वाटावं?

पण ढेकणाचं सारंच निराळं बरं का! त्याच्या स्वभावांत गंमत नाहींच. भयंकरपणा — अगदीं अस्सल मुसलमानाचा कडवेपणा. तो तुमच्यावर एकदा तुटून पडला, कीं तुमच्या देहाची अगदीं चाळण करून टाकील. अनेकांची गोष्ट कशाला, एकट्याच ढेकणानं तुमच्यावर सूड उगवायचं ठरवलं तर तो तुम्हांला कसकसं बनवील ह्याची कल्पना देतों. समजा, तुम्हांला एका स्त्रियांच्या सभेला अध्यक्ष म्हणून जायचं आहे. तुम्ही अगदीं नीटनेटकेपणानं तिथं गेलांत. सभा चालू झाली अन् मग तुमच्या लक्षांत आलं, कीं ढेकणाचे एक चिरंजीव विजारींत पराक्रम करीत आहेत म्हणून. काय परिस्थिति होईल तुमची?

ढेकणांशीं माझे अनेक संग्राम झाले आहेत. ढेकणांशीं एकहाती झुंझ करीत मी कैक रात्री जागविल्या आहेत. त्यांची स्वप्नांत सुद्धा आठवण झाली म्हणजे मी अजून बावचळून उठतों. आणि दिवा लावून भ्रमिष्टासारखा वावरूं लागतों. पण ढेकणांच्या ह्या भयंकरपणांतही एक नाजूक भाग आहेच. हॅम्लेटच्या वेडांतही शिस्त होती म्हणतात, तद्वतच ढेकणांच्या कडवेपणांतही एक गोडवा आहे. ढेकूण 'यागो' प्रमाणं स्वभावानं अगदींच दुष्ट नसावा असं मला वाटतं तें उगीच नाहीं. मी अनुभवानं सांगतों, कीं ढेकूण माणूसघाण्या तर नाहींच; उलट त्याला माणसाबद्दल किती प्रेम वाटतं पाहा. माणसं घरांतून पळावींत असं त्याला कधींच वाटत नाहीं. पोराबाळांचं नांदतं घर असलं म्हणजे ढेकणाला आनंद असतो. माणसं जोंपर्यंत घरांत आहेत तोंपर्यंत तो सुखांत आणि समाधानांत असणार! पण त्यांचा सहवास अंतरला, कीं त्याचं दुःख त्यालाच माहीत. दोन महिने तुम्ही घर सोडून गेलां असलां तर घरीं परतल्यावर तुम्हांला दिसेल, कीं हे तुमचे सारे बांधव तुमच्या विरहानं अगदीं शरपंजरीं पडले आहेत. प्रत्येकाचा अगदीं मज्नून झाला आहे. पण तुमची—तुम्ही आल्याची चाहूल त्यांना लागली, कीं त्यांच्या हर्षाला पारावार नाहीं. मग रात्रीं तुमच्या भेटीला ते इतक्या आवेगानं धावतील आणि तुम्हांला इतके कडकडून भेटतील कीं पुसतां सोय नाहीं.

पण खराखुरा सुहृद्भाव जर मला कुणाबद्दल वाटत असेल तर तो उंदराबद्दल! डांसाच्या अहंभावाचा किंवा ढेकणाच्या कडवेपणाचा लेशही त्याच्या स्वभावांत आढळणार नाहीं. डांस किंवा ढेकूण ह्यांच्याशीं मैत्री

करणंच शक्य नाहीं, पण उंदराशीं ती अगदीं शक्य आहे. उंदराचा स्वभाव किती उमदा. अगदीं निष्पाप अन् सरळ. गमत्या तरी किती ! त्याचे ते इवलेसे टिकल्यांसारखे मिस्किल डोळे आणि छोटे तरतरीत कान ह्यांवरूनच माझं म्हणणं तुम्हांला पटेल.

त्याचा हा गमत्या स्वभाव ओळखूनच कीं काय, देवांनीं त्याची अन् गजाननाची गाठ घालून दिली. प्रत्येक मित्रांत ज्याप्रमाणें चेष्टेचा विषय होणारा एकादा असतो तसेच देवांच्या कंपूंत गजराज असावेत असं वाटतं. त्यांचं शरीर, त्यांची सोंड, त्यांचं दोंदील अन् ह्या सर्वांवर ताण करणारा त्यांचा रागीट अन् तिरसट स्वभाव हीं सर्व दुसऱ्यांच्या चेष्टेचे विषय न झाले तरच नवल ! पण ही गंमत अखंडपणं घेतां यावी म्हणूनच देवांनीं गजाननाच्या देहाशीं अन् स्वभावाशीं पूर्णपणं विसदृश असणाऱ्या उंदराशीं त्यांची गांठ घालून दिली अन् उंदिरमामानंही देवांचा हा हेतु ओळखूनच अगदीं पहिल्याच वाढदिवशीं गजाननरावांची अगदीं भर चव्हाट्यावर गंमत केली. गजाननराव उंदरावरून कोलमडले अन् तें विनोदी दृश्य पाहून भाबडा चंद्र भान न राहून खो खो हसला. त्याचं प्रायश्चित्त त्याला भोगावं लागलंच.

उंदराच्या ह्या गमत्या स्वभावाचा अनुभव मला खूप आला आहे. मागं कॉलेजचं शिक्षण घेत असतां आमचं बिऱ्हाड पुण्यांतल्या एका प्रसिद्ध गल्लींतल्या जुन्या वाड्यांत होतं. पुणं, गल्ली अन् जुना वाडा येवढ्या तीन गोष्टी जमल्या म्हणजे मग अधिक सांगण्याची गरज नाहीं. माझ्या खोलींतल्या इतर रहिवाश्यांशीं माझे संग्राम होत, तरी आमचा एकमेकांशीं सलगीनं वागण्याचा प्रयत्न चालूच असे. पण माझ्याशीं खरी सलगी जर कुणीं केली असेल तर ती एका उंदराच्या कार्ट्यानं ! माझ्या मोठ्या टेबलाखालच्या त्या इवल्या बिळांतून वारंवार डोकावणाऱ्या त्या पिटुकल्याबद्दल मला जें आकर्षण वाटे, तें औरच ! मी टेबलाशीं वाचीत किंवा लिहीत बसलों असलों, कीं तें कार्टे खुशाल धिटाईनं माझ्या पायांवरून उड्या मारून सर्कस करी. आराम खुर्चीत वाचीत पडलों असलों तर खुशाल तेथवर येऊन दोन पायांवर उभं राहून मजकडे टक लावी. किती गमतीदार वाटे त्याची ती लकब ! आणि डोळ्यांत मिष्किलपणा तरी किती ! निर्भयपणानं बाहेर येऊन तें असे चाळे करूं लागलं, कीं माझं वाचनांतलं लक्ष

उडे अन् त्याचे ते गोड पोरखेळ मी पाहात राहीं. केवढं कौतुक वाटे मला त्याचं! हळूहळू त्याची माझी गट्टी झाली. इतकीं कीं, तें मला मुळींच भिईना. नव्हे, मी असलों कीं मजपुढं मुद्दाम येऊन तें नाचे, चाळे करी. हा आपलं कौतुक करतो हें त्याला उमगलं होतं आणि मलाही तें समजलं होतं. परस्परांच्या ह्या समजानंच आमची मैत्री वाढत गेली. जसं जसं तें मोठं होऊं लागलं, तसतसा मला त्याचा लळाच लागला म्हणाना. एखादा दिवस तें नजरेस पडलं नाहीं, कीं मला चैन पडत नसे. पुढं एक दिवस माझ्या लक्षांत आलं, कीं माझ्या टेबलावरचं तें इवलंसं भोंक खूप मोठं झालं आहे. मी आश्चर्य करूं लागलों अन् त्याचं कारण शोधूं लागलों, तों माझ्या लक्षांत आलं कीं, तें कार्टं आतां पिटुकलं राहिलं नव्हतं. तें आतां उंदीर होऊं पाहात होतं. आपलीं मुलं नजेरसमोर असलीं म्हणजे त्याची वाढ आपल्या लक्षांत येत नाहीं. तसंच झालं माझं! आणि त्याचा पोरकटपणा आतां कमी झाला आहे ह्याची साक्ष मला लवकरच पटूं लागली. हळूहळू माझ्या टेबलावर रचून ठेवलेले ग्रंथ रात्रींतून अस्ताव्यस्त होऊं लागले. एकदा तर मी वाचीत असलेल्या उघड्या ग्रंथावर माझ्या खुणेशजारीं त्यानंहि आपली खूण करून ठेवली. पण मी त्याचा बंदोबस्त करण्याऐवजीं माझ्या ग्रंथांचाच केला. हेतु हा, कीं त्याच्या माझ्या मैत्रींत खंड पडूं नये. माझा हा भाव ओळखूनच कीं काय त्यानं माझ्याशीं अधिक लगट सुरू केली. रात्रीं कुणीतरी माझ्या तळपायाला गुदगुदल्या करीत आहे असा भास मला होऊं लागला. मग एके दिवशीं ह्याचा तलास लावण्याकरितां मी दिवा तसाच ठेवून जागा राहिलों तों काय, ही स्वारी माझे पाय खाजवून माझी चेष्टा करीत होती तेवढ्या रात्रींही मला मोठ्यांदा मोकळेपणानं हसल्याशिवाय राहावलं नाहीं. पण ह्याहीपुढं जाऊन त्यानं माझी जी मस्करी केली ती मी तरी जन्मांत विसरणं शक्य नाहीं. अलीकडे वरच्या कोनाड्यांत त्यानं दुसरं एक बिळ केलं होतं तें मला कळलं होतं. रात्रीं निजण्यापूर्वी घड्याळाला किल्ली देऊन तें उशाखालीं ठेवण्याचा माझा परिपाठ असे. एकदा चुकून मी तें गादी-खालीं ठेवण्याऐवजीं गादीवरच विसरलों. झालं. येवढी गोष्ट त्याला चेष्टेला पुरे झाली. मी सकाळीं उठून नित्याप्रमाणं बघतों, तों घड्याळ कुठं आहे! मला कांहीं कळेना. मीं सारी खोली धुंडाळली, पण सांपडेल तर शपथ. कांहीं

उमजेना म्हणून मी चिंताग्रस्त होऊन बसून राहिलों. झेनिथचं घड्याळ अन् अवघं दोन वर्षं वापरलेलं. चुटपूट लागून राहिली. इतक्यांत धप्पदिशीं आवाज झाला आणि आमचे दोस्त समोर उभे राहिले. त्यांच्या डोळ्यांतली मिस्किल चमक पाहून माझ्या डोक्यांत कल्पना आली. मी त्या कोनाड्याशीं जाऊन बिळाशीं चाचपतों तों घड्याळ्याच्या पट्ट्याचं टोंक हाताला लागलं. घड्याळ अगदीं सुरक्षित होतं. पट्ट्यावर मात्र आमच्या मित्राची कारागिरी दिसत होती. मला जरा रागच आला. ही भलतीच चेष्टा कसली, म्हणून मी रागाच्या भरांत त्याजकडे वळतों तों स्वारी होती कुठं !

पण पुढं प्लेगच्या दिवसांत पुण्यांतून मला बाहेरगांवीं जावं लागलं. आणि तीन महिन्यांनीं मी जेव्हां परतलों तेव्हां माझे इतर सर्व मित्र मला प्रेमानं भेटायला आले अन् त्यांनीं माझं अगदीं कडकडून स्वागत केलं. पण माझा हा प्रेमळ मित्र ? तो मात्र त्यांत नव्हता !

# उधळेपणा

**परवां** सुट्टीच्या दिवशीं मी माझ्या मित्राच्या घरीं गेलों असतां त्या नवराबायकोंत जरा गरम वाद झडत असल्याचं माझ्या नजरेस आलं. मी आंत पाऊल ठेवतांच मित्राला विचारलं, "काय रे, काय गडबड आहे ही?"

तो किंचित् त्रासिक स्वरांत म्हणाला, "मी काल माझ्या मित्रांबरोबर सिनेमाला गेलों होतों ना, त्याचा उपसंहार चाललाय हा. मित्रांबरोबर सिनेमाला गेलेलं बायकांना खपत नाहीं, हेंच खरं!"

"तर तर" त्याची पत्नी जरा फणकाऱ्यानेंच म्हणाली, "म्हणे मित्रांबरोबर गेलेलं मला खपत नाहीं! पण त्यांच्याबरोबर गेलांत म्हणजे खिसे मोकळे करून येतां, हें कुणी सांगायचं?"

"पण मित्रांबरोबर असलों म्हणजे अतोनात खर्च होतो आणि तूं बरोबर असलीस म्हणजे तो होत नाहीं, असं थोडंच आहे? तूं बरोबर असलीस म्हणजे दर पावलागणिक मला पैसे मोजावे लागतात, त्याची दाद तुला नसायचीच!" मित्र म्हणाला.

त्यांच्या वादाचं स्वरूप माझ्या लक्षांत आलं. मी निश्चयी स्वरानें म्हणालों, "महाशय, हें आपलं म्हणणं मात्र खरं नाहीं. बायकांच्या सहवासांत पुरुष खर्चिक बनतो ही एक शुद्ध लोणकढी थाप आहे. त्याचं औदार्य जर केव्हां खरोखरी उसळून येत असेल तर तें तो आपल्या मित्रपरिवारांत वावरत असेल तेव्हांच!"

माझं हें म्हणणं खरंच होतं. कारण स्त्रियांच्या संगतींत पुरुष आपल्या थैलीचं तोंड खुलं करतो हें जरी वरून दिसायला खरं दिसलं तरी त्यांत तिला आपल्या दिलदारपणानं दिपवून टाकावं हा हेतु अगदीं उघड असतो. आणि स्त्रियांना दिपवून टाकण्याचे असे किती क्षण प्रत्येकाच्या आयुष्यांत येत असतील? पण उलट पैशाच्या उधळपट्टीचे अनेक योग जे त्याच्या आयुष्यांत येतात ते त्याच्या दोस्तांच्या संगतींतच!

स्त्रिया स्वभावतःच कंजूष किंवा खर्चिक असतात. ह्यांपैकीं कोणती तरी एक वृत्ति त्यांच्या स्वभावांत ठळकपणें आढळून येते. पण त्यांचा हा स्वभाव कुणाच्याही सहवासांत असाच अभंग राहिलेला दिसतो. आपल्या मैत्रिणींच्या सान्निध्याचा परिणाम त्यांच्या ह्या स्वभावविशेषावर क्वचितच झालेला दिसून येईल! आपल्या मैत्रिणीनं आपल्यासाठीं पैशाचा सडा केला तरी चिकट स्त्री चिकटच राहील. म्हणूनच 'शो' करितां किंवा 'शॉपिंग'-करितां बाहेर पडलेल्या स्त्रिया, सहलीकरितां किंवा उपाहाराकरितां निघालेल्या स्त्रिया अशा तऱ्हेनं वागतांना दिसतील, कीं त्या स्वतंत्र रीतीनंच बाहेर पडल्या आहेत! आपल्या मनीबॅगचा चाप घट्ट लावून ठेवायला त्यांना यत्किंचितही शरम वाटणार नाहीं. एवढंच काय, पण त्यांनीं एकत्र खर्च करायचं ठरवलं तर शेवटीं झालेल्या खर्चाचा हिशेब लावून आणे पैची देवघेव करतांना त्यांचा जीव रतिभरही ओशाळणार नाहीं. खर्चिकपणाच्या बाबतींत त्यांच्यांतील दुजाभावच नाहींसा होऊं शकत नाहीं.

पण पुरुषांची गोष्ट ह्याबाबत अगदीं न्यारी आहे. कारण जेव्हां जेव्हां दोन पुरुष-मित्र एकमेकांच्या संगतींत वेळ घालविण्याचं ठरवितात तेव्हां त्यांच्या वृत्ति निरनिराळ्याच एका भावनेनं भरल्याचं दिसून येतं. ते जेवायला म्हणून बाहेर पडोत किंवा सुटी घालवायला म्हणून सहलीला निघोत, कोठल्या तरी गूढ प्रभावानं त्या दोन व्यक्तींच्या मिलाफांतून तिसरीच एक व्यक्ति निर्माण झाल्याचं प्रत्ययाला येतं! ही नवीन निर्माण झालेली उत्सवमूर्ति म्हणजे कर्णाचा अवतारच! चवल्यापावल्यांचीं यःकश्चित् नाणीं तर तिच्या हिशेबांत नसायचीं. "पैसे, हं ती गोष्टच कशाला विचारांत घ्यायची" ह्या बेफिकीरपणानं सारा व्यवहार चालायचा. पैशानं जें जें कांहीं विकत घेतां येईल तिचा उपभोग ती व्यक्ति घेईलच पण 'आणखी'ची मागणी करण्याकरितां तिचा हात सतत पुढं राहील. उत्कृष्ट उपाहारगृहाशिवाय तिचे पाय दुसरीकडे वळणार नाहींत आणि थिएटरांत बॉक्सशिवाय बसावयास तिचं मन घेणार नाहीं. एखाद्या दिलदार सरदार-पुत्रासारखी तिची वागणूक असेल! ह्या अशा उत्सवमूर्तीच्या ताब्यांत गेलेले ते दोन मित्र मग आपल्या पैशाची किती उधळपट्टी करतील तें कुणी सांगावं! अशा वेळीं कद्रु मनुष्य देखील आपल्या कंजूषपणावर

पांघरूण घालण्याचा प्रयत्न करील. मग त्या दोन मित्रांना हात राखून खर्च करण्याची कल्पना देखील असह्य झाली तर नवल कोणतं ? अशा स्थितींत 'काटकसर', 'शिल्लक', 'पुढला विचार' वगैरे शब्दांचा मागमूसही त्यांच्या कोशांत उरलेला नसतो. जेव्हां ते एकेकटे असतील तेव्हां बसनं जाणं म्हणजे चैन वाटेल त्यांना. पण आतां ते टॅक्सीशिवाय हलणार नाहींत. एरवीं 'हनी ड्यू' सिगरेटवर समाधान मानणारे ते प्राणी आतां 'स्टेट एक्स्प्रेस' शिवाय दुसरी सिगरेट हातांत धरणार नाहींत. दिलदारपणाच्या ह्या नशेंत साऱ्या गोष्टी 'ए वन'च मिळाल्या पाहिजेत. त्या मिळणं हीच जिव्हाळ्याची गोष्ट. पैसे खर्च होणं ही नव्हे !

ह्या खर्चिकपणाच्या मुळाशीं आदरातिथ्याची कल्पना असेल अशी जर कुणाची समजूत असेल तर ती चुकीची होय. कारण एक पाहुणा आणि दुसरा यजमान ही वस्तुस्थितीच नसते ह्या ठिकाणीं ! एकमेकांच्या चढाओढीनं एकमेकांकरितां खर्च करायचा हीच एक भावना मन भारून टाकीत असते. आणि खरं सांगायचं तर एकमेकांतला दुजाभावच ह्या ठिकाणीं लपलेला असतो. तिसऱ्याच एका गूढ व्यक्तीच्या प्रेरणेनं हा प्रसंग साजरा होत असतो. ह्या गूढ व्यक्तीचा प्रभावच असा, कीं त्यामुळें उधळेपणाचा संचार प्रत्येकांत व्हावा ! पण हा औदार्याचा संचार स्त्री बरोबर असेल तर पुरुषांचे ठिकाणीं होऊं शकत नाहीं. ह्यावर कुणी अशी शंका काढील, कीं 'कां हो, पुरुष कधीं कधीं स्त्रियांकरितां बेसुमार खर्च करतांना आढळतात हें कसं ?' होय, गोष्ट खरी. पण तें केव्हां, तर अनुनयाच्या मोसमांत ! पुरुष एकदा अनुनयाच्या भावानं भरला, कीं मग तो एखाद्या सरदारपुत्राप्रमाणें आपल्या पैशाचं पाकीट आपल्या प्रेयसीपुढें उघडं करील. पण हीही एक लहर आहे हें विसरतां येणार नाहीं. आणि तीसुद्धा ह्या मोसमापुरतीच ! इतर वेळीं पुरुष स्त्रियांकरितां म्हणून जेव्हां पैसे खर्च करतांना दिसतो त्या वेळीं त्याची एक निराळीच तऱ्हा असते. कारण पैशाचा व्यय करतांना आपण आपल्या औदार्यानं एका नाजूक अंतःकरणाला दिपवून टाकीत आहोंत ही भावना त्या ठिकाणीं वास करीत असते. ऐषारामाची रेलचेल करून आपण तिला सुखविल्याचं समाधान विकत घेत आहोंत ह्याची जाणीव त्याला असते. ती नको नको म्हणत

असतां आपल्या पाकिटांतून हा नोटा पुढें सरकवीतच असतो. ह्याचं कारण आपल्या दिलदारपणानं चकित झाल्याची चमक तिच्या पाणीदार डोळ्यांत उमटलेली पाहावी म्हणून; उपकृत झाल्याच्या भावनेनं पसरलेली तांबुस छटा तिच्या गालांवर दृष्टीस पडावी म्हणून; आनंदातिशयानं उसळलेलं हसूं तिच्या रेखीव ओठांवर खेळविल्याचं श्रेय मिळावं म्हणून. मुक्त हस्तानं पेरलेले पैसे वसूल झाल्याचंच समाधान नव्हे का हें ?

पण मित्रामित्रांच्या सहवासांत दुसऱ्याच्या सुखानं सुखित होण्याची वृत्ति नसते. मौजेकरितां बाहेर पडलेली ही जोडी कोणत्या तरी गूढ संकेताच्या आधीन झालेली असते. मग हा जादा खर्च म्हणजे दुसरी कांहीं एक गोष्ट वसूल करण्याकरितां केलेली पैशाची पेरणी नसते. दोघांनीं एकमेकांशीं हस्तांदोलन केलं, एकमेकांच्या पाठीवर थापा मारल्या, गळ्यांत हात घातले आणि हास्याच्या कल्लोळांत गप्पा सुरू झाल्या, कीं कांहीं एका जादूचा अंमल त्यांजवर सुरू होतो आणि मग त्या दोन जिवांतून तिसराच एक जीव त्या ठिकाणीं प्रगट होतो. आणि एकदा का ही मंडळी त्याच्या ताब्यांत गेली कीं भाडं, फी, घरखर्च साऱ्या काळज्या चुटकीसारख्या नाहींशा होतात आणि जग हें एक चैनबाजीचं ठिकाण आहे ह्या भावनेचं साम्राज्य सुरू होतं. अडीअडचणीकरितां राखून ठेवलेले पैसे, बँकेंत ठेवण्याकरितां जमविलेली शिल्लक, सारं कांहीं बाहेर पडायचं आणि ह्या चैनीच्या मामल्यांत सामील व्हायचं. ह्या उत्सवप्रसंगीं प्रगटणाऱ्या ह्या महात्म्याला कांहीं नांवगांव आहे, कीं नाहीं हें मला माहीत नाहीं. पण त्याला ‘ उधळेराव ’ हें नांव दिलं तर तें खास शोभून दिसण्यासारखं आहे.

## मुखवटे

गेले कित्येक दिवस माझ्या मनांत जो एक विचित्र संशय डाचत होता, तो गेल्या आठवड्यांत घडलेल्या दोनचार प्रसंगांनीं खरा ठरला आणि स्वतःविषयीं मला एक नवीनच शोध लागला !

त्या दिवशीं मीं घरांत पाऊल ठेवलं आणि माझ्या पत्नीनं मला हटकलं "म्हटलं नव्हतं मी, कीं काम झालंच पाहिजे म्हणून !"

"कसलं काम म्हणतेस ?" मीं तिचं बोलणं न कळून विचारलं.

"चला, मला फसवूं नका ; तुमचा चेहरा सांगतोय."

"काय पण ? काय सांगतोय चेहरा ?" मीं जरा त्रासिकपणेंच विचारलं.

"कां उगीच वेड घेऊन पेडगांवला जायचं ? पेढे आणलेत ना ?"

"पेढे" म्हटल्याबरोबर माझ्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. आमच्या 'बोर्डाची मीटिंग' व्हायची होती काल. तींत माझ्या 'प्रमोशन' चं ठरायचं होतं. मीं म्हटलं, "मीटिंगच झाली नाहीं तर प्रमोशनचं कसं ठरणार ?......पण तुला एक गंमत दाखवायची आहे." मीं खिशांतला लिफाफा तिच्या हातांत ठेवला.

तो पाहातांच ती म्हणाली, "इश्श ! ह्यांत तें एवढं काय हुरळून जायचं ?"

"पण कोण हुरळून गेलंय ?" मीं जरा नाराजीनंच विचारलं.

"नाहीं तर काय ? आरशांत पाहा" हें म्हणत ती आंत झटकली.

तिच्या ह्या म्हणण्याचा मला चमत्कार वाटला. हं, म्हणे मी हुरळलोंय ! हुरळून जाण्यासारखं त्यांत काय होतं ? कांहींच नाहीं. पण मला मनांतल्या मनांत आनंद मात्र झाला होता. आणि तो कां होऊं नये ? आजच लागलेल्या चित्रपटाच्या पहिल्या खेळाला खास निमंत्रित म्हणून येण्याचं बोलावणं खुद्द + + + + सारख्या डायरेक्टराकडून आल्यावर कुणाला आनंद होणार नाहीं ? पण हुरळून मात्र मी गेलों नव्हतों. मला जरा रागच आला माझ्या पत्नीचा.

— आणि ह्या प्रसंगानंतर लगेच जो प्रसंग घडला तो हा.

दाढी उरकून मी दाढीच्या सामानांत माझा 'नेलकटर' पहात होतों. तो मला तेथें मिळेना. जिथल्या तिथं मी वस्तु ठेवणारा असल्यानें, तो तिथं सांपडेना, तेव्हां तो हरवला असला पाहिजे, असा मी तर्क केला आणि तो मग खराच ठरला. 'नेलकटर' हरवल्याबद्दल मला जरा चुटपुट लागून राहिली. आज तो आठ वर्षं मजजवळ होता. दर चार दिवसांनीं त्यानं माझी सेवा चोख बजावली होती. मग कां चुटपुट वाटूं नये ? पण जेव्हां जेवतेवेळीं माझ्या पत्नीनं मला म्हटलं, "एवढं तें काय लावून घ्यायचं त्या मेल्या 'नेलकटरचं' ?"

तेव्हां मी जरा चपापूनच उत्तरलों, "कांहींतरीच तुझं."

"कांहींतरीच काय ? विचारा कुणाला, तुमचा चेहेरा..." इतकं ती म्हणते आहे तों माझा एक मित्र तेथं 'दत्त' म्हणून प्रगट झाला आणि त्यानं जेव्हां पुष्टि दिली तिच्या म्हणण्याला तेव्हां मी जरा चिडलोंच.

आणि असे जेव्हां आणखी कांहीं प्रसंग घडले तेव्हां माझ्या मनाची खात्री होऊं लागली, कीं माझं मन आणि माझा चेहेरा ह्यांत मोठी विसंगति असली पाहिजे. वास्तविक ह्या गोष्टीची जाणीव मला पूर्वींच व्हायला हवी होती. मला आठवतं, ब्रिज खेळतांना किंवा कॅरम खेळतांना डाव माझ्यासारखा झाला, कीं 'लेका, एवढा चढून जाऊं नकोस' असं म्हणून माझे दोस्त माझा तेजोभंग करण्याचा प्रयत्न करीत. उलट डाव हरलों तर 'चेहेरा काय टाकतोस ?' म्हणून माझं सांत्वन करायला धावत. डाव झाला तर चढून जाण्याइतक्या सुखदुःखाच्या तीव्र संवेदना मला होत नसत, हें मला कळे आणि मित्र म्हणत तितका त्यांचा आविर्भाव माझ्या चेहेऱ्यावर दिसतो, ह्यावर माझा विश्वासही बसत नसे. कारण चारचौघांत अतिशयोक्तीनं बोलणं हा एक विनोदाचा प्रकार समजला जात असे. पण आतां ह्या विनोदांतलं मर्म माझ्या पूर्णपणें लक्षांत आलं आहे. घड्याळाच्या दोन कांट्यांप्रमाणं माझ्या चेहेऱ्याचा आणि मनाचा संबंध असावा. एक तासाचा अवधि दाखवायला लहान कांट्याला पांच घरं सरकावं लागलं तर तेवढाच अवधि दाखवायला मोठ्या कांट्याला साठ घरांची प्रदक्षिणा करावी लागते; तद्वत् अंतःकरणांतली नुसत्या उल्हासाची छटा दाखवायला माझ्या चेहेऱ्याला हर्षाचा आविर्भाव आणावा लागतो. माझ्या चेहेऱ्याची ठेवणच

अशी आहे काय, कीं कोठलीही छटा तेथें अतिरंजित किंवा विकृत झाल्याशिवाय वठूंच नये ? तसं म्हटलं तर मी विचारशील प्रकृतीचा मनुष्य आहें. पण आलेल्या अनुभवावरून वाटतं, कीं माझा चेहेरा एखाद्या उर्दू नाटकांतलं 'विकारविलसित' वठवायला लायक आहे !

मीं जेव्हां तारुण्यांत प्रवेश केला, तेव्हां प्रत्येक तरुण मूर्खाप्रमाणं मला वाटे, कीं आपल्या चेहेऱ्यावर आपली पूर्ण हुकमत आहे. आणि चेहेऱ्यावर एखाद्या भावाचा गोड मुखवटा चढवला, कीं मग आपण वाटेल ते विचार करायला मोकळे आहोंत, ह्या समजुतीनं मी वागत असें. ज्या तरुणांनीं त्या वेळेस माझ्याशीं सलगी केली होती त्यांच्या मूर्खपणाचा आणि निर्बुद्धपणाचा मला तिरस्कार वाटे. पण त्यांच्यांत वावरतांना चेहेऱ्यावर छटाकभर हसूं पेरून आणि डोळ्यांत गुंजभर चमक आणून मी आंतून असा चेहेरा लावून ठेवीं, कीं माझं त्यांच्याविषयींचं मत विशाद त्यांच्या लक्षांत येईल ! चेहेऱ्याच्या जोरावर माझं गुपित आंत अगदीं अलगद आहे असं मी कैक दिवस समजत होतों. पण त्यांच्यापैकीं एकाशीं माझी विशेष दोस्ती जमल्यावर त्यानं जेव्हां माझं मन उघडं करून दाखवलं आणि तें प्रत्येकाला सुरुवातीपासून समजलं असल्याचं सांगितलं, तेव्हां मी चाट झालों. आणखीही अशाच गोष्टी घडल्यावर मला समजून चुकलं, कीं भलत्याच कल्पनेनं आपण आपलीच वंचना करीत होतों म्हणून ! मनांत एक असतां बाहेर दुसरं दाखवणं हें आपल्याला जमायचं नाहीं ह्याबद्दल माझी खात्री पटूं लागली. 'आंतरः कोऽपि' हेतू बाळगून वर निरिच्छपणाचा आव आणण्याची राजकारणी मखलाशी आपल्याला जुळणार नाहीं हें मला पुरतं कळलं. एकंदरींत स्वतःविषयीं फेरविचार करणं मला जरूर वाटूं लागलं.

वस्तुस्थिति ही अशी होती. पण त्याबद्दल खेद वाटण्याचं कारण नव्हतं. आंत एक, बाहेर एक असा दुटप्पी आणि दुहेरी वागण्याचा ताण सहन करावा कुणीं ? उलट ह्या गोष्टीबद्दल मीं माझं अभिनंदन केलं आणि मनाशीं विचार केला, कीं आंत एक बाहेर एक, अशी सभ्यांची रीतच नसते मुळीं ! निर्मळ अंतःकरणाचं स्वच्छ प्रतिबिंब दाखविणारा प्रामाणिक चेहेरा लाभणं हें खरोखरी भाग्य म्हटलं पाहिजे. मनांतले विचार जगाला

स्वच्छपणें सांगणारे रामशास्त्र्यांसारखे लोक इतिहासांत अजरामर झाले नाहींत का? मग आपल्याला इतका प्रामाणिक अन् उमदा चेहेरा लाभल्याबद्दल केवढा तरी आनंद झाला पाहिजे! पण ह्याही समजुतीचं समाधान लाभूं नये असा योग होता. जेव्हां मजविषयीं झालेल्या गैर-समजुतीचे घोटाळे माझ्या नजरेस येऊं लागले, तेव्हां मला मजविषयींची समजूत पुन्हा बदलली पाहिजे असं वाटूं लागलं आणि वर सांगितलेले प्रसंग जेव्हां घडले, तेव्हां तर माझा पुरता भ्रमनिरास झाला. एखाद्याबद्दल माझ्या मनांत असमाधान उत्पन्न झालं तर 'हं, एवढं काय खवळतां त्याच्यावर?' असा माझा निषेध केला जाई. एखाद्याकडे जर मी कुतूहलानं पाहूं लागलों तर 'असं टेहळल्यासारखं एखाद्याकडे पाहणं बरं नाहीं' असा इषारा मिळे. शेवटीं मला कळून चुकलं, कीं आपल्या चेहेऱ्यावर आपले भाव प्रामाणिकपणें दाखविले जात नाहींत तर तिथं त्यांचं विडंबन केलं जातं! आणि अशा रीतीनं समाजांत वावरणारा 'मी' हा खरा 'मी' नसून तो माझा तोतया होता. जणूं कांहीं मजपेक्षां भिन्न प्रकृतीच्या माणसाचा चेहेरा वापरण्याची मजवर सक्ति करण्यांत आली होती. मग मजविषयीं गैरसमज होऊं नयेत तर काय व्हावं! कारण चेहेऱ्यावर माझी हुकमत नसल्यानं तेथें जे भाव उमटत ते माझे म्हणून समजले जात! मनोभावांची सूचना मिळतांच मला न रुचेल इतक्या प्रमाणांत त्यांचा आविर्भाव दाखविण्याचा सवतेपणा माझ्या चेहेऱ्यानं मिळवला होता, हें लोकांना कसं कळावं?

अशा कांहीं विचित्र पेचांत सांपडलोंय मी! ज्याबद्दल तिरस्कार वाटावा अशा व्यक्तीचा चेहेरा लाभलाय मला. माझी प्रवृत्ति गंभीर आणि समतोलपणें वागण्याची असली तर आमचा चेहेरा एखाद्या नाटक्याप्रमाणं भडकपणाचं प्रदर्शन करणारा आहे. 'सुखदुःखे समे कृत्वा' अशा प्रकारचा स्थितप्रज्ञ असल्याचा आव मी आणीत नाहीं. पण मी विकारवश किंवा भावनावश नाहीं हेंही तितकंच खरं! जीवनांत कांहीं खळबळ पाहिजे म्हणून दुःखदुर्विपाकांत सुख मानणाऱ्यांची एक जात आहे किंवा जीवनांतील झटके (Thrills) नाहींसे झाले म्हणून जीवनावर तळतळणाऱ्यांचीही एक जात आहे. अशांबद्दल माझ्या मनांत भयंकर तिरस्कार वसत आहे.

ज्यांच्याबद्दल मन इतकं विटलेलं असावं, त्यांचं अनुकरण करायचं ठरवलं तरी तें मला शक्य आहे काय ? मी मानव आहें आणि सर्वसाधारण मानवा-इतक्या भावना मलाही आहेत. पण माझ्या भावनांचा उद्रेक अगदीं सौम्य आणि माझ्या कह्यांत राहील असाच आहे. निराशेचे झटके येणं किंवा स्फुरणाची संवेदना होणं हें माझ्या आवांक्याबाहेरचं आहे. ज्या प्रकारचं जीवन मी जगत आहें, त्यांत त्या माझ्या वांट्याला जातील असं मला वाटत नाहीं. मानवजातीकडे सदिच्छेनं पाहण्याची माझी वृत्ति आहे. एखाद्या-बद्दल मला आपुलकी वाटूं लागली, तर त्याची मजल शांत प्रेमळपणापलीकडे जात नाहीं. बरं, एखाद्याबद्दल कटु अनुभव आला, तर त्याबद्दल निष्क्रिय तिरस्कार वाटत राहील एवढंच ! फार काय, ज्या माणसाचा चेहेरा दुर्दैवानं मला धारण करावा लागत आहे, त्याबद्दल तरी मला द्वेषानं पछाडलं आहे म्हणतां काय ? छे, त्याबद्दल मला फक्त नापसंती वाटते. आतांपर्यंतच्या आयुष्यांत मीं आपमतलबीपणा केला असेल, नाहीं असं नाहीं. तसंच परोपकाराच्या बुद्धीनंही वागण्याची स्फूर्ति मला झाली असेल, पण एखाद्या प्रकरणांत नायकाची अथवा खलनायकाची भूमिका करण्याचा कांहीं मला योग आला नाहीं. आयुष्याच्या 'विकारविलसितांत' मजकडे भूमिकाच यायची झाली, तर ती अगदीं दुय्यम पात्राची येईल ! थोडक्यांत सांगायचं तर मी एक समाधानी, विवेकशील, शांत वृत्तीचा मनुष्य आहें. भावनो-त्कटता आणि विकारवशता ह्यांचा मला मनस्वी तिटकारा आहे.

माझं अंतरंग हें असं आहे. पण बाहेरचा देखावा किती विचित्र ! दुसऱ्यांकडून मला जें कळलं त्यावरून तर वाटतं, कीं अंतःकरणांत कांहीं कुजुबुज व्हायचा अवकाश, कीं चेहेऱ्यावर त्याचा गलबला झालाच ! चेहेऱ्याची ठेवणच अशी, कीं पत्त्याच्या डावांतही त्याला विजयश्रीचा उन्माद चढावा किंवा नैराश्याचा चटका बसावा. तिऱ्हाइताची बडबड ऐकतांच 'तूं मूर्ख आहेस' असं त्यानं ओरडून उठावं. जुन्या जमान्यांतल्या नटाप्रमाणं हरएक भावनेचा 'स्टंट मेकप' करण्याची त्याला खोडच जडली आहे. म्हणून मी ज्यांच्यांत वावरत असतों त्यांची ह्या माझ्या मुखवट्यानं मोठी करमणूक होत असते, पण मी मात्र पडद्यामागच्या माणसाप्रमाणं बाहेर काय चाललंय ह्याची जाणीव नसल्यानं आपल्याच

वाटण्यांत दंग असतों ; जेव्हां मग कुणाच्या तरी गैरसमजाचं वादळ उठतं तेव्हां मला बाहेरच्या 'सीन' ची कल्पना होते ! ह्या अशा विचित्र विपत्तींत सांपडलेला मीच एक आहें काय ? दुसरा कुणी नाहीं ? असेल, पण त्याची तक्रार कदाचित् ह्याच्या उलट असेल. त्याच्या मनांत भावनांचे कल्लोळ उसळून सुद्धा त्यांचा मागमूस त्याच्या चेहेरेपट्टीवर दिसत नसेल ! अशी कुणी व्यक्ति असेल तर तिच्या भेटीची मला अत्यंत उत्कट इच्छा आहे. ती जर मला भेटली, तर आम्हांला एकमेकांच्या सुखदुःखांबद्दल एकमेकां-जवळ मन मोकळं करतां येईल ! कदाचित् आम्हां दोघांत मित्रभावही निर्माण होईल, कुणीं सांगावं ? पण हें कांहींच जमलं नाहीं, तरी एकमेकांच्या चेहेऱ्याकडे पाहून आम्हांला घटकाभर करमणूक तरी करून घेतां येईल. हेंही कांहीं थोडं नाहीं.

# खाजगी दानत

"**रात्रभर** डोळ्याला डोळा कसा तो लागत नाहीं!" पलीकडच्या खोलींतील माझा शेजारी मजजवळ कुरकुरत होता. आमच्या चाळीला नाहीं तरी हा त्रास फार! जवळची वुलन मिल अलीकडे रात्रीची सुरू झाली होती; रस्त्यावरून ट्रॅम बसेसूचा खडखडाट तर अखंड सुरूच असायचा; आणि भली जंगी दगडांनीं भरलेली लॉरी रस्त्यावरून गेली, कीं धरणीकंपाचे हादरे सबंध चाळीला बसत ते निराळेच. पण त्याला जो त्रास होत होता तो हा नव्हे, तर तो त्याच्या शेजारच्या खोलींतल्या जोडप्याचा.

नुकतेंच लग्न झालें होतें त्यांचें. प्रीतिविवाह असावा तो. अगदीं केव्हांही पाहा, त्यांचा दंगा चाललेला असायचा. बोलणें तरी केवढ्यांदा! आपल्या-शिवाय साऱ्या चाळींत दुसऱ्या कुणाची वस्ती नाहींच, असें त्यांना वाटत होतें कीं काय न कळे! रात्रीं तर त्यांच्या गप्पांना ऊत! मग त्यांचें तें हसणें-खिदळणें केव्हां संपेल ह्याचा नेम नसे!

शिवाय तोही अलीकडे एकटाच होता. स्वतःशींच कांहीं त्याला बोलणें शक्य नव्हतें. होय. तेवढ्यानें तरी इकडचें बोलणें तिकडे ऐकायला जातें हें त्यांच्या नजरेला आणतां येतें. खोकलाही बिचाऱ्यावर प्रसन्न नव्हता; आणि गाण्यांतही गति नव्हती त्याची. मग काय करणार तो! सहनच करावें लागत होतें त्याला तें!

आणि त्यांच्या आपसांतील गोष्टी! अरे बापरे! त्यानें असा कांहीं आविर्भाव आणला चेहेऱ्यावर आणि असे कांहीं हातवारे केले, कीं पुढील सारें कल्पनेनेंच समजून घ्यावें.

मग मीं त्याला म्हटलें, "भैय्याकडून त्यांच्या कानांवर कां घालत नाहींस हें! म्हणावं, शेजारीं लोक राहतात."

त्यालाही पटला तो उपाय. पण आश्चर्य हें, कीं अगोदर कांहीं हें त्याच्या ध्यानांत आलें नाहीं!

मग त्यानें ती योजना अमलांत आणली कीं नाहीं तें मला समजलें नाहीं. तें समजतें तर त्याच्या अंतरंगाची किल्लीच माझ्या हातीं येती; त्याच्या

मनोवृत्तीचा अंदाजही लावतां येतो. कारण दुसऱ्याच्या गोष्टी आडून ऐकण्याची त्याला आवड आहे कीं काय हें मला कळलें असतें. नाहीं तरी स्वभावाचें सत्त्व पाहणारे असले प्रसंग क्वचितच येत असतील.

केवळ बाह्य वर्तणुकीवरून स्वभावाची वर्गवारी लावणें चुकीचें असतें. समाजांत वावरतांना आपण सारेच सफाईदार रीतीनें वागत नसतों का? मग त्यावरूनच एखाद्याच्या अंतरंगाचा अंदाज बांधायचा झाला तर तो कितपत खरा ठरेल? चारचौघांत वागतेवेळीं आपणाविषयीं त्यांचा अमूक एक ग्रह व्हावा ह्या हेतूनेंच आपण आपल्या वागण्याचा रोख ठेवलेला असतो. जगानें आपणांस चांगलें म्हणावें ही तर उराशीं बाळगलेली आपली एकमेव इच्छा! आणि तेवढ्यासाठींच उत्तम पोषाखाबरोबर आपण चालीरीतीचे पेहराव अंगावर चढवून वावरत असतों. जगाची नजर आपणावर रोखलेली आहे, ही जाणीव आपणांस कधींच विसरणें शक्य होत नाहीं आणि म्हणूनच पुष्कळ वेळां आपणांस आपल्या खऱ्या स्वभावाला मुरड घालणें प्राप्त होतें. नाहींतर मागील दाराच्या फटींतून आपणांवर कोणाची नजर आहे ही जाणीव असतांना शेजारच्या दाराला कान लावण्याचें धैर्य कोण करील? पण तेंच मागील बाजूस दारच नाहीं अशी तुमची खात्री असूं द्या; मग तुमच्या हातून कसें वर्तन घडेल? त्यावरच तुमच्या मनोवृत्तीची खरी पारख होणार आहे. बाहेर निघाल्यावर प्रत्येक स्त्रीला आदर दाखविण्याची खबरदारी सारेच घेत असतात. पण त्यांतले किती आपल्या घरांत स्वतःच्या पत्नीला आदरानें वागवीत असतील? तुमचें खरें स्त्रीदाक्षिण्य पत्नीला तुम्ही ज्या रीतीनें वागवितां त्यावरून दिसून येणार आहे आणि तुमची दानत पण!

आणखी निराळ्या रीतीनें आपल्या दानतीची परीक्षा पाहातां येईल. समजा—

तुमच्यासमोर दुसऱ्याचीं खूपशीं पत्रें पडलीं आहेत. तिथें तुम्ही अगदीं एकटेच आहांत. दुसरें कुणी तेथें येईल हीही पण तुम्हांस भीति नाहीं. काय वाटेल मग तुम्हांला? होईल कीं नाहीं तुमच्या मनाची चलबिचल?

किंवा समजा—

चुकून तुम्ही तुमच्या मुलीची ट्रंक उघडलीत आणि वरच पत्रांचें फुगीर पुडकें तुमच्या हाताला लागलें, तर किती जिज्ञासा वाढेल तुमची आपल्या चिरंजीवीविषयीं? तत्काळ तिजविषयींची हितबुद्धीही जागृत होईल तुमच्या मनांत. आपल्या मुलीविषयीं चौकसपणा ठेवण्यांत वावगें असें काय आहे? अगदीं स्वाभाविकच आहे तें. पत्रांना हात घालतांना अशा कितीतरी सबबी तुमच्या मनांत उभ्या राहतील आणि योग्यही वाटतील त्या तुम्हांला. पण पत्रांना तुम्ही हात घालीत आहांत तोंच जिन्यावर कुणाचींतरी पावलें वाजलीं तर काय होईल त्या सबबीचें? आपण करीत आहोंत तें कृत्य पितृकर्तव्यानें प्रेरित होऊन करीत आहोंत, कीं हीन वासनेच्या ताब्यांत जाऊन करीत आहोंत ह्याबद्दल तुमचा तुम्हांला संदेह वाटल्यावांचून राहणार नाहीं. तो जर तसा वाटला नसता तर तें पुडकें कसें बसें आंत कोंबून तुम्ही ती ट्रंक घाईघाईनें कां लावून घेतां?

पण तीच आपली कन्या परगांवीं गेली आहे, अशी अचानकपणें ती येणार नाहीं हीही खात्री तुम्हांस आहे, अशा वेळीं तें पुडकें आपल्या हातीं आलें आहे, मग तीं पत्रें उलगडून वाचण्याचा अनावर मोह दूर करणें शक्य होईल का? पत्रांतील खाजगी मजकुराविषयीं तर तुमची उत्सुकता पराकोटीला गेलेली असेल. तो मजकूर कळवून घेण्याचा आपणाला पूर्ण अधिकार आहे असेंही आपलें मत आपणास बजावीत असेल, कारण तसें करण्यांत आपण आपल्या मुलीचें हितच पाहाणार आहांत.

मग अशा वेळीं कसें वागाल तुम्ही? ह्याचें उत्तर म्हणजेच तुमच्या दानतीची कसोटी!

शेजाऱ्याविषयीं जिज्ञासा ठेवण्यांत वाईट असें कांहींच नाहीं, पण ती जिज्ञासा पुरी करण्यासाठीं आपण आपल्या दानतीची किंमत द्यायची कीं काय हा प्रश्न आहे. एका फ्रेंच गोष्टींत सैतान नायकाला आसपासच्या घरांतील खाजगी दालनांतून गुप्त रीतीनें हिंडवीत आहे आणि तेथें पाहिलेल्या व ऐकलेल्या गोष्टींमुळें त्याची विलक्षण करमणूक होत आहे, असें दाखविलें आहे. पण तोच सैतान संभाविताच्या वेषांत आपणांपुढें प्रगट झाला आणि म्हणाला, "चला, तुम्ही सांगाल त्या माणसाच्या

आयुष्यांतील खाजगी बाजू मी तुम्हांला प्रत्यक्ष दाखवतों " तर त्याला साभार परत पाठविण्याचा मनोनिग्रह आपणांजवळ असायला हवा.

खरें सांगायचें, तर अर्जुनाप्रमाणें विराटपुरुषाचें दर्शन घेण्याचें धैर्य अंगीं असण्यापेक्षां, आपल्या मनोविश्वाचें नग्न दर्शन घेण्याचें धैर्यच अंगीं असणें अत्यावश्यक आहे. आणि त्याकरितां चारचौघांत दिसून येणारी सामाजिक दानत सुधारण्यापेक्षां खाजगी दानतीची काळजी घेणें अधिक जरूरीचें होईल.

खोलीच्या उंबरठ्याच्या आंत प्रस्फुरित होणाऱ्या वृत्ति-वासनांनींच आपली खरीखुरी दानत बनलेली असते. सामाजिक दानतीच्या चढा-ओढीच्या परीक्षेंत आपल्याला कोणी मागें सारणार नाहीं, कारण आपण कधीं कुणाचा खून केलेला नसतो, कीं कुणावर दरोडा घातलेला नसतो; कुणाचा खिसाही अजून आपण कापलेला नसेल, किंवा खोटा दस्तऐवजही केलेला नसेल. पण ह्या गोष्टी म्हणजे आपल्या सात्त्विक दानतीचे पुरावे नव्हेत. खून करण्याइतका भयंकर संतापच आपणांस कधीं आला नसेल; किंवा दुसऱ्याचें घर फोडण्याइतकें जबर धैर्यही आपणांस झालें नसावें. खोटा दस्तऐवज करण्याचा मोह अजून आपणांस पडला नसावा; किंवा खिसे कापण्याची निकडही आपणांस भासली नसावी. कदाचित् पोलिसांच्या भयंकर दहशतीमुळेंही ह्या गोष्टी तुमच्या हातून घडल्या नसतील; किंवा कायद्याबद्दल वाटणारा आदर आपणांस ह्या गोष्टींपासून अलिप्त ठेवण्यास कारणीभूत झाला असावा.

यमधर्माच्या न्यायासनापुढें कायद्याबद्दल वाटणाऱ्या आदराची भावना कवडी किंमतीचीच ठरेल. तिथें आपल्याला "आपण इतरांचे खिसे कधीं कापलेत काय ?" किंवा "शेजाऱ्याची टेबलावर विसरलेली नोट लांबवलीत काय ?" हे प्रश्न विचारले जाणार नसून "आपण शेजाऱ्याचीं बोलणीं आडून ऐकलींत काय ?" किंवा "दुसऱ्याचीं पत्रें त्यांच्या नकळत फोडलींत काय ?" हेच सवाल टाकले जातील.

सारांश, कायद्याबद्दल आस्था, परस्त्रीला दाखविलेला आदर, वगैरे गोष्टींची नोंद चित्रगुप्ताच्या वहींत होणार नसून तुमच्या हातून एकान्तांत घडलेल्या ह्या क्षुल्लक गोष्टींचींच टिपणें तींत केलेलीं आढळतील; आणि ह्याच गोष्टी त्या न्यायासनासमोर तुमचें भवितव्य ठरवतील.

# माझी पहिली लघुकथा प्रसिद्ध झाली तेव्हां—

कधीं वेळ जात नसला, म्हणजे माझ्या लेखांच्या छापील कात्रणांचं जें मीं एक फाईल करून ठेवलं आहे, तें मी उगीचच चाळूं लागतों. त्यांत फाईल केलेलीं कात्रणं मीं कांहीं एका विशिष्ट वर्गवारीनं लावलीं आहेत असं नाहीं. जें कांहीं लिखाण जेव्हां प्रसिद्ध झालं त्याचं कात्रण काढून तें मीं तींत जमा केलं आहे. त्यामुळं त्या एकंदर संग्रहाला संकीर्ण असं स्वरूप आलं आहे. कविता, लघुकथा, लघुनिबंध, लेख इत्यादि ज्या निरनिराळ्या प्रकारांनीं मीं आपलं लेखन केलं आहे, त्यांचं सरमिसळ असं दप्तरच त्या फायलींत तयार झालं आहे. पण ह्या विस्कळीतपणें जमलेल्या संग्रहाचीं पानं मी चाळूं लागलों, कीं त्यांतच मला एक धागा सांपडतो आणि त्याच्या आधारानं मी पुढं पुढं सरकूं लागलों, कीं माझ्या मनाची अनेक प्रकारें करमणूक झाल्याशिवाय रहात नाहीं.

माझं पहिलं लेखन केव्हां प्रसिद्ध झालं, हें मला नक्की स्मरत नाहीं. प्रथम म्हणून जें कांहीं प्रसिद्ध झालं तें गद्य होतं कीं पद्य हेंही मला सांगतां येईल असं वाटत नाहीं. पण माझ्या फायलीच्या तळाला जें कात्रण मीं डकवलं आहे, तें मात्र कवितेचं आहे, ही गोष्ट स्पष्ट आहे. ती कविता कुठं प्रसिद्ध झाली ह्याचा तलास तिच्या शिरोभागीं असणाऱ्या मासिकाच्या नांवाचा पत्ता नसल्यानं मला लागत नाहीं आणि तो लावण्याचा मी प्रयत्नही करीत नाहीं. कारण ती कविता पहिल्या उमेदींतच लिहिली गेली असल्यानं तिच्या उमदेपणाबद्दल माझं मन साशंक आहे. पण असं असलं तरी ती मला अप्रिय आहे असं अनुमान काढणं जरा धोक्याचं होईल. कारण तिजबरोबर माझ्या ‘ छापील संसारा ’ ला सुरुवात झाली आहे हें मी विसरूं शकत नाहीं. शिवाय अनेक नामवंत साहित्यिकांनीं आपल्या लेखन-प्रपंचाची मेढ कवितेच्याच अनुनयानं रोवली आहे, हें आशादायी समाधान तिनं मला वेळोवेळीं दिलं आहे.

कवितेनं सुरुवात करून भरीव वाङ्मयसेवेच्या पायावर ज्यांनीं आपलं कीर्तिमंदिर उभारलं आहे त्यांचं भाग्य फारच थोड्यांच्या वांट्याला येतं हें खरं, तरी तारुण्याच्या ऐन बहरांत कविता-कामिनीच्या प्रणयचेष्टांचं सुख ज्याच्या वांट्याला आलं तोही कांहीं कमी भाग्यवान नव्हे. खऱ्या प्रणयाची गोडी अवर्णनीय आणि अवीट खरीच, पण कवितेच्या सहवासांत घालविलेल्या क्षणांचं माधुर्य त्याहूनही कांहीं न्यारं आहे, हेंही तितकंच खरं. माझ्या काव्यासंबंधीं लिहितांना एका मार्मिक टीकाकारानं असं लिहिलं आहे, कीं 'तरुण कवीला स्त्रीइतकीच कविताही प्रिय असते आणि काव्याविष्काराच्या वेळीं तर तो प्रियेहूनही कवितेचेच अधिक लाड करतो.' हें त्या टीकाकाराचं मार्मिक वाक्य वाचून मला अपरिमित आनंद झाला. कारण माझ्या अंतःकरणांतल्या एका अत्यंत नाजूक पण सूक्ष्म भावनेला त्यानं वाचा फोडली!

पण कवितेशीं इतक्या असीम भावनेनं वागत असतां लघुकथेचा मोह मला केव्हां आणि कसा पडला तें सांगतां येत नाहीं.

मानवी स्वभावच मला वाटतं असा आहे, कीं त्याला एकनिष्ठेपेक्षां बहुविधतेंतच गोडी वाटावी. राजमार्गानं सुखाचा प्रवास सुरू असतां जरा आडवाटेनं जाण्यांतच त्याला मौज वाटावी. ह्या फुलावरून त्या फुलावर बागडण्यांतच आपल्या वृत्तीचं सार्थक झाल्यासारखं वाटावं. काव्य-लेखनाच्या ऐन भरांत मला लघुकथेशीं लगट करावीशी वाटूं लागली, हें तरी त्याचंच प्रत्यंतर म्हटलं पाहिजे!

माझी पहिली लघुकथा लिहून पूर्ण होतांच मला नवनिर्मितीचा हर्ष झाला कीं नाहीं तें आतां आठवत नाहीं. पण ती लिहून पूर्ण होतांच माझ्या मनांत एक असमाधान निर्माण झालं हें खास. कारण एकमेकांच्या संगतींत फिरायला जाणारं प्रणयी युग्म हें परस्परांच्या सहवाससुखाच्या आनंदापेक्षां पाहणाऱ्यांच्या डोळयांत आपणाविषयीं दिसणाऱ्या कौतुकाचंच भुकेलं असतं त्याप्रमाणें लघुकथेच्या निर्मितीच्या आनंदापेक्षां तिच्या प्रसिद्धीचाच आनंद मला अधिक हवासा वाटला होता. कदाचित् नवनिर्मितीच्या आनंदाची कलाकृति दुसऱ्याच्या कौतुकाचा विषय झाल्याशिवाय पूर्ण होऊं नये असंही असेल! तें कसंही असलं तरी तिच्या प्रसिद्धीची हुरहूर मला लागून रहावी हें साहजिकच होय.

प्रसिद्धीचं तंत्र अवगत असावं इतका अनुभव त्या वेळीं मजजवळ नव्हता. पण नवोदित लेखकाला वाटणारी प्रसिद्धीची अधीरता मात्र माझे ठिकाणीं पुरेपूर होती. माझी लघुकथा मीं त्या वेळच्या प्रसिद्ध अशा एका मासिकाकडे रवाना केली आणि तूप खाऊन रूप पाहणाऱ्या बालिशवृत्तीनं तिच्या तात्काल प्रसिद्धीची मी अपेक्षा करूं लागलों. परीक्षेच्या निकालाची उत्कंठा उमेदवाराला जितकी लागून रहात असेल त्यापेक्षां कितीतरी पटीनं जास्त अशा उत्कंठेनं मी त्या अंकाची प्रतीक्षा करूं लागलों. त्या लघुकथेच्या प्रसिद्धीवर माझे केवढे तरी मनोरथ उभारले होते. तिच्या प्रसिद्धीनं एका नवोदित लघुकथा-लेखकाचा तारा वाङ्मयक्षितिजावर उदय पावणार होता. मराठी वाङ्मयांत त्या लघुकथेनं एका अत्युत्तम कथेची भर पडणार होती. शिवाय तिजमुळं तिच्या वाचकांच्या मनांत लेखकाच्या उज्ज्वल भवितव्याविषयीं भरीव अपेक्षा निर्माण होणार होत्या.

इतके मनोरथांचे मनोरे मी उभवीत असलों तरी तिच्या प्रसिद्धीनं अज्ञात वाचकांचीं कौतुकांनीं भरलेलीं भाराभर पत्रें आपल्या नांवें मासिकाच्या कचेरींत येतील अशा कल्पनेनं मी हुरळून गेलों नव्हतों किंवा 'आपली उत्कृष्ट गोष्ट वाचून इतका आनंद झाला म्हणून सांगूं ! आपल्यासारख्या लेखकाचा परिचय होण्याचं भाग्य असावं' असं नाजूक हातांनीं लिहिलेलं पत्र त्या संभारांत सांपडेल अशीही अवास्तव कल्पना मला शिवली नव्हती. त्या वेळच्या कथांतून केवळ एका गोष्टीमुळं वा कवितेमुळं नायक-नायिकांचा प्रेमसंबंध जुळल्याचं दाखविल्याचं मला स्मरतं. आणि ह्या वेळीं मला वाटतं कीं तशी अवास्तव अपेक्षा मी त्या वेळीं बाळगली असती तर त्या वेळच्या माझ्या स्मृतींना अद्भुतरम्यतेचा दाट मुलामा चढला असता आणि आतां माझी केवढी तरी करमणूक झाली असती !

पण तशी घटना घडायची नव्हती एवढंच नव्हे, तर माझ्या साऱ्याच अपेक्षांवर पाणी फिरायचं होतं. कारण ज्या वेळीं त्या मासिकाचा अंक माझ्या हातीं आला त्या वेळीं लेखकांच्या मालिकेंत माझं नांव कुठंच झळकल्याचं माझ्या नजरेस आलं नाहीं. एखाद्या तज्ज्ञ ज्योतिषानं वारंवार आश्वासनं देऊनही सोडतींत बक्षिसाचा नंबर नेमका चुकावा म्हणजे सोडतीच्या नादिष्टाला जें दुःख होईल त्याच्या कितीतरी पट अधिक दुःख मला

झालं. त्या मासिकाबद्दलचं माझं मत एकदम विपरीत झालं. त्याच्या संपादकाच्या उच्च अभिरुचीविषयीं मला दाट संशय वाटूं लागला आणि त्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या गोष्टींच्या नीरसपणाबद्दल मला तिरस्कार वाटूं लागला. ज्यांना ज्यांना म्हणून मीं 'माझी उत्कृष्ट लघुकथा येत्या अंकांत वाचा' म्हणून ठांसून सांगितलं होतं त्यांचं तोंड चुकवणं मला भाग पडलं.

हा अनुभव मला लागोपाठ पांच-सहा वेळां यायचा होता. कारण संपादकमहाशयांना माझी गोष्ट आपल्या दप्तरांत तिष्ठत ठेवण्याची इच्छा झाली होती. मग अशा स्थितींत माझं मन फिरून कवितेकडे वळावं ह्यांत नवल कसलं ?

पण एके दिवशीं अचानकपणें मित्रांनीं ताज्या अंकांत आलेली माझी गोष्ट जेव्हां माझ्या नजरेस आणली तेव्हां मला आश्चर्याचा एक धक्काच बसला. कारण ती आतां कधीं काळीं त्या मासिकांत प्रसिद्ध होईल ह्याची आशा मीं जवळ जवळ सोडून दिली होती. पण ह्याहीपेक्षां आश्चर्याचा मोठा धक्का बसला तो दुसऱ्या दिवशीं. कारण दुसऱ्या दिवशीं आणखी एक अशीच लघुकथा पाठविण्याबद्दल त्या संपादकमहाशयाचं पत्र माझ्या हातीं पडलं !

त्यानंतर मीं लघुकथा लिहिल्या त्या अगदीं निर्विकार मनानं आणि त्या प्रसिद्ध झाल्या त्याही विलंब न लागतां ! कारण संपादकांनीं मागणी केल्यावरच मीं त्या लिहिल्या. पण त्यामुळं पहिल्या लघुकथेच्या वेळीं आशा-निराशेचीं आणि सुखदुःखाचीं जीं गोड आंदोलनं मीं अनुभवलीं तीं पुन्हा माझ्या अनुभवास आलीं नाहींत.

आणि म्हणूनच मी ज्या ज्या वेळीं फाईल चाळतांना ह्या माझ्या पहिल्या लघुकथेशीं येऊन थांबतों त्या त्या वेळीं ह्या माझ्या मनःस्थितीचा पुनःप्रत्यय मला घडतो आणि त्यामुळें क्षणभर कां होईना मला जें एक सुख होतं तें अगदीं निराळं !

प्रसिद्धीचं तंत्र अवगत असावं इतका अनुभव त्या वेळीं मजजवळ नव्हता. पण नवोदित लेखकाला वाटणारी प्रसिद्धीची अधीरता मात्र माझे ठिकाणीं पुरेपूर होती. माझी लघुकथा मीं त्या वेळच्या प्रसिद्ध अशा एका मासिकाकडे रवाना केली आणि तूप खाऊन रूप पाहणाऱ्या बालिशवृत्तीनं तिच्या तात्काल प्रसिद्धीची मी अपेक्षा करूं लागलों. परीक्षेच्या निकालाची उत्कंठा उमेदवाराला जितकी लागून रहात असेल त्यापेक्षां कितीतरी पटीनं जास्त अशा उत्कंठेनं मी त्या अंकाची प्रतीक्षा करूं लागलों. त्या लघुकथेच्या प्रसिद्धीवर माझे केवढे तरी मनोरथ उभारले होते. तिच्या प्रसिद्धीनं एका नवोदित लघुकथा-लेखकाचा तारा वाङ्मयक्षितिजावर उदय पावणार होता. मराठी वाङ्मयांत त्या लघुकथेनं एका अत्युत्तम कथेची भर पडणार होती. शिवाय तिजमुळं तिच्या वाचकांच्या मनांत लेखकाच्या उज्ज्वल भवितव्याविषयीं भरीव अपेक्षा निर्माण होणार होत्या.

इतके मनोरथांचे मनोरे मी उभवीत असलों तरी तिच्या प्रसिद्धीनं अज्ञात वाचकांचीं कौतुकांनीं भरलेलीं भाराभर पत्रें आपल्या नांवें मासिकाच्या कचेरींत येतील अशा कल्पनेनं मी हुरळून गेलों नव्हतों किंवा ‘आपली उत्कृष्ट गोष्ट वाचून इतका आनंद झाला म्हणून सांगूं ! आपल्यासारख्या लेखकाचा परिचय होण्याचं भाग्य असावं’ असं नाजूक हातांनीं लिहिलेलं पत्र त्या संभारांत सांपडेल अशीही अवास्तव कल्पना मला शिवली नव्हती. त्या वेळच्या कथांतून केवळ एका गोष्टीमुळं वा कवितेमुळं नायक-नायिकांचा प्रेमसंबंध जुळल्याचं दाखविल्याचं मला स्मरतं. आणि ह्या वेळीं मला वाटतं कीं तशी अवास्तव अपेक्षा मी त्या वेळीं बाळगली असती तर त्या वेळच्या माझ्या स्मृतींना अद्भुतरम्यतेचा दाट मुलामा चढला असता आणि आतां माझी केवढी तरी करमणूक झाली असती !

पण तशी घटना घडायची नव्हती एवढंच नव्हे, तर माझ्या साऱ्याच अपेक्षांवर पाणी फिरायचं होतं. कारण ज्या वेळीं त्या मासिकाचा अंक माझ्या हातीं आला त्या वेळीं लेखकांच्या मालिकेंत माझं नांव कुठंच झळकल्याचं माझ्या नजरेस आलं नाहीं. एखाद्या तज्ज्ञ ज्योतिषानं वारंवार आश्वासनं देऊनही सोडतींत बक्षिसाचा नंबर नेमका चुकावा म्हणजे सोडतीच्या नादिष्टाला जें दुःख होईल त्याच्या कितीतरी पट अधिक दुःख मला

झालं. त्या मासिकाबद्दलचं माझं मत एकदम विपरीत झालं. त्याच्या संपादकाच्या उच्च अभिरुचीविषयीं मला दाट संशय वाटूं लागला आणि त्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या गोष्टींच्या नीरसपणाबद्दल मला तिरस्कार वाटूं लागला. ज्यांना ज्यांना म्हणून मीं 'माझी उत्कृष्ट लघुकथा येत्या अंकांत वाचा' म्हणून ठांसून सांगितलं होतं त्यांचं तोंड चुकवणं मला भाग पडलं.

हा अनुभव मला लागोपाठ पांच-सहा वेळां यायचा होता. कारण संपादकमहाशयांना माझी गोष्ट आपल्या दप्तरांत तिष्ठत ठेवण्याची इच्छा झाली होती. मग अशा स्थितींत माझं मन फिरून कवितेकडे वळावं ह्यांत नवल कसलं ?

पण एके दिवशीं अचानकपणें मित्रांनीं ताज्या अंकांत आलेली माझी गोष्ट जेव्हां माझ्या नजरेस आणली तेव्हां मला आश्चर्याचा एक धक्काच बसला. कारण ती आतां कधीं काळीं त्या मासिकांत प्रसिद्ध होईल ह्याची आशा मीं जवळ जवळ सोडून दिली होती. पण ह्याहीपेक्षां आश्चर्याचा मोठा धक्का बसला तो दुसऱ्या दिवशीं. कारण दुसऱ्या दिवशीं आणखी एक अशीच लघुकथा पाठविण्याबद्दल त्या संपादकमहाशयाचं पत्र माझ्या हातीं पडलं !

त्यानंतर मीं लघुकथा लिहिल्या त्या अगदीं निर्विकार मनानं आणि त्या प्रसिद्ध झाल्या त्याही विलंब न लागतां ! कारण संपादकांनीं मागणी केल्यावरच मीं त्या लिहिल्या. पण त्यामुळं पहिल्या लघुकथेच्या वेळीं आशा-निराशेचीं आणि सुखदुःखाचीं जीं गोड आंदोलनं मीं अनुभवलीं तीं पुन्हा माझ्या अनुभवास आलीं नाहींत.

आणि म्हणूनच मी ज्या ज्या वेळीं फाईल चाळतांना ह्या माझ्या पहिल्या लघुकथेशीं येऊन थांबतों त्या त्या वेळीं ह्या माझ्या मनःस्थितीचा पुनःप्रत्यय मला घडतो आणि त्यामुळें क्षणभर कां होईना मला जें एक सुख होतं तें अगदीं निराळं !

# सुरुवात

सुरुवात, मग ती कोणत्याही लेखन-प्रकाराची असो, कठीणच; पण त्यांतल्या त्यांत लघुनिबंधाची ! परीक्षण लिहायचं म्हटलं किंवा लेख लिहायचा म्हटला तर एवढ्या काळजींत पडण्याचं कारण नसतं. ते लिहायला कांहीं तरी कारण असतं, कांहीं तरी बाहेरचा आधार असतो. परीक्षण लिहायचं असेल तर खुणा केलेलं पुस्तक पुढ्यांत असतं आणि खुणा केलेल्या वाक्यांवर मल्लीनाथी करायला लेखणी फुरफुरत असते. प्रचलित विषयावर लेख लिहायचा म्हटला तर मतामतांचा गलबला डोक्यांत घोंघावत असतो आणि त्यांचा समाचार घ्यायला बाहु स्फुरण पावत असतात. पण लघुनिबंध लिहायला अशी कोणतीच सबब नसते ! असा कोणताच बाहेरचा आधार त्याला मिळण्यासारखा नसतो. कारण लघुनिबंधांत गुंफायच्या विचार-मालिकेचा धागा आंतूनच बाहेर यावा लागतो. म्हणून सुरुवातीच्या वाक्यांत निबंधकाराची स्थिति असहाय होत असते ! असे प्रसंग त्यावर नेहमींच येत असतात. पण ह्यामुळं निराश होण्याचं कारण नसतं. निबंधकार आपल्यांतच पुरता रंगला असेल, आपल्या अगदीं अंतरंगांतल्या गोष्टी इतरांना सांगण्याच्या खुशींत झाला असेल, तर मग त्याचं भाग्य अगदीं हेवा करण्यासारखं ! त्याला परीक्षणकारांचा किंवा इतर लेखकांचा हेवा करण्याचें कारण नाहीं. मग त्याच्या निबंधाची सुरुवात चटकन आणि चटकदार होईल आणि शेवट सुंदर आणि परिणामकारक होईल. पण असे क्षण किती ? फारच थोडे !

माझ्याविषयीं म्हणाल, तर मला सुरुवातच करणं कठीण जातं. जलाशयाच्या कांठावर तासन्तास ताटकळत बसावं पण आंत बुडी घेण्याचा धीर होऊं नये तसं माझं होतं. हातांत घेतलेल्या कामाव्यतिरिक्त मी वाटेल तें करीन, पण तासन्तास तें मजकडून व्हायचं नाहीं. वाईटच ही संवय. पण इतरांच्या संवयीपेक्षां बरी असं म्हटल्यावांचून राहवत नाहीं. इतर निबंध-कारांच्या मनांत यायचा अवकाश, कीं केलीच त्यांनीं लिहायला सुरुवात. सुरुवात अगदीं धडाक्यानं व्हायची. सुरुवातीचीं पांच–दहा वाक्यं अगदीं

सुरळीत नि सुरेख उतरायचीं, पण पुढं? पुढं जी त्यांची लेखणी अडायची ती कायम! मग ती दुसऱ्या विषयाकडे बळवली तरच हलणार. पण तिथंही हाच प्रकार. अशा तऱ्हेनं मग किती विषयांचा चिवडा होईल तें कुणीं सांगावं! ह्यापेक्षां माझीच खोड बरी नाहीं का? सुरुवातीलाच माझा टांक खुंटून बसले तोच; पण एकदा का सुरुवातीचं वाक्य कागदावर उतरलं कीं वाक्यामागून वाक्यं यायचीं आणि लेखाचा वेग अधिकाधिक वाढत जायचा. मला जी चिकाटी दाखवावी लागते ती प्रथमच. पण एकदा का धीर करून दरवाजावरची घंटा वाजवली, कीं विषयाच्या अंतरंगांत हटकून प्रवेश व्हावयाचा. इतरांसारखं दहा-पांच दारं ठोठावून अखेरीस बाहेरच ताटकळत राहण्याचं भाग्य माझ्या वांट्यास कधींच येत नाहीं.

पण माझा मलाच कसला राग येत असेल तर तो माझ्या चालढकल-पणाचा. मनांत ठरवलं आणि त्याप्रमाणं मीं सुरुवात केली असं अजून कधींच झालं नाहीं. किंचित् कातरता, थोडीशी दिरंगाई आणि मनाचा चंचलपणा ह्या गोष्टी नेहमीं मला सुरुवातीला छळतात. त्यामुळं किती वेळ वायां जातो तें माझं मलाच ठाऊक. पण मी निकरावर येण्याचा अवकाश कीं ह्या गोष्टींचा निकाल! मनही मग एकाग्र व्हायचं आणि सुरुवात बहारदार व्हायची!

अगदीं सकाळींच लिहायला बसायचा माझा शिरस्ता आहे. चटकन् कामाला सुरुवात करायची असं मी मनाशीं ठरवलेलं असतं. 'किती रेंगाळत पडलंय् हें निबंधाचं काम' असं माझ्या मनाचं स्वगत सुरू असतं; इतक्यांत सिगरेट ओढण्याची तल्लफ मला येते. खिशांतून सिगरेट केस काढून पहावी तर काय त्यांत? रिकामी ती! शोधाशोध केल्यावर एखादी सांपडते. पण ती भिकार. हं, तसली कोण ओढणार? बाहेर जाऊन पाहिजे ती विकत आणणं आलं! बरं, न ओढतांच निबंध लिहायला बसावं तर तें आतां शक्य नाहीं. खरंच, किती खट्याळ मन हें! अगदीं लहान मुलासारखं. सिगरेटची आठवण झाली ना, आतां ती पाहिजे. त्याशिवाय चालणार नाहीं. बरं इतक्यावरही दटावून त्याला लिहायला लावणं शक्य असतं. पण अगोदरच तें रुसलेलं आणि करायची सुरुवात लघुनिबंधाला! त्यांतच आशा वाटत असते कीं सिगरेटच्या झुरक्यानं तरी स्फूर्ति होईल!

आपल्या आवडत्या सिगरेटची लज्जत घेत घेत लिहिणं सुरू करावं तर भिंतीवरचा फोटो जरा कललेला नजरेस पडतो. तो नीट लावून टेबलाशीं वळावं तों शेल्फवरचीं पुस्तकं उस्कटलेलीं दिसतात! तीं लावावयास हवींतच. आतां बैठक ठोकलीच पाहिजे म्हणून खुर्चीत आसन ठोकावं तर लाकडी टेबल-खुर्चीवर लिहिणं नको वाटतं. त्यांच्या टणकपणानं जगाच्या कठोरपणाची उगीचच आठवण येते. मग मी माझी लिहायची आरामखुर्ची घालतों आणि आतां कुठंच लक्ष द्यायचं नाहीं अशा निर्धारानं लेखणीला हात घालतों. पण छे! माझ्या विचारांचा मलाच थांग लागत नाहीं. एखाद्या ग्रंथांतले अथवा एखाद्या मित्राचे विचार मला ह्या वेळीं चांगले आठवतील पण माझेच विचार मला ह्या वेळीं आठवणं कठीण होतं!

तसं म्हटलं, तर काल रात्रीं अंथरुणाला पाठ लावतांच निबंधाचे विचार माझ्या मनांत घोळूं लागले होते. मनांतल्या मनांत सारा निबंध—अगदीं शेवटच्या पूर्णविरामापर्यंत—तयार झाला होता. मच्छरदाणीवर नि खिडकीच्या तावदानावर वाक्यं लिहिलीं होतीं. आणि मी वाचीत होतों. इतक्या झरझर सारा मजकूर मला सुचत गेला होता. फक्त कागदावर उतरण्याचंच तेवढं राहिलं होतं. पण कागद. लेखणी घेऊन तें मी आतां करायला बसतांच कांहीं एक आठवेना. आणि जें आठवूं लागलं तें कमालीचं गचाळ वाटूं लागलं! विषयसुद्धां बेचव वाटूं लागला आणि लिहायचं तरी काय त्यावर? इतरांनीं इतकं कांहीं लिहिलं आहे त्याबद्दल, कीं जें कांहीं उरलं आहे तें अगदीं थोडं आणि क्षुल्लक; पण आतां लिहायला घेतलंच आहे तेव्हां लिहिलं हें पाहिजेच कांहीं तरी. म्हणून कागदावर मथळा तर उतरला. त्याखालीं एक रेघही ओढली. पण ती अगदीं सावकाश. हो, तेवढाच वेळ जावा आणि सुरुवात करणं पळभर लांबणीवर पडावं! पण रेघ पुरी होईपर्यंत माझ्या मनानं भूतकाळांत कोठल्याकोठें दडी मारली होती. हळू रेघ काढतांना मला माझ्या लहानपणच्या एका शिक्षकाची आठवण झाली. तो आम्हांला बजावीत असे, रेघ जर सरळ काढायची असेल तर अगदीं झटकन् काढा आणि ह्या शिक्षकावरून इतर शिक्षक, त्या वेळचे मित्र, सुटीचे दिवस, चित्रं, काश्मीर, व्हायोलीन ह्या विषयांवरून घसरत घसरत माझं मन 'माझा संगीत व्यासंग' ह्या पुस्तकावर येऊन थडकलं.

आणि मला आठवलं, कीं त्यांतला एक उतारा मला आज कैक दिवस वाचायचा आहे म्हणून! धडपडून मी खुर्चीतून उठलों आणि शेल्फवरून तें पुस्तक काढलं. तो उतारा वाचून संपला तरी अर्धा एक तास तें पुस्तक मी वाचीतच उभा होतों! आणि शेवटीं तें जेव्हां खालीं ठेवलं तेव्हां निराळेच विचार माझ्या मनांत घर करूं लागले होते. कांहीं दिवसांपूर्वी 'भावगीतांतलें संगीत' या विषयावर लिहायचा माझा विचार होता, त्याची मला आठवण झाली. झालं, त्याविषयींच माझं मन विचार करूं लागलं. प्रास्ताविक भागाचीं वाक्यांमागून वाक्यं सुचूं लागलीं. त्या लेखाचीं टाचणं करून ठेवावीं म्हणून कागदाला हात घातला, तों निबंधाचा मथळा ढळढळीतपणं डोळ्यांत भरला. मध्यंतरीं टेबलावर चहा केव्हां आला तेंही कळलं नाहीं. चला आतां गरमागरम चहा पिऊन त्या उत्साहाच्या भरांत सुरुवात करूं या असं म्हणून मी हातांतलं पुस्तक शेल्फवर ठेवण्यास गेलों, तों नेहरूंचं आत्मचरित्र हातीं आलं. तें मग मी किती वेळ वाचीत राहिलों कुणास ठाऊक?

'छे, छे, हें असं उपयोगी नाहीं' असं रागारागानं म्हणत मी तें पुस्तक त्याच्या जागीं खुपसलं आणि निवालेला चहा एका दमांत पिऊन टाकला. मग कांहीं एक विचार न करतां पेन हातांत घेतलं आणि कागदावर सुरुवात केली 'सुरुवात! मग ती कोणत्याही लेखनप्रकाराची असो, कठीणच; पण त्यांतल्या त्यांत लघुनिबंधाची!' नंतर मी झपाझप लिहूं लागलों. निबंध फारच थोड्या वेळांत शेवटास येऊं लागला. पण त्याचा शेवट कसा होईल हें आतांच कसं सांगतां येणार?

# लघुनिबंध : स्वरूप व स्वभाव [प्रबंध]

'हसणारा प्राणी तो मानव', 'विचार करणारा प्राणी तो मानव', 'भाषा वापरणारा प्राणी तो मानव' अशा मानवाच्या अनेक व्याख्या शास्त्रज्ञांनीं बनविल्या आहेत. पण 'आत्मप्रकटीकरण करणारा तो मानव' अशी त्याची व्याख्या कोणीं केली आहे कीं नाहीं कोणास ठाऊक. केली असल्यास ती अधिक समर्पक आणि व्यवच्छेदक ठरेल यांत शंका नाहीं. कारण विचार, भाषा किंवा हसणें हे आत्मप्रकटीकरणाचे मार्ग होत. तीं आत्मप्रकटीकरणाचीं साधनें आहेत. मानवाच्या सहज प्रवृत्ति लवचीक आणि संस्कारक्षम असल्यानें विविध अनुभवांचें ग्रहण आणि धारण त्याला करतां येतें आणि या अनुभवाचें भांडार जसजसें समृद्ध होऊं लागतें तसतशी त्याची आत्मप्रकटीकरणाची लालसा अधिकाधिक प्रबळ होऊं लागते. आत्मप्रकटीकरणाच्या पहिल्या हुंकारांतूनच भाषा आणि हास्य प्रगट झालें असें भाषाशास्त्रज्ञ आपणांस सांगतात. आत्मप्रकटीकरणाची प्रेरणा जसजशी प्रबलतर होऊं लागली आणि भाषेला जसजशी प्रकटनक्षमता येऊं लागली तसतसा विचारशक्तीचाही विकास होऊं लागला. आत्मप्रकटीकरणाच्या पोटीं भाषा आणि विचार यांचा जन्म झाला तो असा. भाषा आणि विचारच काय पण वास्तु, शिल्प, शास्त्र, वाङ्मय, धर्म थोडक्यांत सांगावयाचें तर अखिल मानवी संस्कृतीच या आत्मप्रकटीकरणाच्या खटपटींतून निर्माण झाली आहे.

वस्तुनिष्ठ आत्मप्रकटीकरणांतून शास्त्रांचा जन्म झाला तर व्यक्तिनिष्ठ आत्मप्रकटीकरणांतून वाङ्मय अवतरलें. प्रकटीकरण करणारी भाषा दोन्ही ठिकाणीं एकच असली तरी मानवी व्यवहार जसजसा अधिक विविध आणि अधिक गुंतागुंतीचा होऊं लागला तसतशी भाषाही बहुरंगी आणि बहुढंगी बनूं लागली. एके ठिकाणीं प्रवाही आणि चंचल वाटणारी भाषा दुसरीकडे संथ आणि स्थिर भासूं लागली. नव्हे या व्यवहाराच्या बाजारपेठेंत मनें प्रकट करणारी भाषा त्यांचेंच गौप्यगोपन करूं लागली. 'भाषा व्यक्त जरी करील हृदयें व्यापार आटोपला' असें जें कवि यशवंत यांनीं

म्हटलें आहे, तें एकापेक्षां अधिक अर्थानें खरें आहे. म्हणूनच सारें वाङ्मय हें आत्मप्रकटीकरणाच्या वृत्तींतूनच जन्म पावलें असलें तरी त्यांतही आत्मप्रकटीकरणाच्या परी निर्माण झाल्या आहेत. कथा, कादंबरी, नाटक आणि प्रबंध हे जरी ललितवाङ्मयाचेच प्रकार असले आणि तेही लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचें प्रकटीकरण करीत असले तरी ते प्रच्छन्नपणें, उघडपणें नव्हे. म्हणूनच ज्यांत मोकळेपणानें आत्मप्रकटीकरण करतां येईल असे निराळे वाङ्मयप्रकार निर्माण झालेले दिसतात. त्यांत भावगीत, आत्मचरित्र आणि पत्र यांबरोबरच लघुनिबंधालाही स्थान दिलें पाहिजे.

काव्य हा वाङ्मयप्रकार मानवी भाषेइतकाच जुना असला आणि त्यांतूनच साऱ्या वाङ्मयप्रकारांचा विकास झाला असला, तरी भाषा आणि मानवी व्यवहार यांच्या विविधतेमुळें आणि गुंतागुंतीमुळें त्यांतही पुढें पुढें आत्मप्रकटीकरणार्थ स्वतंत्र काव्यप्रकार अस्तित्वांत आला. भावगीत हाच तो प्रकार होय. म्हणूनच त्याचा तोंडवळा त्याच्या अगदीं अलीकडच्या लघुनिबंध या भावंडासारखा आहे. दोहोंचाही हेतु खुलें आत्मप्रकटीकरण हा असल्यानें दोहोंत आश्चर्यजनक साम्य असल्यास नवल नाहीं. भावगीताच्या मुळाशीं कांहीं प्रेरणा ( impulse ) असावी लागते, तशी ती लघुनिबंधाच्याही मुळाशीं असावी लागते. प्रसंग — वस्तुस्थिति अथवा काल्पनिक — कवीच्या मनांत प्रेरणा उत्पन्न करतो आणि त्या प्रेरणेनें जागृत झालेल्या त्याच्या मनांत विचार, स्मृति, कल्पना यांचीं वलयें निर्माण होतात. त्यांची छंदोबद्ध सम्यग् रचना म्हणजे भावगीत. लघुनिबंधाचेंही असेंच असतें. लघुनिबंधकाराच्या मनांत दररोजच्या घडामोडींतील कोणताही प्रसंग, वस्तु अथवा वचन प्रेरणा उत्पन्न करील आणि त्या प्रेरणेनें तरलित झालेल्या मनांत विचार, आठवणी आणि कल्पना यांची गर्दी उसळेल. या सामुग्रीचा ललितरम्य विलास म्हणजे लघुनिबंध. भावगीत आणि लघुनिबंध या दोहोंतही भावनांगाचें वर्चस्व असतें. विचार, कल्पना आणि आठवणी यांचा विकास आणि विलास भावनेच्या अनुषंगानेंच होत असतो. भावनांगाचें हें वैशिष्ट्य दोहोंतही सारखें असलें तरी भावनेच्या सौम्योत्कटपणामुळेंच दोहोंच्या स्वरूपांत आणि स्वभावांत फरक पडला आहे. प्रेरणेनें उत्पन्न झालेल्या

कवीच्या मनःस्थितींत भावनोत्कटता हा महनीय विशेष असतो. या भावनोत्कटतेमुळेंच त्या मनःस्थितीला अलौकिकता प्राप्त झालेली असते. आणि या भावनोत्कटतेमुळेंच चलित झालेल्या कल्पना, विचार, स्मृतींना छंदोबद्ध भाषेंत गुंफण्याची शक्यता आणि सुलभता निर्माण होते. 'जें रम्य तें बघुनियां मज वेड लागे। गाणें मनांत मग होय सवेंचि जागें' असें केशवसुत म्हणतात त्यांतला अभिप्राय हाच होय. प्रेरणेनें आलेल्या अनुभवांत कवीला भावनोत्कटता नेहमींच जाणवते; किंबहुना ती जाणवून घेण्याइतपत त्याच्या मनाची ठेवणच नाजूक आणि संस्कारक्षम झालेली असते. इंद्रधनुष्य पाहिल्याबरोबर My heart leaps up when I behold a rainbow in the sky' असे उद्गार वर्ड्स्वर्थला काढावेसे वाटतात यांतील मर्म तरी हेंच होय. लघुनिबंधकाराची मनःप्रकृति याहून वेगळ्या प्रकाराची असते. जागृत झालेल्या मनःस्थितींत कल्पना, विचार आणि स्मृति यांचा विलास भावनेच्या अंगानें होत असला तरी त्या भावनेंत उत्कटतेपेक्षां सौम्यपणाच अधिक असतो. त्या भावनेंत खळबळ आणि जळजळ असण्याऐवजीं सुळसुळ आणि आल्हादच अधिक असतो. नव्हे प्रखर आणि उत्कट भावनांचा नाच लघुनिबंधाच्या नाजूक कलाविलासाला घातुकच समजला पाहिजे. लघुनिबंधांत तरलित झालेल्या कल्पना-विचार-स्मृतीवर भावनेचें प्रशांत चांदणें तेवत असलेलें दृष्टीस पडतें. भावनेच्या झिरझिरीत शेल्याखालीं झाकून ठेवलेला विचार, स्मृति आणि कल्पना यांचा नजराणा म्हणजेच लघुनिबंध. हरघडी प्रत्ययास येणाऱ्या जीवनांत भावनोत्कट प्रसंग कितीसे असतात? भावनोत्कटता दुर्मिळ आणि अमोल असते म्हणूनच तिच्या ठिकाणीं अलौकिकतेचा अंश वसत असतो. भावगीताचा अनुभव अलौकिकत्वाचा साक्षात्कार घडवीत नसेल तर व्यर्थ! याउलट लघुनिबंधाचा संबंध जीवनांतील लौकिक अंगाशींच अधिक असतो. रोजच्या जीवनांत प्रतिबिंबित झालेलीं लौकिक सौंदर्यें हीच लघुनिबंधकाराची सामुग्री. लौकिक जीवनावर लघुनिबंधकाराचा व्यापार तर जीवनांतल्या अलौकिकतेवर काव्याची गुजराण!

आत्मचरित्र आणि लघुनिबंध या दोहोंतही आत्माविष्कार प्रामुख्यानें येत असल्यानें दोहोंनाही एकाच प्रकारांत बसविणें सोयीचें वाटतें. पण

दोहोंच्याही साम्यभेदाच्या मर्यादा ओळखणें उद्बोधक ठरेल. लघुनिबंध आणि आत्मचरित्र यांच्या स्वरूपाकडे नजर टाकतांच त्यांच्या आकारांतील फरक चटकन नजरेंत भरेल. एकांत त्रुटितपणा आणि सुटसुटीतपणा तर दुसऱ्यांत विस्तार आणि सलगपणा दिसतो. आत्मचरित्रांत घालविलेल्या आयुष्याचा आराखडा डोळयांपुढें ठेवून त्यांत प्रसंग, आणि घटनानुरोधानें आलेलें आत्मकथन असतें. या आत्मकथनांत प्रसंग, घटना आणि आयुष्याचा आराखडा यांचीं बंधनें लेखकावर पडल्यानें आत्माविष्कार जितका खुला आणि मोकळा व्हावा तितका होत नाहीं. प्रसंग, घटना आणि व्यक्ति यांना आत्मचरित्रांत आत्मकथनाइतकेंच महत्त्व असतें आणि म्हणूनच नाहीं म्हटलें तरी लेखकाच्या आत्मप्रकटीकरणाला त्यांच्या मर्यादा पडतात. त्या त्या प्रसंगांमुळें अथवा त्या त्या व्यक्तींमुळें झालेल्या मानसिक प्रतिक्रियांना आत्मचरित्रांत वाव मिळतोच असें नाहीं. आपल्या प्रतिपादनाला योग्य तेवढ्याच मानसिक प्रतिक्रियांची निवड आत्मचरित्रकार करील हेंच अधिक संभवनीय. जें घडलें तें अधिक महत्त्वाचें अशी आत्मचरित्रकाराची भावना असते. अर्थात् यांतहि त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार असतोच, पण तो घटना आणि प्रसंगानुरोधानें होत असल्यानें तो अनिर्बंध नसतो हेंच खरें. लघुनिबंधकाराला हीं बंधनें पाळावयाचीं नसतात. विषय हा केवळ निमित्तमात्र असतो. जलपृष्ठावर तरंग उठविणाऱ्या दगडाइतकेंच त्याला महत्त्व. उठलेल्या तरंगांचा विलास दाखविणें हेंच त्याचें कार्य. एखाद्या प्रेरणेनें लघुनिबंधकाराचे अनुभव आणि स्मृति जशा चाळवतील तशी त्याची कल्पनाशक्तीही चाळवेल. आणि कल्पनाशक्तीनें रेखाटलेलीं चित्रणें हाही त्याच्या आत्मविष्काराचा रमणीय विलास होय. लघुनिबंधांत लघुनिबंधकारास आलेल्या अनुभवास जसें प्राधान्य मिळेल तसेंच जे अनुभव यावेत अशी त्याला आंतरिक तळमळ लागून राहिली असेल त्यांनाहि मिळेल. शिवाय लघुनिबंधांत गुंफलेल्या व्यक्ति, प्रसंग आणि घटना या जरी प्रत्यक्ष जीवनांतून उचललेल्या असल्या तरी त्यावर संयोजक कल्पकतेचा हात फिरल्यानें त्यांना वाङ्मयीन सत्याचें स्वरूप प्राप्त होतें. या सोयीमुळेंच लेखकाला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आणि जीवनानुभवाचा खुला आविष्कार करण्यास संकोच वाटत नाहीं. आत्मचरित्रकारावर

पडणाऱ्या मर्यादा लघुनिबंधकाराला जाचत नाहींत त्या अशा. या सर्वच दृष्टीनें लघुनिबंधांत आत्मप्रकटीकरणाला संपूर्ण वाव असतो. म्हणूनच कीं काय, अलीकडे लघुनिबंधात्मक स्वरूपाचीं आत्मचरित्रें लिहिलीं जाऊं लागलीं आहेत. इंग्रजी वाङ्मयांतलीं दोन ठळक उदाहरणें घ्यावयाचीं झाल्यास तीं जे. बी. प्रीस्टले यांचें 'मिडनाइट ऑन द डेझर्ट' आणि सॉमरसेट मॉम यांचें 'ऑन समिंग अप' हीं देतां येतील. जवळचेंच उदाहरण घ्यावयाचें झाल्यास वामनरावजींच्या स्मृतिलहरीचें घेतां येईल. त्या पुस्तकाबद्दल लिहितांना मीं अन्यत्र म्हटलें आहे, कीं 'आपल्या संपन्न व्यक्तिमत्वाचें सरस प्रदर्शन लघुनिबंधप्रकाराइतकें अन्य वाङ्मयप्रकारानें क्वचितच होतें. याच कारणानें कदाचित् वामनरावजींना शेवटीं आत्मचरित्र लिहिण्याऐवजीं स्मृतिलहरीसारखें स्फुट लघुनिबंधात्मक पुस्तक लिहावेंसें वाटलें. 'तसेंच चार्लस् लँब यांच्या लघुनिबंधासंबंधानें. 'त्यांत लँबचें व्यक्तिमत्व तर प्रगट झालेंच आहे, पण त्यांत याहीपेक्षां अधिक कांहीं आहे. लँबच्या व्यक्तित्वाचें साररूप वैशिष्ट्य त्यांत प्रकटून गेलें आहे' असें जें म्हणण्यांत येतें यांत तरी हाच अर्थ नाहीं काय?

पत्र या वाङ्मयप्रकाराचें लघुनिबंधाशीं जें साम्य आहे तें आत्मचरित्र किंवा भावगीत यांच्याहून अधिक जवळचें आणि जिव्हाळ्याचें आहे. आपण आपल्या अंतरंगांतील मित्राला पत्र लिहितांना, तें ज्या वृत्तीनें लिहितों, त्याच वृत्तीनें किंवा त्याच वृत्तींतून लघुनिबंध निर्माण होत असतो. आपल्या भावना आणि विचार समजून घेणाऱ्या आपल्या समवयस्क मित्रास आपण जिव्हाळ्यानें पत्र लिहावयास बसलों म्हणजे या ना त्या निमित्तानें विचार, भावना, स्मृति त्या निमित्ताभोवतीं गोळा होतात आणि त्या सर्वांवर त्या व्यक्तीबद्दल वाटणाऱ्या जिव्हाळ्याचें एक नाजूक आवरण पसरतें. या सुखद संवादी भावनेनें मन एकदां भारलें, कीं तें त्या पत्रांत रेशमी फितीचें बंडल उलगडत जावें तसें हळुवारपणें उलगडत जातें. वाक्यें आपोआप जुळून येतात. शब्द आपापल्या जागीं चपखलपणें बसतात. कल्पना, विचार आणि स्मृति या आपला पिसारा उभारून नर्तन करूं लागतात. आपण आपल्या मित्राला लिहीत नसून त्याच्याशीं बोलत आहोंत या वृत्तीचा अंमल मनावर चालू होतो आणि या वृत्तीनें रंगून लिहिलेल्या पत्रांत शब्द बोलके

होतात. वाक्प्रचाराच्या विशिष्ट लकबींतून मित्राच्या आवाजाचा चढ-उतार ऐकूं आल्यासारखा वाटतो. कांहीं वाक्यें वाचतांना तर त्याचे हावभाव आणि त्याच्या चेहेऱ्यावरील भावनिदर्शनही डोळ्यांसमोर दिसूं लागतें. पत्रांतील शब्दाशब्दांतून त्याचा आवाज, त्याच्या हालचालीच्या लकबी नि त्याच्या चेहेऱ्यावरील भाव सांठवून ठेवल्यासारखे वाटतात. लघुनिबंध-कारालाही अगदीं हाच परिणाम आपल्या शब्दप्रबंधांतून साधावयाचा असतो. वाचकांबद्दल सुहृद्‌भाव बाळगून इतक्याच जिव्हाळ्यानें त्यांच्याशीं बोलावयाचें असतें. भाषेच्या विशिष्ट लकबीनें त्याला आपलें व्यक्तिमत्त्व असेंच मूर्त करावयाचें असतें. लघुनिबंधाचे अनेक गुण पत्रप्रकारांत स्पष्ट झालेले दिसले आणि कांहीं उत्कृष्ट पत्रें थोड्या-फार फरकानें लघुनिबंध या संज्ञेला पात्र होण्यासारखीं असलीं, तरी पत्रापेक्षां लघुनिबंधांत अधिक योजना, अधिक कलाचातुरी आणि अधिक एकजिनसीपणाची जाणीव दिसून येते. ‘ श्यामकान्तचीं पत्रें ’ या पुस्तकांतील कांहीं पत्रें लघुनिबंधात्मक स्वरूपाचीं आढळतात. पण कलात्मकतेच्या अभावीं .लघुनिबंधाच्या चौकटींत पूर्णपणें बसेल असें एखादें सांपडेल किंवा नाहीं याची शंकाच आहे. एखाद्या लघुनिबंधकाराचीं पत्रें प्रसिद्ध झालीं तर त्यांत अशीं कांहीं खचित सांपडतील आणि चार्लस् लॅम्बचीं कांहीं पत्रें अशीं आहेतही. एवढेंच नव्हे तर ‘ आपल्या लघुनिबंधांतले सहा असे आहेत, कीं जे आपण लिहिलेल्या पत्रांत जरा फरक करून लघुनिबंध म्हणून छापले आहेत ’ असें त्यानेंच नमूद करून ठेवलें आहे.

पत्रांत आणि लघुनिबंधांत सुहृद्‌भाव असावयास हवा, नव्हे तो दोहोंचा प्राणच होय असें म्हटलें तर तें अधिक खरें ठरेल. दोहोंतही व्यक्तिमत्त्वाचें रुचिर प्रदर्शन झालें पाहिजे. आणि तेंसुद्धां केवळ शब्दस्वरूपाचें न होतां त्या पलीकडे असलेल्या वैयक्तिक छटांचेंही व्हावयास हवें. याबाबत मित्राच्या प्रेमळ संभाषणाशीं या दोहोंची तुलना करण्याचा प्रघात आहे. पत्रांत काय किंवा लघुनिबंधांत काय आपला सखा आपल्याशीं बोलत आहे असा भास जरूर निर्माण व्हावयास पाहिजे. त्याची विशिष्ट भाषा, त्याचे शब्दप्रयोग, त्याचे उच्चार, त्याच्या आवाजाचा चढ-उतार एवढेंच काय पण त्याचे हावभाव, त्याच्या चेहेऱ्यावरचा उत्साह आणि डोळ्यांतील चमक

या सर्व गोष्टी ज्याप्रमाणें त्याच्या संभाषणांत स्पष्ट होतात त्याप्रमाणें त्या लघुनिबंधांत व पत्रांत व्हावयास हव्यात. पत्रांत ही गोष्ट सुलभ असते, कारण पत्रव्यवहार ज्यांमध्यें होतो त्या व्यक्ति एकमेकांस परिचित असतात. एकमेकांच्या लकबी आणि हालचाली एकमेकांनीं पाहिल्या असल्यामुळें त्या शब्दांतून व्यक्त करणें आणि ओळखून घेणें एकमेकांस सहज शक्य असतें. पण लघुनिबंधकाराची आपल्या वाचकांशीं ओळख असणें सुतराम् शक्य नसल्यानें त्याला संभाषणाचा हा समग्र परिणाम केवळ छापील शब्दाक्षरांतूनच वठवावयाचा असतो. शब्द बोलके आणि देखणे करण्याची किमया त्याला साधावयाची असते. शब्दांना रस, रूप, गंध, नाद आणि मुद्रा देण्याचें कसब ज्याला साधेल त्यालाच आपले लघुनिबंध बोलके आणि जिवंत करतां येतील. हें ज्याला ज्या प्रमाणांत साध्य होईल त्या प्रमाणांत तो यशस्वी होईल. पण मग हें कशावर अवलंबून आहे ? याचाच विचार आतां आपणांस करावयाचा आहे.

आपल्या व्यक्तित्वाची छाप शब्द, वाक्य, वाक्याची ठेवण यांवर वठवतां येण्याइतपत ती प्रभावी असल्याशिवाय ही गोष्ट शक्य नाहीं. नाहीं तरी बोलघेवड्या मित्रांच्या संभाषणांत आपलें मन रमतें तें तो ज्या विषयावर प्रवचन करीत असतो त्या विषयामुळें खास नव्हे. त्या विषयावरील त्याचीं मतें आणि विचार आपणांस मान्य असतील किंवा नसतीलही. त्याच्या भाषणांत व्यक्त होणारीं त्याचीं ध्येयें, त्याच्या आकांक्षा, त्याच्या इच्छा यांच्याशीं आपण सहमत असूं किंवा नसूंही. पण तो बोलत राहिला, कीं आपण आपल्या जिवाचे कान करून तें ऐकत राहातों. तो अधिकाधिक बोलत राहावा म्हणून आपण आसुसलेले असतों. याचें मर्म असें, कीं तो त्या त्या विषयाच्या निमित्तानें आपल्या व्यक्तिमत्त्वाला वाट करून देत असतो. त्याचीं मतें, त्याच्या आकांक्षा, त्याचीं ध्येयें, त्याच्या कल्पना, त्याच्या आठवणी हीं त्याच्या व्यक्तिमत्त्वाचीं अंगप्रत्यंगें प्रगट करीत असतात. त्याच्या शब्दाशब्दांतून त्याचें व्यक्तिमत्त्व ओसंडत असतें. हा त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा रम्य विलासच आपणांस मोह घालीत असतो.

लघुनिबंधकारालाही हीच जादू साधावयाची असते. म्हणूनच त्याजवर जी जबाबदारी पडते ती ही, कीं ज्यामुळें वाचकांचा लय आपणाकडे लागून

राहावा तें आपलें व्यक्तिमत्त्व बहुविध, बहुरंगी आणि संपन्न असावयास हवें. तें तसें असेल, तरच तो आपल्या वाचकांच्या मनावर मोहिनी घालूं शकेल, एरवीं नाहीं. बहुरंगी, विविध, संपन्न व्यक्तिमत्त्व असावयास हवें म्हणजे काय हें पाहाण्यापूर्वी एक खूणगांठ मनाशीं बांधणें जरूर होईल. ती अशी, कीं व्यक्तिमत्त्वाचा आव आणून लघुनिबंध यशस्वी करतां येईल ही आशा बाळगणें व्यर्थ होय. पैशाप्रमाणें व्यक्तिमत्त्वाचेंही सोंग या जगांत आणतां येत नाहीं आणि जें नाहीं तें भासविण्याचा प्रयत्न करतांना दुसऱ्यापेक्षां आपणच फसण्याचा अधिक संभव असतो. जें नाहीं तें सोंग आणण्याच्या खटपटींत जें आहे त्याची गळचेपी करावी लागते आणि ज्याला खरोखरी वाव दिला तर कार्यभाग साधण्यासारखा असतो त्याचीच मुस्कटदाबी करून आपण तो नासतों. अशी फसवाफसवी करून वाचकांना जिंकण्याची कला हस्तगत करतां यावयाची नाहीं. ती करणेंही समर्थनीय ठरणार नाहीं. कारण आत्मप्रकटीकरण हा तर लघुनिबंधाचा प्राण होय. लघुनिबंधकाराबद्दल आपणांला जो सुहृद्भाव वाटतो तो तो आपलें व्यक्तिमत्त्व आपल्या तळहातावर ‘ नवनीत मेल्या ’ प्रमाणें देतो म्हणून ! व्यक्ति तितक्या प्रकृति ही म्हण लघुनिबंधप्रकारांत जितकी प्रत्ययाला येते तितकी अन्यत्र क्वचित्. जिच्यांतून आपणांस लघुनिबंधकाराच्या अंतःस्वरूपाचें सम्यग् दर्शन होईल अशी लघुनिबंध ही एक उघडलेली खिडकीच होय. ज्याला आपल्या व्यक्तिमत्त्वाचें दर्शन देण्याची कला साधली, त्याला आपल्या वाचकांना लघुनिबंधाच्या झरोक्यांतून आपलें अंतरंग दाखविण्याचें रहस्य कळलें, असें म्हणावयास हरकत नाहीं. दोन मित्रांच्या सहवासांत आणि संभाषणांत तरी याहून अधिक काय घडत असतें ? एकमेकांच्या संभाषणामुळें एकमेकांना दुसऱ्याच्या व्यक्तिमत्त्वाशीं एकरूप होतां येऊन आपलें मन आणि आपलें अंतःकरण क्षणैक तरी विशाल झाल्याचा अनुभव येत नाहीं काय ? लघुनिबंधांतही हेंच होत असतें, म्हणून लघुनिबंधकाराबद्दल वाचकांना मित्राबद्दलची आपुलकी, मित्राबद्दलचा जिव्हाळा वाटत असतो.

लघुनिबंधकारास आपल्या वाचकांना आपल्या संपन्न व्यक्तिमत्त्वाच्या जगांत नेतां आलें, तरच त्याच्या कार्याचें साफल्य झालें, असें म्हणतां येईल. वाचकांचीं मनें उल्हसित होतील, त्यांच्या मनाचें विनोदन होईल, त्यांच्या

वृत्ति सुखित होतील असें त्याचें जग संपन्न आणि विविध असावयास हवें, ही गोष्ट निर्विवाद. ज्याचें दर्शन वाचकांना रुचिर वाटेल अशा विविध जगाचें स्वामित्व त्याला लाभलें असेल तरच त्याला हा कार्यभाग साधतां येईल. ज्या जगांत तो उल्हसित वृत्तीनें वावरला असेल, ज्यांतील वस्तुवस्तूंचें स्वरूप त्यानें अनिमिष नेत्रांनीं न्याहाळलें असेल आणि ज्यांतील पसाऱ्यांत त्याचें जीवनलोलुप मन गुंतलें असेल अशाच जगाचें दर्शन त्याला आपल्या वाचकांना विलोभनीय करून दाखवितां येईल. या मायाबाजारांत तो आपणांस घेऊन हिंडविणार असेल तर तेथील गमतीचीं ठिकाणें आणि मजेचे देखावे त्यास पूर्णपणें माहीत असावयास हवेत. खरी गोष्ट अशी आहे, कीं तो ज्या जगांत आपणांस हिंडवीत असतो तें आपलेंच पण त्याच्या दृष्टीनें § पाहिलेलें जग असतें. साधारणपणें आपण सारेच एकाच जगांत जीवन घालवीत असतों. पण आपल्या भिन्न प्रकृतीमुळें आपणांस त्या जगाचें आपणास्वतःपुरतें एक निराळेंच दर्शन घडत असतें. उन्हाचा रंग तोच, पण चाळशीच्या रंगाप्रमाणें तो बदललेला दिसावा त्याप्रमाणें आपल्या भिन्न व्यक्तित्त्वामुळें घडणारें हें जगाचें निराळें दर्शन म्हणजेच एक निराळें जग ठरतें. आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या कमी-अधिक प्रमाणांत तें विशाल किंवा संकुचित असेल, बहुरंगी किंवा नीरस असेल, आल्हाददायक किंवा तापदायक असेल. लघुनिबंधांतील या दर्शनानें आपल्या परिचयाच्या जगांत जितकें अधिक स्वारस्य निर्माण होईल, जितकें अधिक वैचित्र्य येईल, तितकें तें अधिक विलोभनीय ठरेल.

मग लघुनिबंधकाराचें कार्य काय, तर या जीवनांत वावरत असूनही त्यांतील ज्या गमतीच्या गोष्टींकडे आपलें लक्ष गेलें नाहीं, त्यांकडे आपलें लक्ष वेधावयाचें. ज्या ठिकाणीं विनोद उत्पन्न होईल अशी शंकाही येणार नाहीं अशा ठिकाणच्या विनोदाचा आस्वाद द्यावयाचा. ज्या ठिकाणीं करुणरसाचा झरा ठिबकत असेल असें स्वप्नांतही यावयाचें नाहीं त्या

---

§ माझ्या 'चाळशी' या लघुनिबंधांत अगदीं याच स्वरूपाचे जे विचार मी अधिक विस्तारानें प्रकट केले आहेत ते या मुद्दयाला पूरक आणि पोषक असल्यानें त्यांकडे मी वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितों.

ठिकाणचा करुणरस उघड करावयाचा. जीवनाच्या हजारों अंगप्रत्यंगांतील विविधता आणि रम्यता स्पष्ट करावयाची. नवनवीन संवेदनांनीं अंतःकरण संपन्न करावयाचें. या जीवनांत क्षुद्र, उपेक्षणीय कांहींच नाहीं याचा अनुभव घडवावयाचा. थोडक्यांत सांगावयाचें तर जीवनाकडे पहाण्याची नवीन, उत्सुकलेली आणि कौतुकाची दृष्टि द्यावयाची. पण हें करण्यापूर्वी तशी दृष्टि लघुनिबंधकाराला स्वतःला प्राप्त झाली असली पाहिजे. पूर्ण उल्हसित मनानें या बहुरंगी जगाचें दर्शन त्यानें घेतलें असलें पाहिजे. कौतुकपूर्ण दृष्टीनें त्यानें या संसारांतील व्यवहाराचें अवलोकन केलें असलें पाहिजे. हरएक प्रसंगांतला विनोद आणि कारुण्य यांचा आस्वाद त्यानें घेतला असला पाहिजे. त्याची निरीक्षणशक्ति तीव्र आणि संवेदनशक्ति तरल असली पाहिजे. हें सर्व असेल तरच त्याचें जिणें लघुनिबंधकार म्हणून यथार्थ होईल.

जीवनाच्या या धकाधकींत आपण सारेच मंद मनानें आणि थंड अंतःकरणानें वावरत असतों. डोळे उघडून पहाण्याची संवय आपणांपैकीं फारच थोड्यांना असते. या गोष्टीची दखल आपण घेत नाहीं. ती घेतली तर मन जागें ठेवण्याची कोशीस करावी लागेल. डोळे उघडे ठेवण्याचा ताण सहन करावा लागेल. या आळसटपणाचा परिणाम असा, कीं या विस्तृत आणि विविध जगांत वावरत असूनही आपलें वैयक्तिक जग नीरस आणि संकुचित बनलेलं असतें. व्यवहाराच्या मळलेल्या वाटेनें जातांना उल्हास आणि तरतरी यांचा अनुभव यावा तरी कसा ? हा दोष खरोखरी ज्या जगांत आपण वावरत असतों त्याचा नसून सुस्तपणानें वावरणाऱ्यांचाच असतो. डोळे जरा उघडे ठेवले, मन अधिक उल्हसित केलें, अंतःकरण उत्सुक राखलें, तर आपल्या याच मर्यादित जगांत अधिक संपन्नता, अधिक उत्साह, अधिक चैतन्य सांचलेलें दिसूं लागेल. दिशा फाकतील आणि क्षितिज रुंदावत जाईल आणि जिवंतपणा म्हणजे तरी काय ? तर निरीक्षण, संवेदना आणि हरएक प्रेरणेचा प्रतिक्रियेनें स्वीकार करण्याची शक्तीच ना ? मग लघुनिबंधकार तरी दुसरें काय साधत असतो ? तो आपणावर जो महान् उपकार करीत असतो तो हा, कीं ज्या उल्हासानें तो जीवनाचा आस्वाद घेत असतो त्यांत आपणांस तो सहभागी करूं इच्छितो आणि म्हणूनच जिव्हाळ्याच्या मित्राबद्दल जी आपुलकी वाटावी

ती आपणांस लघुनिबंधकाराबद्दल वाटत असते. लघुनिबंध-प्रकाराच्या लोकप्रियतेचें आणि मान्यतेचें मर्महो यांतच आहे.

केवळ वाक्यरचनेची खटपट करून आणि वाङ्मयात्मक लटपट करून उत्कृष्ट लघुनिबंधकाराचें यश मिळवतां येणार नाहीं, हें या विवेचनावरून स्पष्ट होईल. उत्कृष्ट लघुनिबंध लिहिणें ही फक्त साहित्यिक करामत नव्हे. व्यक्तिमत्त्व संपन्न केल्याशिवाय, मनोवृत्तींना विशिष्ट वळण दिल्याशिवाय, लघुनिबंधाची घडण साधणें शक्य नाहीं. डोळे उघडे ठेवून उत्सुकतेनें जग पाहिलें पाहिजे. प्रत्येक प्रेरणेचा प्रसन्न अंतःकरणानें स्वीकार केला पाहिजे. भावनांच्या अनुसंधानांत मन गुंतविलें पाहिजे. संवेदना, मनन आणि प्रगटीकरण या शैक्षणिक प्रक्रियेंतून गेल्याशिवाय गत्यंतर नाहीं म्हणून लघुनिबंधकाराचें शिक्षण हें केवळ साहित्यिक शिक्षण नव्हे ; तें त्याच्या मनाचें, अंतःकरणाचें आणि व्यक्तिमत्त्वाचें शिक्षण ठरतें आणि म्हणूनच त्याचें महत्त्व अनन्य समजलें पाहिजे.

लघुनिबंधकाराच्या जातिवंतपणाची एक खूण अशी, कीं आपल्या लघुनिबंधाकरितां तो जे विषय निवडील ते बाह्यतः अगदीं क्षुद्र, उपेक्षणीय आणि हास्यास्पद वाटणारे असतील. आयुष्यांतील साधा छोटा प्रसंग, नेहमींचाच अनुभव, अतिपरिचित वस्तु, अशासारखा एखादा विषय घेऊन त्याच्याशीं खेळतां खेळतां आणि त्याचें विविध दर्शन देतां देतां त्यावर तो असा कांहीं प्रकाश टाकील, कीं शेवटीं ती गोष्ट अत्यंत बहारीची आणि आश्चर्यजनक वाटूं लागावी. अशा रीतीनें तयार झालेला लघुनिबंध वाचतांच वाचकानें स्वतःशीं म्हणावें 'अरे, हें कसें माझ्या लक्षांत आलें नाहीं!' कधीं कधीं आपल्या निर्माणशक्तीच्या उत्साहभरांतच तो हें साध्य करीत असतो. वरवर पाहिल्यास निर्जीव अन् अर्थशून्य असा विषय तो निवडतो आणि पहाणारास त्याची ही निवड हास्यास्पद वाटते. पण मग आपल्या अतुल जादूगिरीनें तो त्याभोवतीं जेव्हां चमकदार कल्पना-विचारांचे धागे गुंफूं लागेल अन् त्यांतूनच विनोदाचे अन् कारुण्याचे फवारे उडवील तेव्हां त्या क्षुद्र विषयांतून एक अजब, सुंदर अशी कलाकृति निर्माण झाल्याचा चमत्कार आपणांस दिसून येईल. लघुनिबंधकाराची करामत या जादूगिरींत, या आश्चर्यजनक परिवर्तनांतच सामावलेली असते. अशा ठिकाणीं

लघुनिबंधकलेची परमावधि साधली असें म्हणावयास हरकत नाहीं, पण यांत तरी विशेष असें काय आहे ? कारण उघड्या डोळ्यांनीं पाहिलें, उल्हसित मनानें न्याहाळलें तर प्रत्येक वस्तु अन् प्रसंग हीं अमूप मानवी संबंधांनीं निगडित झालेलीं नाहींत काय ? प्रत्येकाच्या ठिकाणीं आपापलें हास्य, आपापलें कारुण्य, आपापलें काव्य आणि आपापली अद्भुतरम्यता ही आहेच आहे. ती पहाणारी दृष्टि असली, तें अनुभवणारें अंतःकरण जवळ असलें, म्हणजे या जगांत अशी एकही वस्तु आढळणार नाहीं, कीं जिच्यांतून उत्कृष्ट लघुनिबंधाची निर्मिति होणार नाहीं. ज्यावर लघुनिबंध लिहितांना लघुनिबंधकाराला आपल्या साऱ्या मनःशक्तींचा विलास दाखवितां येणार नाहीं, असा एकही विषय या जगांत सांपडणार नाहीं.

जातिवंत लघुनिबंधकाराचें आणखी एक लक्षण लक्षांत ठेवणें जरूर आहे. तें म्हणजे त्याच्या लघुनिबंधाला कोठेंही खटपटीचा किंवा कलाचातुरीचा वास येत नसतो. कोठेंही याचा अर्थ केवळ लेखनशैली अन् रचना एवढ्यापुरताच घेतां कामा नये. तर लघुनिबंधाच्या मूळ कल्पनेच्या धारणेपासून तों भाषेच्या आवरणांत गुंफून तो तयार होईपर्यंत ज्या ज्या कांहीं क्रिया घडतात त्या सर्वांना तो लागू केला पाहिजे. लेखनशैली तर सहज आणि अकृत्रिम वाटली पाहिजेच, पण लघुनिबंध लिहितांना जी मनःस्थिति असेल तीही सहज आणि मोकळी हवी. कांहीं विशिष्ट परिणाम घडवून आणण्याच्या खटपटीचा अभाव लघुनिबंधांत दिसला पाहिजे, नव्हे, अशा प्रकारची खटपट लघुनिबंधाच्या प्रकृतीला पूर्ण मारक होय. अतिशय उत्साह, अतिशय उत्सुकता, किंवा आग्रह यांचाही अभाव तेथें असावयास हवा. प्रचारी थाट किंवा वकिली बाणा यांचा वासही लघुनिबंधाला लागतां कामा नये. व्यक्तीवर काय किंवा तत्त्वावर काय, टीका ही वर्ज्यच समजावी. विनोदाबद्दलही हें सांगितलें पाहिजे, कीं तो तिखट किंवा चावरा असतां कामा नये. नम्र आणि सात्त्विक असाच असावा. कल्पनेचा चमकदारपणा किंवा अर्थाची चमत्कृति हीहि लघुनिबंधास मारक समजावी.

ज्या मनःस्थितींतून लघुनिबंध अवतरत असतो, ती सुहृद्भाव आणि सहानुभूति यांच्याशीं संवादी असली पाहिजे. ज्या ठिकाणीं मानवीवृत्तींचें संमीलन होत असतें, अशा अंतःकरणाच्या गाभाऱ्यांतून लघुनिबंधकाराच्या

कलाकृति जन्म घेत असतात. जातिवंत लघुनिबंधकार हास्य आणि गांभीर्य यांच्या प्रकृतींत भेद मानीत नाहीं. कारण हास्य आणि कारुण्य हीं दोन्हीही एकाच मानवी अंतःकरणाचीं अपत्यें होत. त्यांच्यांत सापत्नभाव नाहीं हें त्याला पटलेलें असतें. कदाचित् याच कारणास्तव त्याच्या ठिकाणीं आग्रह किंवा अति गांभीर्य दिसत नाहीं. जग आहे त्यापेक्षां निराळें असावें अशी त्याची वृत्तीच नसते. क्रांतिकारक अथवा सुधारक या भूमिका घेण्याचा मोह त्याला कधींच होत नाहीं. वस्तुस्थितीबद्दल त्याच्या मनांत अढी नसते एवढेंच नव्हे, तर ती वस्तुस्थिति आहे म्हणूनच त्याला प्रिय आणि हवीशी वाटत असते. जग हा त्याला एक मनोरंजक अजबखाना वाटत असतो. त्यांतल्या अनंत वस्तु अन् त्यांचे अनंत संबंध त्याच्या मनाला विलोभनीय वाटत असतात. जीवनांतील प्रसंगांत आणि घटनांत त्याला आनंदाचा प्रत्यय येत असतो. प्रत्येक मानवी वृत्तीला साद घालणाऱ्या प्रेरणा या जगांत विपुल आहेत, याबद्दल त्याच्या मनांत कृतज्ञतेची भावना वसत असते. मोकळ्या अन् उत्सुक मनानें या सर्वांना साद द्यावयाची, त्यांचा आपुलकीनें स्वीकार करावयाचा, हीच लघुनिबंधकाराची भूमिका होय. असंतोषी माणसाप्रमाणें या जगांतील वस्तुमात्रावर हात टाकून त्यांच्या चुराड्यांतून आपणास हवें तसें नवीन जग निर्माण करण्याची त्याची इच्छा नसते. अशी इच्छा धरणें हें रांगडेपणाचें लक्षण होय. मोकळ्या मनाच्या आणि उदार अंतःकरणाच्या लघुनिबंधकाराचें जर कोणतें तत्त्वज्ञान असेल, तर तें स्वीकाराचें आणि समाधानाचें होय. तसें पाहिलें तर लघुनिबंध म्हणजे जीवनावर केलेली प्रेमाची टीकाच नव्हे काय? तींत निरीक्षणही असेल, परीक्षणही सांपडेल. तींत लौकिकांतील अलौकिकाकडे अंगुलीनिर्देश केलेला आढळेल. तींत कोठें चटकदार स्पष्टीकरणही सांपडेल. संसारांतल्या या हरघडीच्या देखाव्याकडे लघुनिबंधकार डोळे भरून पहातांना दिसेल आणि त्यांतील सुखदुःखांचा स्वीकार तो प्रसन्न अंतःकरणानें करील. प्रत्येक कलावन्त ज्या उत्साहानें आपली सामुग्री हाताळतांना दिसतो, त्याच उत्साहानें आणि निर्विशंक मनानें लघुनिबंधकार या संसाराचें स्वागत करतांना दिसेल. हरघडी बदलणाऱ्या या भव्य देखाव्याकडे तो कुतुकलेल्या नेत्रांनीं पहात राहील. अन् त्यांतील सुखदुःखाचीं रम्य स्थळें चित्रित करतांना उल्हसित झालेला

दिसेल. परिणतप्रज्ञ तपस्व्याप्रमाणें त्याला या जीवनाचें मर्म कळलेलें असतें आणि तें कळल्याच्या आनंदांत तो आपणां सर्वांना समभागी करण्याची इच्छा धरीत असतो.

जातिवन्त लघुनिबंधकाराची प्रतिभा विपुलप्रसव असते. यांतील मर्म शोधण्यास लांब जाण्याचें कारण नाहीं. लघुनिबंधकाराची प्रतिभा म्हणजे जगाच्या या बहुरंगी विविध देखाव्यांकडे रोखलेले त्याचे डोळेच होत. त्या डोळ्यांच्या ठिकाणीं विपुल प्रसवशक्ति असते असें नव्हे तर ते ज्यावर लागलेले असतात त्या जीवनाचीं अंगप्रत्यंगें विपुल व अनंत असतात. आपणही आपले डोळे या अर्थानें उघडले तर त्यांच्या ठिकाणींही दृश्याची अनंत निर्माणक्षमता प्रकट होईल. शंकरानें तृतीय नेत्र उघडला, कीं वस्तुमात्राचा समूळ नाश होई असें म्हणतात. पण आमच्या लघुनिबंधकारांनीं आपले डोळे उघडले, कीं तेथें सुंदर, रम्य अशी नवी सृष्टि फुलून जन्म घेते आणि म्हणूनच ते जोंपर्यंत उघडे राहातील तोंपर्यंत त्यांची निर्माणशक्ति अव्याहत चालू राहील. ज्या वेळीं जीवन आणि अनुभवच कोळपून गळून जातील त्या वेळीं त्याची सृजनशक्ति थांबेल. कारण स्वीकारवादी लघुनिबंधकाराची निर्माणक्षमता त्याच्या प्रतिभेच्या प्रभावावर अवलंबून नसून ती त्याच्या स्वीकार करण्याच्या वृत्तीवर अवलंबून असते.

रचना आणि शैलीच्या लालित्याबद्दल लिहावयाचें तर इतकेंच म्हणतां येईल, कीं या गोष्टींचा विकास लघुनिबंधाच्या प्राणभूत तत्त्वाच्या अनुषंगानें होत असतो. लघुनिबंधकाराचें व्यक्तिमत्त्व विषयाबरोबर रचना अन् शैली घेऊनच प्रगट होत असतें. मानव म्हटला, म्हणजे मन, अंतःकरण आणि जीवतत्त्व यांबरोबरच विशिष्ट शरीररचना घेऊन जन्मलेला प्राणी; त्याप्रमाणें लघुनिबंधाचें. अर्थात् मानसशास्त्राबरोबर शरीरशास्त्रही ज्याप्रमाणें उत्पन्न झालें, त्याप्रमाणें लघुनिबंधाच्या मानसशास्त्राबरोबर त्याचें शरीरशास्त्रही तयार व्हावयास हवें. या प्रबंधांत लघुनिबंधाचें वैशिष्ट्य आणि त्याचें मानसशास्त्र यांचा मीं प्रामुख्यानें विचार केला आहे. तो करतांना त्याच्या तंत्र आणि त्याची शैली यांबद्दलचे महत्त्वाचे उल्लेख ठिकठिकाणीं आले आहेत. ते तसे आले असले तरी तंत्र, शैली व रचना यांचा सांगोपांग विचार यांत आला नाहीं. त्यांचा स्वतंत्रपणें विचार झाला पाहिजे, याची जाणीव

मला आहे. त्याचप्रमाणें मराठी लघुनिबंधकारांच्या कामगिरीचेंही कांटेकोर परीक्षण करणें जरूर आहे. हे विषय मी स्वतंत्र प्रबंधाकरितां राखून ठेवीत आहें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७४०१

REFBK-0007401

## 'लिफाफे' मिटल्यावर

### सवडीचे क्षण — भ. श्री. पंडित

आरसा, छत्री, पंखा, जोडे, कपडे ... अशा साध्याही विषयांत मोठा आशय सांपडूं शकतो, जर आपल्याजवळ सवडीचे क्षण आणि त्यांचा बरोबर उपयोग करण्याची पात्रता असेल तर. एरवीं 'सूपभर लाह्या त्यांत रुपाचा' तसें काव्य वाऱ्यावर उडून जायचें.

सव्वा रुपया

### कांहीं माणसें — स. वि. देशपांडे

श्री० देशपांडे ह्यांच्या ह्या कांहीं माणसांत हॉटेलवाल्या पोऱ्यापासून कलाकार कोल्हटकरांपर्यंत अनेक नमुन्यांचा भरणा आहे. वेडा हसन्या नि पार्सलक्लार्क ह्यांच्याप्रमाणें स्टॅलिन-ट्रॉट्स्की नि सावरकरही ह्यांत चमकत आहेत. सामान्य-असामान्यांचा असा हा अपूर्व मेळावा आहे !

सव्वा रुपया

### गारगोट्या — दि. ल. देवधर

साधे व नित्याच्या परिचयाचे विषय घेऊन त्यांवर आपल्या विचारांची मनोहर पखरण पसरून देण्याचें कार्य श्री० देवधरांना छान साधलें आहे ... लघुनिबंधांच्या कपाटांत गारगोट्या हें पुस्तक एक चांगली भर ठरेल ह्यांत शंका नाहीं.

—विविधवृत्त

एक रुपया

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई